Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

C.NO 3602

O111,2:g,1
15D8

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

O111,2:9:1 3602
15D8

Natya Kala Pravartak, Vikalpa vimochan natak

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

15D8 3602

SHRI JAGADGURU VISHWARADHYA JNANAMANDIR
(LIBRARY)
JANGAMAWADIMATH, VARANASI

Please return this volume on or before the date last stamped
Overdue volume will be charged 1/- per day.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आंग्ल महाकवि शेक्सपियरच्या उइंटर्स टेल या
नाटकाच्या आधारें रचलेलें

संगीत

विकल्पविमोचन नाटक.

प्रकाशक

नाट्यकलाप्रवर्तक संगीत नाटकमंडळी.

मुद्रक

रा. रा. रावजी श्रीधर गोंधळेकर
जगद्धितेच्छु प्रेस पुणें.

आवृत्ति १ ली.

सन १९०८

किंमत १ रुपया.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

0111,2:8:1
15D8

(ह्या पुस्तकाची मालकी सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदून पुस्तक छापविण्याचा व रंग-भूमीवर प्रयोग करण्याचा वगैरे सर्व हक्क नाट्यकलाप्रवर्तक संगीत कंपनीचे मालक यांनीं आपणाकडेस ठेविले आहेत.)

SRI JAGADGURU VISHWARADHYA
JNANA SIMHASAN JNANAMANDIR
LIBRARY.
Jangamwadi Math, VARANASI,
Acc. No. ~~.........~~ 3602

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हें

पुस्तक

गुरुवर्य नाट्याचार्य रा. रा. शंकर आत्माराम
पाठकर यांच्या नाट्यकलानिपुणत्वावर
लुब्ध होऊन, शिष्यप्रीतीच्या भावानें
मंडळींनीं त्यांस प्रेमानें
अर्पण केलें असे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

श्रीकरुणेश प्रसन्न.

संगीत
विकल्पविमोचन नाटक.

अंक १ ला.

मंगलाचरण.

पद (गरेगसासा गधप.)

नमन आधिं शंकरा। गुरुवरा उमावरा। मग तया शुभंकरा॥ गजमुखा दया करा॥ ध्रु०॥ परिसुनी जयाचिया मधुरशा सुवाणिला। होइ सुख महेश्वरा। असुख हरित जो खरा। गज-मुखा॥ १॥ जनक जननि त्या परी। कवि मुनि सकल सुधी। स्मरुनि हृदयीं गुंफितों। कवन सुमन गुच्छ हा॥ २॥ विबुध हो। विनंति ही। ह्मणुनियां तुह्मां प्रती। अल्प यत्न हा खरा। क-रुनि मान्य घ्या बरा। गजमुखा०॥ ३॥

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रवेश १ ला.

(स्थळ—राजवाडा.)

(विश्वासर व आणि धैर्यशील दोन सरदार प्रवेश करतात.)

धैर्यशील—विश्वासराव, मी ह्मणतों हें खरं कीं खोटं हें आपल्याला आतां नाहीं समजणार. देवदयेनं आमच्या विलासपुरला जर आपल्या येण्याचा योग जुळून येईल तरच या गोष्टी; नाहीं तर मनांतले मांडे मनांतच.

विश्वासराव—असं कां ह्मणतां, लवकरच असा योग जुळून येईल; कारण, आमच्या महाराजांचाही विश्रांतीकरितां ह्मणून कांहीं दिवस विलासपुरला येण्याचा मानस आहे.

धैर्यशील—आपण जितकी आमची बरदास्त ठेवलीत तितकी आपली आमच्या हातून राहील कीं नाहीं याची शंकाच आहे. पण आपली आमच्या गरीबाच्या इथली भाजीभाकर आपण मान्य कराल अशी मला आशा आहे.

विश्वासराव—अं: इतकी स्तुति करण्यासारखा आमच्या हातून आपला कांहीं आदरसत्कार झाला असं मला तर निदान वाटत नाहीं.

धैर्यशील—खरोखर विश्वासराव, तोंडदेखलं बोलत नाहीं; पण आपल्या आदरसत्काराची रीत कांहीं आणीक आहे बुवा.

विश्वासराव—अहो, यांत कांहीं विशेष नाहीं; कारण, आपले महाराज हे आमच्या महाराजांचे बाल-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पणचे स्नेही, तेव्हां स्नेह्यांनीं स्नेह्यांचा मान ठेवणं हा त्यांचा धर्मच होय.

धैर्यशील—खरंच विश्वासराव, असं निष्कपट प्रेम आपण नाहीं बुवा कुठं पाहिलं.

पद (चाल—ही तीच तीच सुंदरी.) ताल दादरा.

चित्रपाल आणि शूरसेन नृपति हे जरी। वरुनि
दिसती दोन असति एक अंतरीं तरी॥ ध्रु०॥
बंधु बंधु माजिं असें। शुद्ध प्रेम नच वसे। या
प्रेमा नच उपमा सांपडेल भूवरी॥ १॥ अन्य
भाव मनिं न धरिति। सत्य मित्र तेचि होति।
क्षणिं कोपति, शांत होति, हर्षतीहि त्यापरी॥ २॥

विश्वासराव—देव करो आणि त्यांचं हें प्रेम असंच चिरकाल राहो.

धैर्यशील—विश्वासराव, खरोखर आपण मोठे भाग्यवान् आहांत, आणि ह्मणूनच आपल्या महाराजांना पुत्रही त्यांच्या सारखाच झाला. महाराजांच्या पाठीमागं तो आपल्याला मुळींच त्यांची आठवण होऊं देणार नाहीं.

विश्वासराव—हो, आपण ह्मणतां तसा तो आहे खरा. किंबहुना आपल्या कल्पनेपेक्षां जास्त झटलं तरी चालेल. अहो, अगदीं वृद्ध झालेल्यांची सुद्धां राजपुत्र मोठा झालेला पाहण्याची इच्छा आहेच.

धैर्यशील—राजपुत्र मोठा होऊन त्यांची इच्छा पूर्ण झाली ह्मणजे ते आनंदानं मृत्यु पत्करतील नाहीं बरं ?

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विश्वासराव—अहो, इच्छाच पूर्ण झाल्यावर मग जगायचं कशाला ?

धैर्यशील—असं कां ह्मणतां, मग त्याचा पुत्र पाहण्याची इच्छा होईल. अहो, इच्छा ही अमर आहे.

पद (रामकरीं जरी नृपपद.)

दृष्टीला कधि नच पडणारी। तरुणी मनुजें पाहिल्यावरी। स्पर्श सुखाची आस अंतरीं। साहजीक निपजे ॥ ध्रु० ॥ दैवबलें जरि पुरली ती ही। आलिंगनिं मन गुंतुनि राही। प्राप्त जाहालें संगमसुखही। तरि इच्छा न पुरे ॥ १ ॥

(निघून जातात.)

प्रवेश २ रा.

स्थळ—(राजवाड्यांतील दिवाणखाना.)

(चित्रपाल, शूरसेन, चंपावती, जयसेन, विश्वासराव, इतर परिवार.)

पद (सुनें दिलदार गुले.)

चित्रपाल—

कसें मन मोडुनी आमुचें। तुह्मीं जातां। कसें स्ववियोग दुःख अह्मां। तुह्मीं देतां ॥ ध्रु० ॥ अजुनि कांहीं दिवस अपुल्या। सुसंगतिचा। घडावा लाभ ही इच्छा। असे चित्ता ॥ १ ॥ ह्मणुनि ऐका। विनंती ही। नका जाऊं। त्यजूनियां नृपश्रेष्ठा अह्मां आतां ॥ २ ॥

शूरसेन—काय सांगूं तुह्मांला ? मला आतां मुळींच राहतां येत नाहीं. कारण—

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पद (वेषाचें सार्थक किती.)

झाले बहुदिन मजला येथ येऊनी । तेविं मदिय राज्य प्रजाजनहि सोडुनी ॥ध्रु०॥ ओढाया राज्य धुरा मजविणें कुणी । नच समर्थ हा विचार घ्या पुरा मनीं ॥१॥ केला सत्कार बहू जाहलों ऋणी । लोभ असा सतत असो हेतु हा मनीं ॥ २ ॥

ह्मणून मला आतां आपण आनंदानं जायला परवानगी द्या.

चित्रपाल—निदान एक आठवडा तरी आह्मीं तुह्मांला सोडणार नाहीं.

शूरसेन—दादा, मला इतका आग्रह कशाला पाहिजे? आपला शब्द मी मोडीन असं आपल्याला वाटतं का? झालं तर! तसंच कांहीं विशेष कारण असतं, तर राहिलों असतों, पण तसं कांहींच नाहीं, ह्मणून ह्मणतों कीं, मला आतां जाऊं द्या.

चित्रपाल—(चंपावतीस) ऐकलंस का! यांनीं तर अगदीं जातों ह्मणून हट्ट धरला आहे. आह्मीं आमच्या कडून होता तितका प्रयत्न केला, आतां तुह्मीं तरी पहा चार गोष्टी सांगून, राहिले तर राहिले.

चंपावती—झाला का भावोजींचा निश्चय! नी त्यांना राहून घेण्याच्या कामांत आपण टेंकले का हात! एवढं तरी आधीं करून घ्यायचं होतं, नी मग तरी मला सांगायचं होतं? नुसतं रहा ह्मटल्यानं का ते राहतील! साफ सांगावं कीं, जाऊं देणार नाहीं ह्मणून, विलासपुरची कांहीं काळजी करायला नको! तिकडे सर्व कांहीं यथास्थित आहे; कालच नाहीं का तिकडून सांडणीस्वार

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आला? भावोजी इतके जायला कां हुरहुरलें आहेत तें आलं का लक्षांत!

पद (सोडुनी लाज लज्जेला.)

सोडुनी जाउबाईना। बहु झाले दिवस ह्मणोनी। कधिं जाउनि पाहिन त्यांना। प्रेम पूर्णशा नयनांनीं ॥ध्रु०॥ उत्कंठा लागलि ऐसी। तन इकडे मन निजदेशीं। प्रिय तनय पुष्पशीलासी। कधिं अंकावरि घेईन। वदन चुंबीन। स्वमन सुखवीन। विचारीं ऐशा। मन यांचें गेलें गढुनी ॥ १ ॥

पण दाखवायचे दांत निराळे असतात, एवढं का मला समजत नाहीं! पण भावोजी, राहानात हो इतकं कांहीं मेलं ओढून चंद्रबळ आणायला नको. इतके दिवस गेले तसे आणखीं आठ दिवस कांहीं अधिक नाहींत. हें पहा, इकडंचं जेव्हां आपल्याकडे येणं होईल तेव्हां वाटेल तितके दिवस आपण राहवून घ्यावं. माझ्या कडून कांहीं ना नाहीं, मग कसं काय, राहायचं ना?

शूरसेन—(मान हालवून) अंः हंः

चंपावती—अंः हंः बिहं मी कांहीं ऐकायची नाहीं. मी आपल्याला राहवून घेणार हें खचित. जसा आपला निश्चय झाला आहे, तसाच माझाही झाला आहे.

शूरसेन— आह्मीं तर जाणार!

चंपावती—बरं, कसे जातां तें मी पाहतें. आतां जाऊन पहारेकऱ्यांना सांगतें कीं, वाड्यांतून कुणालाही बाहेर जाऊं देऊं नये ह्मणून! हें पहा, आपल्याला मी जाऊं देत नाहीं हें खचित. मग कसं काय? खुषीनं राहायचं कीं सक्तीनं?

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शूरसेन—नाहीं तरी तुह्मीं सक्तीनं राहायला लावणारच, मग खुषीनेंच कां नाहीं राहिले? राहतों झालं!

चंपावती—अहाहा! इतका वेळ जातों जातों ह्मणून किती तरी आग्रह धरला होता, आतां राहणं झालं हें बरं नाहीं का?

चित्रपाल—हं कसं काय मग राहतात कीं नाहीं?

चंपावती—न राहून सांगतात कुणाला?

चित्रपाल—(स्वगत) एकूण माझ्या सांगण्याला कांहीं मान नाहीं अं? हं: (उघड) आजच्या तुझ्या भाषणांतील माधुर्य कांहीं अपरंपार आहे असं वाटतं!

चंपावती—आजच्याच?

चित्रपाल—होय!

चंपावती—काय तरी बाई बोलणं हें!

चित्रपाल—नाहीं, तरी पण पूर्वीं एकदांच असं माधुर्य होतंसं वाटतं.

चंपावती—तें कधीं?

चित्रपाल—

पद (अबला स्त्रीही केवळ.).

स्वयंवरीं तव आले बहु नृप हेतु मनीं धरुनी। हरण करूं कीं त्वन्मन सखये बहुविध चेष्टांनीं। वरीन अन्य न नृपाल वदसी मजविण सुगुणखनी। पीयूषापरि शब्द कसे ते गेलिस विसरोनी ॥ १ ॥

चंपावती—इश्श; हें काय तरी बाई बोलणं, भावोजी काय म्हणतील.

चित्रपाल—[स्वगत] भावोजी काय म्हणतील

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कीं, मी काय म्हणेन! अति झालं, अति स्नेहाचं लक्षण हें; हाय, हाय, काय इची स्थिति झाली ही! [विचार करून] अरे, पण माझ्या मनांत आलेली इच्या पापा-बद्दलची शंका कदाचित् खोटीही असेल! ही पापाच-रणी आहे असं एवढ्यावरून कांहीं ह्मणतां येणार नाहीं. गोड बोलणं म्हणजे कांहीं पाप—नाहीं, हें एक आदरस-त्काराचं लक्षण आहे. पण नाहीं. आदरसत्कार झाला म्हणून काय झालं, त्याला कांहीं मर्यादा आहे कीं नाहीं. परक्या पुरुषाशीं शृंगारीक भाषण करणं, नेत्रकटाक्ष मा-रणं, त्याच्याकडेस पाहून हंसणं, खिदळणं हीं आदर-सत्काराचीं लक्षणं कोण म्हणेल! आपल्याला तर नाहीं-च खपणार. (उघड) जयसेना, तूं कुणाचा! माझाना?

जयसेन—होय बाबा.

चित्रपाल—हें नाकाला कुठून काय लावून आ-लास! (स्वगत) याचं नाक अगदीं माझ्या सारखंच आहे असं ह्मणतात नव्हे? (उघड) चल बाळा, खेळ-तोस का तूं माझ्या बरोबर, तुला कांहीं खेळ येतो कां? (स्वगत) पण हिला किती तरी खेळ येताहेत हे! अरेरे, धिक्कार! धिक्कार असो मला! यापेक्षां लग्न केलं नसतं तर फार बरं झालं असतं. (उघड) जयसेना, (स्वगत) हा माझाच असेल काय? माझ्याच सारखा आहे असं ह्मणतात खरं; अगदीं हुबेहूब माझीच प्रतिमा, असं ज्यांचा विचार कधींच कायम नसायचा त्या बा-यका ह्मणतात. पण बायका; बायका काय वाटेल तें ह्मणतील. त्यांचं खरं कुणी मानावं! पण नाहीं; हा माझ्याच सारखा दिसतो तेव्हां हा माझाच. याचं जसं

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

माझ्यावर प्रेम आहे तसं याच्या आईचं असेल काय! काय, प्रेम, हें प्रेम बरं हें प्रेम!

पद [वैराग्य असे प्राप्त तुला.]

प्रेम हें नसे क्षणैक स्थिर कधीं पहा। असे खरा विचित्र यत्प्रभावही महा ॥ ध्रु ॥ जगांतरीं कधींहि घडति नच मुळीं पहा। घडवि बहुत संगमा अशा सदा अहा ॥ १ ॥ आवरी विवेक यास वदति बुध महा। भ्रम परी असे तयांस व्यर्थ व्यर्थ हा ॥ २ ॥

शूरसेन—आज एकाएकीं दादांच्या तब्बेतीला झालं तरी काय?

चंपावती—अगबाई, खरंच. आज असं उदास व्हायला झालं तरी काय?

पद [या विपिनिंची कितिक.]

काय मनीं हो आपुल्या येती। विरंग। तरंग। दुभंग जे। करिति बहुत या मुदित मनासी ॥ ॥ ध्रु ॥ कथुनि ते नरमणि रमणिचें मन झणिं। शांत करा। मत्ताप हरा। चंचल ही। वृत्ति अशी। झालेली। पाहुनीयां। मदिय हृदय बहु पावत कंपा ॥ १ ॥

चित्रपाल—कांहीं नाहीं. या आपल्या जयसेनाला पाहून—

पद [पाहिन सिंहासनीं.]

बाळपणींची मजला सारी। स्मृति अंतरिं ती जाहली ॥ ध्रु ॥ आनंदाचें वय तें साचें ज्यांत नसे मुळिं काळजी। अज्ञान स्थिती वाटे मज ती सद्य स्थितीहुनि चांगली ॥१॥ चिमुकलेंच तशा वयीं धनु करिं धरि शिरिं मुगुटहि त्यापरी।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रमोद सरसीं मज्जन करि जणुं क्रीडा इष्टचि वाटली ॥ २ ॥

बाळा जयसेना, तुझ्या हातून तुझी प्रिय वस्तु जर कुणी हिसकावून घेतली तर तूं काय करशील?

जयसेन—काय करशील? सांगूं कां काय करीन तें!

पद [उदयिक प्रातःकाळीं.]

घेउनि हातीं स्वधनुर्बाण। युद्ध करीन पहा निर्वाण ॥ घेइन त्याचा प्राण । उडविन दाणादाण ॥ जाइन न हार साहिन न अपमान ॥ लाविन त्यास धराया पाय । ह्मणविन हाय रडविन धाय धाय ॥ मद्विक्रम। वघुनि अधम। हतबल खल मग होइल न काय ॥ १ ॥

चित्रपाल—शाबास, एकूण तूं लढाई करशील अं, शूरसेन, तुमचा मुलगा पुष्पशील तुह्मांला याचप्रमाणें आनंद देत असेल नाहीं बरें?

शूरसेन—दादा, तुह्मांला काय सांगूं! त्याचे ते बोबडे बोल ऐकून माझ्या मनाला अतिशय आनंद होतो.

चित्रपाल—अशाच रतिनिं हे राजश्री आह्मांला नेहमीं आनंद देत असतात. बरं मी इथं यांच्याशीं गोष्टी बोलत बसतों, आणि तुह्मी शूरसेन, आह्मीं नवीन तयार केलेला बाग पाहून या. हं, तूं त्यांना तिथल्या एकंदर चमत्कारिक वस्तु दाखीव.

चंपावती—पण इकडलं येणं होईलना! वाट पहात बसूं का आह्मीं बागेंत?

चित्रपाल—कांहीं नको. मी आलों तर येईन, माझा कांहीं नेम नाहीं.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चंपावती—(मुलास) तूं येतोस का बागेंत!

जयसेन—नाहीं जा.

चित्रपाल—मी तुह्मांला बागेंत कशाकरितां पाठवितों हें तुह्मांला कुठं ठाऊक आहे? जा तुह्मी. पहा, पहा कशी त्याच्याशीं हंसत आनंदांत गोष्टी करीत चाललीं आहे. जशी कांहीं त्याच्या लग्नाचीच बायको. ह्या दुष्टांनों, धडधडीत माझ्या डोळ्यांत धूळ फेंकूं पाहतां काय! (मुलास) खेळ बाळ खेळ, तूं खेळ, तुझी आई खेळ खेळतेच आहे; आणि मीही खेळ खेळतों. पण माझा खेळ इतका तिरस्करणीय होईल कीं, त्यापासून मला सडून सडून मरावं लागेल. आणि मरणानंतर सुद्धां तो माझ्या आत्म्याला बोंचून बोंचून खाईल. अरेरे, या जारिणीनं माझ्या शुद्ध नांवाला कलंक लावला! आणि या जगांत असे कित्येक बैलोबा आहेत कीं, त्यांच्या बायका व्यभिचारिणी असून पतिव्रता दिसतात. बैलच ते! त्यांच्या ध्यानीं मनीं तरी येत असेल काय कीं जिला आपण आपली अशी ह्मणतों ती जवळच्याच एखाद्या तरुण पुरुषावर आसक्त असेल ह्मणून. अरेरे, ह्या स्त्रिया—

पद [तन दरेना तानदीम]

किति असति कुमति युवती ॥ मधु वदनीं खर वसे जहर मनिं । न चंचलाही चंचल याहुनि ध्रु० ॥ क्षणांत हसतीं क्षणांत रडती ॥ अति प्रीति वरकांति दाविती ॥ १ ॥ अगम्य हें स्त्रीचरित्र जगतीं ॥ कुंठित झाली सुरमुनिवरमति ॥२॥

कसं काय बाळ?

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जयसेन—बाबा, मी तुमच्यासारखा आहें असं सर्व ह्मणतात नाहीं बरं ?

चित्रपाळ—होय, आणि एवढ्यांतच कांहींसं समाधान आहे. (पाहून) कोण विश्वासराव, तुह्मी का आहांत ?

विश्वासराव—होय सरकार.

चित्रपाल—जा बाळ, तिकडेस जाऊन खेळ अं. [तो जातो] विश्वासराव, हे राजश्री कांहीं दिवस इथं राहणार ?

विश्वासराव—जी होय. त्यांना राहून घेण्याविषयीं आपण पराकाष्ठेचा आग्रह करीत होतां, पण ते कांहीं केल्या आपला हेका सोडीनात.

चित्रपाल—पाहिलंत ना हें तुह्मीं ?

विश्वासराव—आपल्या विनंतीला ते कांहीं केल्या रुकार देईनात, आपला आग्रह चाललाच होता, आणि ते आपल्या कामाची निकड दाखवीतच होते.

चित्रपाल—एकूण तुमचं लक्ष होतं तर ?

विश्वासराव—जी होय.

चित्रपाल—(उसासा टाकून) झाली. इतक्यांतच चित्रपाल महाराज असे असे आहेत, ह्मणून कुजबूज व्हावयाला सुरवात झाली. माझ्या ध्यानांत येण्यापूर्वीच ही गोष्ट कित्येकांना समजून चुकली असेल. [उघड] मग हे कां राहिले ? तुह्मांला कसं वाटतं ?

विश्वासराव—आईसाहेबांनीं आग्रह केला म्हणून. दुसरं काय !

चित्रपाल—अस्सं अं, ठीक ! पण नाहीं—बरं पण

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हें तुम्हालाच समजलं आहे कीं, आणखी कुणाला समजलं आहे? कारण तुम्ही विलक्षण धोरणी आहांत; कोणतीही गोष्ट तुमच्या लवकर ध्यानांत येते.

विश्वासराव—ही गोष्ट मलाच समजली असं नाहीं; तर बहुतेकांना समजलं आहे कीं, शूरसेनमहाराज आणखीं कांहीं दिवस इथ राहणार म्हणून.

चित्रपाल—पण तें कां हें कुणाला समजलं नसेल.

विश्वासराव—आपली आणि राणीसाहेबांची मर्जी सुप्रसन्न व्हांवी म्हणून दुसरं काय!

चित्रपाल--राणीसाहेबांची एवढ्यानं बस्स नाहीं झालं. विश्वासराव, तुम्हांला आजपर्यंत मी विश्वासूक समजत होतों. परंतु त्याप्रमाणें तुम्ही नाहीं अशी माझी पक्की खात्री झाली.

विश्वासराव--सरकार, असं कशावरून आपल्याला वाटलं! असं कधीं तरी होईल का!

चित्रपाल—होईल का? झालंच आहे. मी ह्मणतों तुह्मी विश्वासूक नाहीं, आणि इतक्या उपर तुह्मी आपल्याला विश्वासू ह्मणवीत असाल तर-

पद [विपरित ही कल्पना.] ता. त्रिवट रा. हमीर.

सत्य न कां वदतां। मजशीं। काय ह्मणोनी भय मनिं धारितां॥ ध्रु०॥ विदित असे जी गोष्ट तुह्मांसी। मजपाशीं ती गुप्तची कैसी॥ ठेवितसां भ्रम झाला मतिसी। नेत्र असुनि कां अंधचि होतां॥ १॥

विश्वासराव—सरकार, आपल्या बोलण्यांतील भाव मला मुळींच समजला नाहीं.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पद [तानों तानों तों तानदरेना] ता. त्रिवट.

प्रमाद काय प्रभो घडला । मम करिं आजि तो कथन करा मज । कसा भरंवसा तरि गेला ॥ ध्रु० ॥ विदित असुनि मज तुह्मां न कथितां । गोष्ट कोणती ठेवियली । अति गुप्त अशी । न कळे मज ती । विसरुनि अथवा राहिलि असली क्षमा करावी तरि मजला ॥ १ ॥

महाराजांनीं असं संदिग्ध बोलूं नये. काय तें स्पष्ट सांगावं, अशी हात जोडून माझी प्रार्थना आहे.

चित्रपाल——विश्वासराव, ती गोष्ट तुह्मांला माहीत असलीच पाहिजे, इतकंच नाहीं तर ती तुमच्या दृष्टोत्पत्तीला देखील आली असेल; आणि तसें नसेल तर——

साकी.

बधिर अंधचि झाला तुह्मीं कर्ण नयनही असुनी । तुह्मां न जरि ती कळे काय तरि कळे तुह्मां लागोनी । झालि अहा दयिता । कैशी परपुरुषासक्ता ॥ १ ॥

या गोष्टीविषयीं तुमची पक्की खात्री झालीच आहे, आणि एकदां ती व्यभिचारिणी आहे असं आपल्या तोंडानं ह्मणा कीं झालीच माझी खात्री. तर याविषयीं तुह्मांला उघड अशीं कोणतीं प्रमाणं दिसलीं तीं सांगा पाहूं ?

विश्वासराव——सरकार, आपल्या पुढं आह्मीं यःकश्चित् सेवकांनीं काय बोलावं, पण दुसरा कोणी असता आणि त्यानं आमच्या मातोश्री राणीसाहेबांच्या संबंधानं असले घाणेरडे उद्गार काढले असते तर त्याची

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जीभच हंसडली असती. सरकार, हा आपला कांहीं तरी संशय आहे. आईसाहेबांच्या हातून ही गोष्ट कधींही घडायची नाहीं.

चित्रपाल––काय विश्वासराव, एकमेकांच्या कानाला कान लावणं, गालाला गाल लावणं, हंसणं, खिदळणं, सुस्कारे टाकणं, दिवस मावळून मध्यरात्र केव्हां येईल ह्मणून वाट पहात बसणं, विशेष सलगीन वागणं, एकांतस्थलाची इच्छा करणं, हें कांहींच नाहीं अं ? हें कांहींच नसेल तर––

पद (झंपा)

नसे जगतिं ही तथ्य नच हींत कांहीं । व्यापिजें
भुवन नच गगन तेंही ॥ मित्र शशि त्यापरी
तारका सकलही । दिसति ज्या त्या स्थलीं शून्य
त्याही ॥ शूरसेनहि न तो चित्रपालहि न मी ।
पत्नि मम ही न जयसेन सुतही ॥ १ ॥

विश्वासराव––सरकार, लवकर ही कुकल्पना मनांतून काढून टाका कशी. कारण इचा परिणाम फार भयंकर होईल.

चित्रपाल––कांहीं ह्मणा, कल्पना खरी आहे.

विश्वासराव––नाहीं सरकार, इथें आपण चुकतां.

चित्रपाल––नाहीं, नाहीं, विश्वासराव, तुह्मीं चुकतां असं मी ह्मणतों. नाहीं, पण तसंही नाहीं, तुह्मीं जाणून बुजून वेड पांघरतां आहांत !

विश्वासराव––महाराज, आईसाहेबांबद्दल आपल्याला ज्याच्याविषयीं संशय येतो तो पुरुष तरी कोणता ?

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चित्रपाल—कोणता, कोणता तो नाहीं का ठाऊक? ज्यानं तिला आपलीशी करून ठेविली आहे तो. तो विलासपुरचा लुच्या, मानकाप्या, (थांबून) आपल्या हिताप्रमाणें जर माझ्या कीर्तीकडे लक्ष देणारा असा माझा एखादा विश्वासू नोकर असता, तर त्यानं केव्हांच माझ्या अंतःकरणांत होत असलेली कालवाकालव नाहींशी केली असती. फार कशाला, मनावर घ्याल तर विश्वासराव तुह्मी सुद्धां, कारण जितकी आकाशाला पृथ्वीची आणि पृथ्वीला आकाशाची स्थिति माहीत आहे तितकीच या वेळीं माझ्या अंतःकरणाची सर्व स्थिति तुह्मांला माहीत आहे. हें पहा, दुधाच्या पेल्यांत एवढीशी पूड कीं झालंच काम; मग शत्रूला अखेरचा रामराम, असा पेला मी तर मोठ्या आनंदानं घेईन.

विश्वासराव—सरकार, माझ्या हातून हें काम होणार नाहीं, असं नाहीं, पण मी जो पेला देईन त्याचे परिणाम क्षणिक नसून कालांतरानं आपल्याला दिसून येतील. पण सरकार, आपण ह्मणतां अशा प्रकारच्या आमच्या मातोश्री राणीसाहेब असतील अशी माझी मनोदेवता मला सांगत नाहीं.

चित्रपाल—तर मग माझ्या बुद्धीला भ्रम झाला असं का तुह्मांला वाटतं ?

विश्वासराव—महाराज, आपण असं ह्मणतां तर मी त्या शूरसेनाला नाहींसा करीन, पण राणीसाहेबाविषयीं आपल्या मनांत आलेली कुकल्पना घालवून त्यांच्यावर आपण पूर्ण प्रेम करावं, अशी मी आपल्यापाशीं विनंती करतों. मी असं ह्मणतों यांत माझा हेतु एवढाच

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कीं, धाकट्या महाराजांबद्दल कोणीं भलत्याच कल्पना करूं नये, आणि आपली दरबारांत किंवा दुसऱ्या कुठें-ही या गोष्टीची चर्चा होऊं नये.

चित्रपाल––माझ्या मनांतलीच गोष्ट तुह्मीं सांगि-तलीत; मी तिच्या दोषाची मुळींच वल्गना करीत नाहीं.

विश्वासराव—तर मग महाराज, आपण आतां स्वस्थ असा. मनांतील सर्व किल्मिष घालवून नेहमींप्र-माणें आनंदी वृत्ति ठेवा. नाहींतर आपली ही चलबि-चल झालेली वृत्ति पाहून शूरसेनाला कदाचित् संशय येण्याचा संभव आहे.

चित्रपाल––चला तर, एवढं माझं काम करा, ह्म-णजे मी तुम्हांला आपला प्राणच समजेन. असं कराय-ला चुकाल तर मात्र प्राणाला मुकाल.

विश्वासराव—तें मी करतों त्याची काळजी नको.

चित्रपाल—तुम्ही सांगितल्याप्रमाणं त्यांना संशय न येईल अशा तऱ्हेनं मी वर्तन ठेवितों. (जातो)

विश्वासराव—(सुस्कारा टाकून) हा मंदभागिनी राज्ञी, तुझ्याविषयीं राजाच्या मनांत काय कुत्सित क-ल्पना आली ही! आणि मीही पण कसा पेंचांत सांप-डलों आहें पहा—

पद—(सखे अशी धरीसि) दादरा.

नृपकार्य हें मी या क्षणीं जरी न करी तरी ॥ध्रु॥ हरिलचि तो मत्प्राणा सोडुनी दया ॥ वनलासे निष्ठुर तो पूर्ण अंतरीं ॥ १ ॥ निरपराधि त्या नृ-पास वधिन मी जरी ॥ घोर तमीं मज दडपिल खचित यम तरी ॥ २ ॥

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आपल्या मित्राविषयीं आमचे महाराज इतके कठोर कसे झाले कांहीं समजत नाहीं. कुणी त्यांची बुद्धि भ्रष्ट केली असेल ती असो, मला त्या शूरसेन महाराजांना विष द्यायला सांगितलं, पण मी तें कसं देऊं? छे, छे, असं नीच कृत्य करायला मी कधींही प्रवृत्त होणार नाहीं.

पद—(शूद्रविप्रवरमूर्ख)

प्रसन्न होउनि भूपति मज निज राज्य जरी तें देई ॥ तरी न लाविन कलंक स्वकुला दुष्कृतीनें त्या पाही ॥ जावो गेला प्राण जरी ॥ पर्वा त्याची मज न तरी ॥ १ ॥

हें काम जर मीं केलें नाहीं आणि इथें राहिलों तर मला या जगाला अखेरचाच रामराम ठोकावा लागेल. तेव्हां हें राज्य सोडून जावं हें फार उत्तम. (पाहून) अरे पण हे शूरसेन महाराजच इकडे येत आहेत.

शूरसेन—(स्वगत) चमत्कार आहे मोठा! माझ्याशीं एक शद्ब सुद्धां बोलूं नये अं, (उघड) कसं काय विश्वासराव, ठीक आहेना ?

विश्वासराव—महाराजांच्या कृपेनं सर्व कांहीं ठीक आहे.

शूरसेन—कांहीं नवल विशेष ?

विश्वासराव—कांहीं नाहीं महाराज.

शूरसेन—विश्वासराव—

पद—(केलीस अशी काय)

भूपतिचें वदन असें म्लान कां दिसे ॥ गेलें कीं काय जणूं राज्य गमतसे ॥ ध्रु० ॥ एकहि नच

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शद्ब कसा वदत मजासि तो ॥ पाहुनि मज निज दृष्टि उलट फिरवितो ॥ मजविषयीं फार तिरस्कार दावितो ॥ जातां तत्सन्निध मी दूर होतसे ॥

विश्वासराव—महाराज, असं कां तें मी काय सांगूं? आणि कसं सांगूं?

शूरसेन—काय सांगूं आणि कसं सांगूं? तर मग तुम्हांला माहीत आहे. पण माहीत असून तुमच्यानं सांगवत नाहीं अं, विश्वासराव, तुमची चर्या मला पालटलेली दिसते, आणि त्याबरोबर माझीही पालटत चालली आहे. यावरून मला असं वाटतं कीं या गोष्टींत माझा कांहीं तरी संबंध असावा. नाहीं तर तुमचं असं खिन्न वदन कां?

विश्वासराव—होय सरकार, आपला तर्क अगदीं खरा आहे. आणि आपणच त्या गोष्टीला कारण आहांत, पण त्यांत आपलं अंग मात्र नाहीं.

शूरसेन—काय मी कारण आहें; पण त्यांत माझं अंग नाहीं? तर मग मला तुह्मीं मण्यारीप्रमाणें तर समजत नाहीं? पण तिची छाया पडली ह्मणजे माणसं मरतात, आणि माझ्या छायेखालीं आजपर्यंत पुष्कळांचं कल्याण झालं आहे. कुणी मेलेला कांहीं मला आठवत नाहीं. विश्वासराव—

पद (नवकुसुमांच्या वासानें.)

कुलिन तुह्मी अहांत तैसे चतुरही बुद्धिबलानें। आमुच्याहुनि बहु अनुभव तुह्मां आलासे वयमानें। सांगा तरि हो सुमार्ग होइल मम हित ज्या योगानें। कांहीं न मजसीं चोरुनि ठेवा पुसतों मी प्रेमानें। सांगत कां नाहीं। संशयीं माझें मन राही ॥ १ ॥

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विश्वासराव—महाराज, मला सांगायला धीर होत नाहीं.

शूरसेन—मी कारण असून मला समजूं नये अं! छे, छे, विश्वासराव मला कळलंच पाहिजे.

साकी.

वंद्य असुनि तुह्मि काय तुह्मा मी दुखविन ऐसें गमतें। काय ह्मणुनि भय धरितां ऐसें स्पष्ट वदाना कां तें। संकट काय असें। वाटे तुह्मां येइलसें ॥ १ ॥

विश्वासराव—इतकं ह्मटल्यावर आतां मला सांगितलंच पाहिजे. आणि मी काय सांगतों तें ऐकून त्याप्रमाणें आपण ताबडतोब वागलं पाहिजे. नाहीं तर आपल्याला दोघांनाही मृत्युमुखांत पडावं लागेल. मग कसं काय ?

शूरसेन—कबूल पण सांगा लवकर !

विश्वासराव—आपल्याला ठार मारण्याविषयीं आज्ञा केली आहे.

शूरसेन—कोणी ?

विश्वासराव—महाराजांनीं.

शूरसेन—आणि ती काय ह्मणून ?

विश्वासराव—त्यांना वाटतं; नाहीं–त्यांची पूर्ण खात्री झाली आहे, जसं काय त्यांनीं पाहिलं, आणि धरलंही आहे–असं ते ह्मणतात, कीं, राणीसाहेबांचा नी आपला—

शूरसेन—शिव, शिव, काय हा संशय! अशी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गोष्ट माझ्या हातून कधीं तरी होईल कां! आणि जर झाली असेल तर––

पद (झंपा)

झणिं जाउ तनु होउनी दग्ध माझी। वा पडुत तींत कृमि सत्य आजी ॥ ध्रु० ॥ कधिंही नच देखिल्या ऐकिल्याही तशा। मिळुत मज यातना घोर ऐशा। वुध न उच्चारु मन्नाम वाचे कधीं। धरणि ही न धरु हा अधम खलधी ॥ १ ॥

विश्वासराव––महाराज, आपण आणखी हजारों शपथा घेऊन जरी सांगितलं तरी सुद्धां त्यांच्या मनांतला संशय नाहींसा व्हायचा नाहीं.

पद (वैराग्य असें प्राप्त तुला.)

योग्य नसे कारण ज्या एकही खरें। जरि असा विकल्प मानवांतरीं शिरे। कधीं न होइ दूर तो विधिच्चिया करें। नवल काय मग जरी ती नरमती हरे ॥ १ ॥

शूरसेन—पण ही कुकल्पना त्यांच्या मनांत आली तरी कशी?

विश्वासराव—कशी आली हा विचार करीत बसण्यापेक्षां हें संकट टाळण्याचा उपाय योजावा हें फार उत्तम. माझ्यावर जर आपला भरंवसा असेल तर कुणाला न कळत मी आपल्याला इथून युक्तीनं काढून लावतों. माझ्याविषयीं आपल्या मनांत संशय येत असेल तर मीही आपल्याबरोबर यायला तयार आहें. आपल्या सर्व लोकांना मी ही गोष्ट कळवून त्यांना दोन दोन तीन तीन असे वेशींतून नगरा बाहेर सुरक्षित काढून लावीन. म-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हाराज, मी सांगितलं हें खरं आहे. याविषयीं मनांत संशय ठेवूं नका. माझ्या खरेपणाविषयीं शोध करायच्या भरीस पडाल, तर आणखी काय संकट येईल तें माझ्यानं सांगवत नाहीं. इतक्या उपर जर आपल्याला निर्भय आहों असं वाटत असेल, तर वाघाच्या जबड्यांत सांपडलेला मनुष्य जितका निर्भय असायचा तितकेच आपण आहांत असं समजा.

शूरसेन—मला तुमच्या खरेपणाविषयीं मुळींच संशय येत नाहीं. राजाच्या चर्येवरूनच मी त्याचं अंतःकरण पूर्ण ओळखलं आहे. चला तर मला या संकटांतून लवकर मुक्त करा. माझ्या राज्यांत गेल्यावर माझ्या हातून होईल तितकं मी तुमचं कल्याण करीन. माझीं जहाजं तयार आहेत. दोन दिवसांपूर्वींच माझ्या लोकांनीं माझी वाट पाहिली असेल! (दुःखानं) अरेरे, पण त्या पुण्यशील वहिनीची तो कठोर बनलेला माझा मित्र काय विटंबना करील कोण जाणें! माझ्याकडून तिला कांहींच साह्य होण्यासारखं नाहीं. तर परमेश्वरा! तूंच तिचं रक्षण कर ही माझी हात जोडून तुला प्रार्थना आहे. चला विश्वासराव, मला माझ्या राज्यांत नेऊन सोडा, ह्मणजे तुह्मींच मला प्राणदान दिलं असं मी समजेन.

विश्वासराव—महाराज, वेशीच्या किल्ल्या माझ्याच ताब्यांत आहेत. आपण मात्र निघण्याची त्वरा करा, चला—

शूरसेन—एकूण या मैत्रीचा परिणाम असा व्हावा अं? अथवा—

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

साकी.

अघटित विधीची घटना ऐसें मानुनि स्वस्थ रहावें । नातरि मत्सर पिसें असें कां नृपमनिं व्यर्थ शिरावें । कैशी त्याचि मती । गेलि होउनि मूढ अती ॥ १ ॥

अंक १ ला समाप्त.

अंक २ रा.

प्रवेश १ पहिला.

[स्थळ राजवाडा—चंपावती, जयसेन, चंपा व कमला दासी]

चंपावती—घ्या बाई या मुलाला आपल्या जवळ कोणी तरी; मघांपासून यानं किनई मला अगदीं भंडावून सोडलं आहे.

कमळा—या, माझे छबुकडे महाराज ते ! खेळतां का माझ्याबरोबर ?

जयसेन—नाहीं जा मी नाहीं तुझ्याबरोबर खेळत.

कमळा—कां बरं ?

जयसेन—कां बरं ह्मणजे ! तूं माझे मुके घेतेस ह्मणून ! जसा काय मी अगदीं कुकूबाळ आहें असं तुला वाटतं होय, मी नाहींच तुझ्याजवळ यायचा जा. (दुसरीला) मी तुझ्याजवळ येईन ग ?

बकुला—माझ्या जवळच काय अधिक आहे ?

जयसेन—तुझ्या भिवया काळ्या आहेत, ह्मणून नाहीं कांहीं ! बाकी काळ्या भिंवया बायकांना चांगल्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शोभतात, पण त्या कशा, फार दाट नसून अर्धचंद्राकृति अशा असल्या तर--

बकुला---बाई बाई ! कोणी तरी आपल्याला शिकवलं हें !

जयसेन---कोणी .ह्मणजे ? मला अगदीं कांहींच कळत नाहीं असं तुला वाटतं होय ! (पहिलीला) तुझ्या भिंवया कोणत्या रंगाच्या आहेत ग !

कमला---महाराज तांबड्या आहेत.

जयसेन---हें कांहीं तरी मला फसवावं ह्मणून सांगतेस झालं; बायकांचे गाल तांबडे असलेले मी पाहिले आहेत, मण भिंवया नाहीं कुठे पाहिल्या.

कमळा---हें बघा महाराज, आतां किंनाई आपल्याला एक भाऊ होणार आहे, मग त्याला आह्मीं घेऊन खेळवूं. तेव्हां मग कसे आपोआप त्याला घेण्याकरितां आमच्या पाठीमागून याल.

बकुला---आतां किंनाई बाईसाहेबांचे दिवस अगदीं भरत आले आहेत. तेव्हां देवदयेनं लवकरच त्यांची नीट रितीनं एकदांची सुटका झाली ह्मणजे झालं.

चंपावती---हें ग काय त्याला तुह्मीं भलभलतंच सांगता हें ? हा काय मेला चावटपणा ! ये बाळा बैस असा माझ्याजवळ नी मला एखादी छानदारशी गोष्ट सांग पाहूं.

जयसेन---आई, तुला कसली गोष्ट सांगूं ? राक्षसाची सांगू किं पोपटाची सांगूं ?

चंपावती---तुला चांगलीशी येत असेल ती सांग.

जयसेन---मला एक राक्षसाची गोष्ट येते आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चंपावती--अरे लबाडा, राक्षसाची गोष्ट सांगून तूं मला भिववणार वाटतं ! पण मीं नाहीं भ्यायची हो! बरं सांग तर मग.

जयसेन--एक किंनई आपला बुवा होता बुवा,

चंपावती--अरे पण आधीं नीट खालीं बैस; हं सांग आतां

जयसेन--तो किंनई स्मशानांत रहात असे. नाहीं, पण मी अगदीं हळूच सांगेन. यासटवायांना ऐकूं जाणार नाहीं असं सांगेन.

चंपावती--बरं हळूच सांग. अगदीं माझ्या कानांत सांग मग तर झालं कीं नाहीं ?

(चित्रपाल, सुबुद्धी, आदीकरून सरदार वगैरे येतात.)

चित्रपाल--काय ? तुह्मीं त्याला तिथ पाहिलं ह्मणतां ? त्याचे लोकही त्याच्या बरोबर होते ? आणि विश्वासराव सुद्धां ?

१ सरदार--दाट झाडीच्या आडून पळून जातांनां मीं त्यांना पाहिलं, पण इतक्या सपाट्यानं ते चालले होते कीं सांगतां सोय नाहीं. अगदीं तारवावर जाईपर्यंत माझी नजर होती.

चित्रपाल--असं होईल ह्मणून मला वाटलंच होतं. मीं तर्क केला तो कांहीं खोटा नाहीं. त्या हरामखोराला तो विश्वासराव सामील झाला अं ? वाहवारे विश्वासराव, चांगला तूं आपला विश्वास दाखवलास. माझा प्राण, तसंच माझं राज्य हरण करण्याचा त्यांचा बेत होता खरा. माझ्या सर्व कल्पना मला आतां खऱ्या वाटूं लागल्या. माझी मसलत फसली ही एक त्या दोघांना

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

माझ्याकडे बोट दाखविण्याला जागा झाली असेल नाहीं? पण वेशीचे दरवाजे इतक्या पहांटेस कसे उघडले हो?

सरदार––सरकार, आपल्या आज्ञेवरून वेशीच्या किल्ल्या त्यांच्याच ताब्यांत असत. यापूर्वी कित्येक वेळां त्यांनीं असेच वेशीचे दरवाजे उघडले होते!

चित्रपाल–होय मला आहे माहीत! (राणीला) इकडे दे त्या जयसेनाला? तो तुझ्याजवळ असलेला मला नाहीं खपत.

चंपावती––हें काय पण, ही कसली थट्टा?

चित्रपाल––(सेवकांना) याला तिकडे घेऊन जा. हा हिच्याजवळ असलेला मला खपत नाहीं. हिची करमणूक व्हायला पाहिजे असेल तर यापुढं जें होईल तें करील. तें माझं नाहीं, त्या दगलबाजाचं.

चंपावती––अगबाई काय मी ऐकतें हें! आज काय हें भलतं सलतं बोलायचं! ऐकलं कुणी तर काय म्हणेल?

चित्रपाल––दुसरं काय म्हणणार हेंच कीं नाहीं!

साकी

रतिहुनि सुंदर असुनि युवति ही थोर कुलीं झालेली॥
दुष्पथगामिनि पहा निघाली व्यर्थचि जन्मा आली॥
अति सुंदर युवती॥ क्वचित सुवर्तिनि जागिं निघती॥१॥

असं म्हणणं मला शोभतं का? पण काय करूं? खोट्याला खोटं म्हटलंच पाहिजे. आपली बायको झाली म्हणून काय झालं? ती जर जारिणी असेल तर तिला जारिणी हें म्हटलंच पाहिजे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चंपावती—हायरे देवा ! असं बोलणं ऐकायला माझे कान तरी कसे धड राहिले !

पद—(मृत्यूची कल्पना ही.) त्रिवट.

अन्यायी नसुनि कां हा दोष वृथा लावितां ॥
दुःसहशा वच शरांनीं कां हृदया भेदितां ॥ धृ ॥
॥ चाल ॥ दुष्ट कल्पना ही मजविषयीं । कोठु-
नि आली अपुल्या हृदयीं । झाला कीं हा भ्रम
चित्ता । काय कथा मज अतां ॥ १ ॥

चित्रपाल—काय भ्रम, आणि मला झाला? नाहीं मला नाहीं झाला. तुला झाला. आणि म्हणूनच शूरसेन हा चित्रपाल आहे असं तुला वाटलं? अग, पण नाहीं, तुला अग म्हणण्यापेक्षां जारिणी याच शब्दानं तुला हाक मारावी हें मला बरं वाटतं. तुझ्यासारख्या कुलटेला कुलवधू समजून हाक मारणं, आणि त्या गळेकापूला स्नेही समजून राजाधिराज म्हणणं सारखंच. तडाच तो विश्वासराव दलाल-दलाल-होती कीं नाहीं त्याची तुला मदत, बोल! अग निर्लज्जे, या दुष्कर्माला प्रवृत्त होतांना तूं स्वतःला सुद्धां विसरलीसना? प्रत्यक्ष बाजारबसव्या सुद्धां अशा गोष्टीला धजणार नाहींत. त्यांच्या पळून जाण्याच्या मसलतींत तुझं आंग नव्हतं, बोल!

चंपावती—नाहीं बरं महाराज! अंबाबाईची शपथ वाहून मीं आपल्याला सांगतें कीं, यांतलं एक अवाक्षर सुद्धां मला माहीत नाहीं बरं!

पद (जन्म या मानसीं.)

गांजितां मला कां नाथा । वायां । पडतें । पायां ।
राया ॥ अदयता अशी कां धरितां ॥ ध्रु० ॥
कुभांड भलतें मजवरि अजि तें । कां रचितां । नृ-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पनाथा ॥ गांजितां ॥ १ ॥ अप्रिय झाली । आज
कशी तरी । प्रिय कांता निज कांता ॥ गांजि० ॥२॥

महाराज, हे सारं कुभांड आहे असं जेव्हां आपल्याला कळून येईल तेव्हां रागाच्या आवेशांत जें आपण बोलाल नि कराल तेवढंच मात्र राहील. नाहीं बरं महाराज, हा संताप कांहीं चांगला नाहीं.

चित्रपाल—बस् पुरे कर, दुष्टे तुला आतां जगांतूनच नाहींशी करायला पाहिजे होती ! पण नाहीं तुला बंदींत टाकतों.

चंपावती—सध्यां माझे ग्रह फिरले आहेत तेव्हां जें जें माझ्या नशीबीं असेल तें मला आतां भोगलंच पाहिजे.

पद (अंजनीगीत) धुमाळी.

येई न पाणी माझ्या नयनीं । शोकाग्नीनें गेले सु-
कुनी । सदया अदय न व्हावें स्वमनीं । हीच
पदीं विनती ॥ १ ॥

माझ्या हातून दुष्कर्म घडलं असेल तर त्या परमेश्वराला डोळे.

चित्रपाल—परमेश्वराला—पक्कं माहीत आहे—कोण आहे रे तिकडे—(शिपाई येतो,) हिला बंदींत नेऊन टाक.

चंपावती—हाय रे दैवा—

पद (वदनचंद्र.)

कांतवचन ऐकुनियां हृदय बहू कांपतसे । गग-
नांतुनि वीज जणूं पडली शिरीं वाटतसे । काय
कहर अबलेवर आज असा होत असे । नसुनि
मदन्याय कांहिं डाग कसा लागतसे ॥ १ ॥

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

महाराज, आतां माझी विनंति ह्मणून एवढीच कीं, या माझ्या दासी माझ्याबरोबर असूंद्या, सध्यां त्यांची मला जरूर आहे. (दासींना) काय ग तुह्मीं अशा रडतां कां? खुळ्या कुठल्या, रडायला काय झालं ? अधीं डोळे पुसा पाहूं. अग हा कारागृहवास परमेश्वरानं माझ्या बऱ्याकरतां दिला नसेल कशावरून ? महाराज, आजपर्यंत आपल्या जिवाला दुःख होईल ह्मणून मी पुष्कळ जपत होतें. पण आतां काय त्याचं (दासींना) चला ग माझ्याबरोबर; माझ्याबरोबर यायला आहे बरं तुह्माला परवानगी. (मुलाला) बाळा जयसेना !

जयसेन—आई मी येतों ग तुझ्याबरोबर ! (आईच्या कमरेला मिठी मारतो व राजा त्याला ओढून नेतो.)

चंपावती—हाय हाय रे देवा—

पद (एकमेकींप्रती बोलती.) दीपचंदी.

पतीमन कसें जाहलें अदय असें आजवरी पहा होतें । पूर्ण दयेनें भरलें जें ॥ ध्रु० ॥ प्रथम प्रेम बहु हें दावुनी । चिरिती कंठ नर शेवटीं ॥ आजवरी० ॥ १ ॥ अथवा अतिशय प्रेमचि तें बहु दिन न टिके या जनीं ॥ आजवरी० ॥ २ ॥

(शिपायासह राणी जाते.)

१ **सरदार**—महाराज, राणीसाहेबांना कारागृहांत पाठवूं नये अशी माझी हात जोडून प्रार्थना आहे.

सुबुद्धी—सरकार, आपण काय करतां आहांत याचा नीट विचार करावा. नाहीं तर आपण न्याय ह्मणून करायला जाल आणि तो जगांत अन्याय ह्मणून ठरेल. आणि असं झालं तर तें सगळ्या राजकुलाला घातुक होईल.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

१ **सरदार**—सरकार, राणीसाहेब गंगाजलाप्रमाणं निर्मळ आहेत. त्यांच्यावर आपला वृथा दोषारोप आहे.

सुबुद्धी—सरकार, राणीसाहेबांबद्दल अशी अभद्र कल्पना ह्मणजे जगांत पतिव्रतांचा आभाव. आणि मग सगळी स्त्रीजात कोंडूनच ठेवावी लागेल.

चित्रपाल—बस् पुरे करा, जास्त बोलूं नका.

सुबुद्धी—सरकार, आमचं बोलणं आपल्या फायद्याचं आहे. जगांत पतिव्रताच नाहींत म्हणजे आजच जग संपलं असं ह्मणावं लागेल.

चित्रपाल—पुरे पुरे, हातच्या कंकणाला तुह्मालां आरसा लागूं लागला, तेव्हां तुम्हीं जिवंत असून मृतांतच तुमची गणना केली पाहिजे. माझ्या बोलण्यावर तुमचा भरंवसा नाहीं अं ?

१ **सरदार**—परमेश्वर करो आणि न बसो—आणि आपला संशय खोटा ठरून राणीसाहेब निर्दोषी ठरतील तर त्यापासून आम्हांला जास्तच आनंद होईल. मी असं म्हणतों म्हणून आपल्याला राग आला तरी हरकत नाहीं.

चित्रपाल—मला तुमच्याबरोबर वादविवाद करण्याची जरूर नाहीं. आणि तुमचा उपदेश तरी ऐकण्याची मला काय जरूर ? माझा संशय जर तुम्हांला निराधार वाटत असेल, अथवा तसा नसून तसा आहे असं मुद्दाम दाखविण्याचा प्रयत्न करीत असाल तर तुम्हांला एकच सांगतों कीं, तुमचा उपदेश मला नको आहे. कांहीं नफा नुकसान झालं तर तें माझं होईल. तें सोसायला मी तयार आहें.

सुबुद्धी—पण सरकार, या गोष्टीचा इतका बोभाटा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

केला नसता आणि मनांतच ठेविली असती तर चांगलं झालं नसतं ?

चित्रपाल--पण असं कसं होईल ? सुबुद्धी तुम्ही इतके फुकट वाढलांत मात्र-यापेक्षां तुम्ही उपजत मूर्ख निघालां असतां तर फार बरं होतं; कारण जी गोष्ट कित्येकांनीं प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिली आहे ती प्रसिद्ध झाल्यावांचून कशी राहील. तरीसुद्धां याविषयीं जास्त खात्री होण्याकरतां आणि अशा महत्वाच्या प्रकरणांत असा उतावीळपणा करणं चांगलं नाहीं म्हणून हिमाचलावर आनंदाश्रमांत आमचे कुलगुरु सदानंदस्वामी हे रहात असतात, त्यांच्याकडे भालचंद्र आणि वसंत यांना पत्र देऊन मीं पाठविलें आहेत, ते आल्यावर गुरुजींकडून या गोष्टीचा सर्व खुलासा होईल; कारण ते त्रिकालज्ञ आहेत. मग त्यांच्याकडून जसा निरोप येईल तसं करूं. कां मीं केलं हें तुह्माला पसंत आहेना ?

१ **सरदार**--बरं आहे सरकार !

चित्रपाल--कारण मला जीं सबळ प्रमाणं दिसलीं त्यांवरून मीं जें केलं तें गैर नाहीं अशी जरी माझी खात्री आहे तरी पौरजनांची खात्री करण्याकरितां कुलगुरूंचं आज्ञापत्र आलं ह्मणजे बरं होईल-चला तर.

(सर्व जातात.)

(प्रवेश दुसरा)

[**स्थल**-कारागृह-पात्रें-सारजा आणि दासी]

सारजा--(दासीस) जाग, रक्षकाला मी आलें आहें ह्मणून सांग, आणि त्याला माझ्याकडे घेऊन ये.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

(दासी जाते) हाय ! हाय ! देवा या राजपत्नीच्या कपाळीं असा हा कारागृहवास यावाना ? अशी माऊली त्रिभुवनांत सुद्धां सांपडणार नाहीं. (रक्षक व दासी येते) (रक्षकाला) मी कोण आहें तीं तूं मला ओळखलंस का ?

रक्षक—हो, तुह्मी महाराजांच्या दाई असून मी तुह्मांला ओळखणार नाहीं असं कसं होईल ?

सारजा—तर मग राणीसाहेबांकडे मला घेऊन चल. मी त्यांना भेटायला आलें आहें.

रक्षक—तेवढं मात्र नांव काढूं नका. त्यांच्याकडे कुणालाही जाऊं देऊं नये अशी महाराजांची मला सक्त ताकीद आहे.

सारजा—हाय रे देवा, त्यांना भेटण्याची सुद्धां बंदी अँ ! बरं, त्यांच्या दासींची तरी गांठ पडेल का ? एकीची तरी, कमळेची ?

रक्षक—या दासीला इथून जायला सांगा; ह्मणजे कमळेला इथे घेऊन येतों.

सारजा—(दासीला.) जा ग जरा तूं इथून (दासी जाते.) हं आण तिला बोलावून.

रक्षक—पण तुमचं बोलणं सर्व माझ्या समोर झालं पाहिजे.

सारजा—बरं बाबा अगदीं तुझ्या समोर, झालं ! जा आतां (जातो) शर्थ झाली बाई. इथं मेली सगळ्याच गोष्टीची बंदी. (रक्षक व दासी येते.) काय ग कमळे, कशा काय राणीसाहेब खुशाल आहेतना ?

कमळा—काय सांगूं बाई, कसे तरी दिवस लोटताहेत झालं ! पण धन्य हो बाई त्यांची. एवढे त्यांच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वर दुःखाचे डोंगर कोसळले आहेतना ? पण एकदां तरी त्याबद्दल त्यांच्या तोंडून दुःखोद्गार निघायचे होते ! छेः नांव नाहीं. उलट आह्मीं कांहीं बोललों तर त्या आमचीच समजूत घालतात. त्या बाळंत झाल्या, हें तुह्मांला कळलं का ?

सारजा——छे, कोण बाई आह्मांला कळविणार ? बरं काय झालं ? मुलगा झाला ना ?

कमळा—नाहीं, मुलगी झाली. कशी पण अगदीं गोरी गोरी पान आहे, तिच्याकडे पाहून राणीसाहेब आपल्या दुःखाचा विसर पाडतात—नि ह्मणतात ‘ बाळे, मीही तुझ्यासारखीच निर्मळ आहें ’

सारजा——त्यांचं ह्मणणं खोटं का आहे; पण महाराजांच्या डोक्यांत भलतंच वेड शिरलं आहे त्याला कोणाचा उपाय ? याबद्दल त्यांना चार गोष्टी सांगायला हव्यात, नि त्या मी सांगणारच; मग त्यांनीं मला चार शिव्या जरी दिल्या तरी पतकरल्या. मी त्यांना लहानाचं मोठं केलं आहे तेव्हां अगदींच ह्मणजे ते माझं सांगणं ऐकणार नाहींत असं मला नाहीं वाटत. इतक्या उपर नच ऐकलं तर काय करायचं बाई, डोकं का फोडून घ्यायचं ? जा कमळे, राणीसाहेबांना ह्मणावं मुलीला जर माझ्या स्वाधीन करीत असाल, तर तिला महाराजांकडे घेऊन जातें, ह्मणजे माझ्या सांगण्यानं जरी त्यांचं अंतःकरण नाहीं द्रवलं तरी तिच्या लडिवाळपणानं तरी द्रवेल.

कमळा—इतकं मनापासून ज्यापेक्षां तुह्मीं हें काम करायच मनांत आणलं आहे त्यापेक्षां खात्रीनं तुह्माला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्यांत यश येईल. नाहीं तर असलं हें जोखमीचं काम आपल्या शिरावर कोण बाई घेणार आहे ? तुह्मी ह्मणूनच घेतां आहां तरी. जरा तुह्मी इथं असा, मी राणीसाहेबांना तुमचा हा बेत कळवून येतें. आज सकाळींच ही गोष्ट त्यांच्या मनांत आली होती, पण सांगायची कुणाला बाई ! नि असलं काम करायला कोण पुढं होणार आहे ?

सारजा—आणखी त्यांना ह्मणावं कीं या कामांत माझ्याकडून करवेल तितकी पराकाष्ठा करून होतां होईल तें काम फत्ते करून येईन कळलं.

कमळा—अंबाबाई या कामांत तुह्माला यश देवो. जरा थांबा. मी राणीसाहेबांना सांगून येतें.

रक्षक—बाई—जरी राणीसाहेबांच्या मनांत तें मूल तुमच्या स्वाधीन करायचं आलं तरी तें तुह्मांला इथून नेऊं द्यावं कीं नाहीं ह्याची मला पंचाईत पडेल. कारण, त्याला महाराजांचा हुकूम पाहिजे.

सारजा—तुला कसली पंचाईत ? अरे बाबा, परमेश्वराच्या कायद्यानं जें मूल नऊ महिने आईच्या उदरांत कैदेंत होतं, तिथून जर त्याची सुटका झाली. तर त्याला या कारागृहांत पुन्हां कोण टाकणार ? राजाचा राग राणीवर; त्या अज्ञान बाळाकडे काय आहे बरं ?

रक्षक—हो तुह्मी ह्मणतां तेंही खरंच.

सारजा—तूं कांहीं घाबरूं नकोस ! महाराज जर तुझ्यावर रागावले तर त्याची जबाबदारी माझ्याकडे समजलास. (जातात.)

———

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

(प्रवेश तिसरा)

(स्थल—राजवाड्यांतील खोली-चित्रपाल आपल्याशीं)

चित्रपाल——ती कुलटा आणि तो तिचा जार हीं जिवंत आहेत तोंपर्यंत माझ्या जिवाला शांति कुठून येणार ? तीं जेव्हां नाहींशीं होतील तेव्हांच माझ्या हृदयांतील कालवाकालव अंशतः तरी कमी होईल. कोण आहे रे तिकडे——

१ सरदार——जी सरकार मीं आहें.

चित्रपाल——जयसेनाची तबेत कशी काय आहे ?

सरदार——रात्रीं त्यांना चांगली झोंप लागली होती, आतां त्यांचं दुखणं गेलंसं वाटतं—

चित्रपाल——तो अजून लहान आहे, त्याला काय समजतं आहे, असो तूं जा! आणि त्याच्या तबेतीचं मान मला वरचेवर येऊन कळींव (जातो.) (विचार करून) छे, छे, त्याविषयीं कांहीं विचार करूं नये हेंच बरं. त्याचा सूड उगवावा असं राहून राहून मनांत येतं पण उपयोग काय ! तो मोठा बलाढ्य आहे! तसंच त्याला मदत करणारेही पुष्कळ आहेत, तेव्हां तूर्त स्वस्थच बसावं हें बरं. वेळ येईल तेव्हां त्यांना पाहून घेईन. पण सध्यां या जारिणीचाच सूड उगवून घ्यावा. त्या विश्वासरावाला आणि त्या शूरसेनाला मनांत मोठा आनंद वाटून ते माझा उपहास करीत असतील ! माझं दुःख ती त्यांची थट्टा अँ! जर ते माझ्या तडाक्यांत सांपडले असते तर त्यांना मींही आपला सपाटा दाखविला असता; पण काय करूं ! असो, ते नाहींत, पण

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ही तर माझ्या ताब्यांत आहेना; हिचाच सूड घ्यावा.

[सारजा मुलीला घेऊन येते]

सेवक—हं हं बाई आंत जाऊं नका.

सारजा—अरे बाबांनो, मला आंत जायला तुह्मी अडथळा करूं नका; बाईसाहेबांच्या जिवापेक्षां महाराजांचा राग कांहीं अधीक नाहीं. असे भितां काय? गरीब बिचारी काय तिच्यावर प्रसंग आणला आहे पहा!

सुबुद्धी—पुरे, सारजाबाई किती बोलाल?

सरदार—बाई, रात्रभर त्यांना झोंप नव्हती ह्मणून त्यांनीं कुणालाही आंत येऊं देऊं नका असं सांगितलं आहे.

सारजा—बाबांनो, इतके नकारे निष्ठुर होऊं. त्यांना झोंप लागावी ह्मणूनच मी आलें आहें; तुह्मी सारे तोंडापुरतं बोलणारे तोंडपुजे, ताज्या घोड्यावरच्या गोमाशा, मग त्यांना झोंप कशी येणार? त्यांनीं उगीच जरी–ऊं–केलं तरी तुम्ही लागलेच सुस्कारे टाकायला लागतां. त्यांच्या डोक्यांत जें वेड भरलं आहे, नि ज्यामुळं त्यांना झोंप येत नाहीं, तें घालविण्याकरितां त्यांना चार हिताच्या गोष्टी–पण त्या कशा अगदीं खऱ्या खऱ्या, तोंड देखल्या नाहींत-सांगायला हल्यात ह्मणून मी आलें आहें.

चित्रपाल—कोण आहे बाहेर? काय गडबड चालली आहे?

सारजा—कांहीं नाहीं महाराज, आपल्याशीं दोन शब्द बोलावे ह्मणून आम्ही बोलतों आहों.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चित्रपाल--सुबुद्धी, या उद्धट थेरडीला इथून हाकून द्या पाहूं. मीं तुह्माला सांगितलं होतंना कुणाला आंत सोडूं नका ह्मणून ? ही बया येईल ह्मणून मला वाटलंच होतं.

सुबुद्धी—सरकार, मी त्यांना पुष्कळ सांगितलं.

चित्रपाल—काय-तुह्माला ही आवरली नाहीं ?

सारजा--महाराज, मला काय ह्मणून आवरायचं ? आपण जशीं भलतींसलतीं कृत्यं करायला प्रवृत्त झालां आहांत तशीं जर माझ्या हातून घडतील तर मात्र मला आवरणारा लागेल. महाराज, मी आपल्याला हातांखांद्यावरून खेळवून लहानाचं मोठं केलं आहे, तेव्हां आपल्याला चार हिताच्या गोष्टी सांगण्याचा मला हक्क आहे कळलं ? मी राणीसाहेबांकडून आलें आहें. आहा रे बायको ! माउली आहे बरं !

चित्रपाल--काय ?

सारजा--माउली आहे बरं महाराज माउली आहे ती !

चित्रपाल--हिला इथून घालवून द्या कशी !

सारजा—मला हात लावण्याची कोणाची पुण्याई आहे ? मीं आपल्या खुषीनं जाईन. पण अगोदर ज्याकरतां आलें तें काम करीन नि मग जाईन. मधें नाहीं जायची. महाराज, राणीसाहेब बाळंत झाल्या नि त्यांना ही मुलगी झाली. ती ही आपल्याकडे आणली आहे. (मुलीला खालीं ठेवते)

चित्रपाल--बाहेर-बाहेर घालवा या जखणीला. लुच्ची कुटणी.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सारजा—कुणाला कुंटीण ह्मणतां महाराज? मी तशी नाहीं नि तसलीं कामंही मी कधीं केलीं नाहींत. पण आपल्याला मात्र वेड लागलं खास. तेव्हां वेडांत जें आपण बडबडतां तें ठीकच आहे.

चित्रपाल—अरे कुणी नाहीं हिला बाहेर घालवून देत? हें जारिणीचं कारटं करा तिच्या स्वाधीन.

सारजा—महाराज, काय या निरपराधी प्राण्यावर भयंकर तोहोमत! महाराज, आपण ह्मणतां असं समजून याच्या केंसाला धक्का लावायला जो कोणी तयार होईल त्याच्या हाताला किडेच पडतील.

चित्रपाल—अरे, असे बायकोला काय भितां?

सारजा— महाराज, दुष्कर्माबद्दल आपल्या अंतःकरणांत जर भीतीचा वास असतां तर बरं झालं असतं! ह्मणजे राणीसाहेबही कारागृहांत न पडत्या नि ही मुलगी आपली नाहीं, असंही आपल्याला वाटतं ना.

चित्रपाल—सगळाच लुच्चांचा बाजार.

सुबुद्धी—मी नाहीं महाराज त्यांतला. अगदीं ईश्वराला स्मरून सांगतों.

सारजा—मीही त्यांतली नाहीं; हे नाहींत, कुणी नाहीं, फक्त एक प्राणी मात्र त्यांतला इथें आहे, नि ते स्वतः महाराजच. कारण ते आपल्या राणीसाहेबांना जयसेनाला नि या मुलीला सर्वांना दोष लावतात. तरवारीच्या धारेपेक्षां सुद्धां यांची जिव्हा तीक्ष्ण आहे.

चित्रपाल—कसं थेरडीचं तोंड चाललं आहे पहा. हिला इथून घालवून द्या कशी. आणि या कारटीला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आणि तिच्या आईला दोघांनाहि नेऊन टाका आगींत. हें कारटं माझं नाहीं.

सारजा—नाहीं बरं महाराज, ही आपलीच मुलगी. आपल्या नि हिच्या चेहेऱ्यांत कितीबरं सारखेपणा आहे ?

चित्रपाल—सटवे, किती जीभ पुढं पुढं करून बोलशील, गप्प बैस, नाहीं तर तुला सुळावर चढवीन.

सारजा—हं खुशाल, खुशाल, मला सुळावर चढवलंत तर त्यांत कांहीं मोठसं भूषण नाहीं. महाराज, नका बरं, अगदीं इतके निष्ठुर नका होऊं ! यापासून कोणीहि आपल्याला चांगलं ह्मणणार नाहीं.

चित्रपाल—मला कोणी नाहीं चांगलं ह्मटलं तरी चालेल ! सुबुद्धी, हिचा हात धरून हिला ओढीत बाहेर न्या पाहूं.

सारजा—माझा हात धरून नको मला बाहेर घालवायला. ही मी चाललेंच. पण महाराज, आपल्याला अखेरचं एकदां सांगतें कीं, हें लेंकरूं आपलं आहे, इकडे कांहीं पहा; आपण सर्वांनीं जरी याचा धिक्कार केला तरी ज्यानं जन्माला घातलं तो कधींही करणार नाहीं. हे सारे तोंडपुजे आपल्या वाईट कामांत आपल्याला मदत होतील; पण यांच्यापैकीं एकाच्यानं सुद्धां आपलं चांगलं करवणार नाहीं; बरं मी येतें आतां; या अर्भकाचं आपल्याला जें बरं दिसेल तें करा. (जाते.)

चित्रपाल—सुबुद्धी, तुह्मींच हिला माझ्याकडे पाठविली होती वाटतं— मोठे दयेचे सागर—जा, आतांच्या आतां या मुलीला नेऊन मारून टाका. आणि तुह्मी—तुह्मीच हें काम केलं पाहिजे. चला तर, आणि एक तासा-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

च्या आंत तसं केल्याबद्दल मला येऊन वर्दी द्या. नाहीं-कांहीं खूणही आणा, हें काम तुमच्या हातूनच झालं पाहिजे. नाहींपेक्षां तुह्मीं आपल्या जिवाला मुकाल सांगून ठेवतों. आणि तुमच्या मनांतून जर करायचं नसेल आणि माझा राग तुह्मांला पतकरत नसेल तर तसं सांगा.ह्मणजे मी स्वत:च या कारटीला आपटून टाकतों! चला, चालते व्हा! तुह्मींच त्या सारजेला माझ्याकडे पाठविलीत.

सुबुद्धी—नाहीं महाराज, मी नाहीं तिला पाठविली. याबद्दल सर्व मंडळी साक्ष देतील.

सरदार—होय सरकार, याबद्दल आम्ही सुद्धां साक्ष देऊं. किं यांनीं तिला आपल्याकडे यायला सांगितलं नाहीं.

चित्रपाल—तुम्ही सारे लबाड आहांत.

१ सरदार—महाराज, आमचं बोलणं आपल्याला कांहीं तरी खरं वाटूं द्या. आह्मी आजपर्यंत आपली इमानानं नोकरी करीत आहों. आणि त्याबद्दल महाराजांपाशीं मागणं मागतों किं या बालकाला मारूं नये! यापासून मोठा अनर्थ गुदरेल.

चित्रपाल—काय करावं ?

(साकी)

टाकावें हें अर्भक वधुनीं एकवार मज वाटे।
नवधावेंसें पुन्हां गमतसे पडलें संकट मोठें॥
दुभंगमन होतें। नकरी एक निश्चयातें॥ १॥

(विचारकरून) अथवा हे दोन्हीं विचार नकोत. हो आतां असंच करावं. काय हो सुबुद्धी, हें कारटं जि-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वंत राहावं अशी तुमची इच्छा आहे नाहीं ? बरं तर याला वांचवायला तुह्मीं काय कराल बरं ?

सुबुद्धी—माझ्या हातून जें होण्यासारखं असेल तें करीन. फार काय सांगूं महाराज, पण माझा जीव दिल्यानं जर याचा वांचत असेल तर तो सुद्धां मी द्यायला तयार आहें महाराज.

चित्रपाल—तर मग तुमच्या हातून होण्यासारखं असंच काम तुह्मांला सांगतों. पण खात्रीनं करीन अशी शपथ द्या पाहूं.

सुबुद्धी—आपल्या पायांशपथ मी करीन.

चित्रपाल—तर मग या कारटीला उचलून घोर अरण्यांत नेऊन टाका, ज्यानं जन्माला घातलं तोच तिचं रक्षण करील. चला, उचला.

सुबुद्धी—शपथच घेतली आहे त्याअर्थीं हें काम मला केलंच पाहिजे ! पण यापेक्षां मृत्यूची शिक्षा काय वाईट होती ? ये—बाळा, वनांतील हिंस्र पशूंना सुबुद्धी देऊन त्यांच्यापासून परमेश्वर तुझं रक्षण करो. (घेऊन जातो.)

चित्रपाल—कोकिलांचीं पिलं वाढविणारा कावळा होणं मला नाहीं खपणार !

सेवक—सरकार, ज्यांना आपण पत्र देऊन गुरुमहाराजांकडे पाठविलं होतं ते भालचंद्र आणि वसंत दोघेहि आले आहेत. त्यांना येऊन सुमारें एक घटका झाली असेल.

१ सरदार—फारच लवकर आले ह्मणायचे.

चित्रपाल—त्यांना जाऊन काय ते सारे बावीस

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दिवस झाले. इतक्या अवकाशांत ते जाऊन परत सुद्धां आले अँ? ठीक आहे. गुरूजींनीं काय तो एकंदर खुलासा लिहिलाच असेल! तर तुह्मी जा आणि अधिकरणीकांना ही गोष्ट कळवून लवकर कचेरी भरवायला सांगा. कारण—

(साकी)

दोष ठेविला तिजवरती मी, उघडपणें तो जैसा।
सर्वांसमक्ष होवो आजि, न्याय तिचाही तैसा॥
संशय निवृत्ति। होवो पौरजनांची ती॥१॥

[अंक दुसरा समाप्त.]

अंक ३ रा.

प्रवेश १ ला.

भालचंद्र—वसंता, किती तरी रमणीय स्थल तें, तिथली हवा किती तरी स्वच्छ; त्याच्या सारखं विस्तीर्ण व मनोहर स्थान आपण कुठेंच पाहिलं नाहीं.

वसंत—तसंच भालचंद्रा—

पद-(अहो काय हा मूर्खपणा)

तृणपर्णांहीं आच्छादित तो आश्रम गुरुचा पाहोनी। नयन निवाले मन बहु रमलें गमलें यावें नच तिथुनी। गंभीर किती मूर्ति तयाची वृत्तिहि तैशी जाण मनीं। तपोबलानें दिव्य सुरुचिरा अंगकांति गेली वजुनी। पिंगट कुंतल जटाजूट शिरीं करिं जपमाला ती धरुनी। भस्में करि तनु भूषित भाळीं मृगमदतिलकहि लावोनी॥१॥

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भालचंद्र—परमेश्वरकृपेनं गुरुमहाराजांनीं दिलेल्या आज्ञापत्रांत राणीसाहेबांना अनुकूल असाच मजकूर असावा; ह्मणजे आमच्या दीर्घ प्रवासाच्या श्रमाचं सार्थक झालं.

वसंत—असं असेल तर फारच उत्तम होईल. कारण, महाराजांनीं विनाकारण राणीसाहेबांवर केलेला दोषारोप पाहून मला फार वाईट वाटतं.

भालचंद्र—आतां घोडं मैदान जवळच आहे. हें गुरुजींच्या हातचं मुद्रित आज्ञापत्र महाराजांजवळ नेऊन दिलं ह्मणजे काय तो निकाल कळेलच. देव करो, आणि राणीसाहेब निर्दोषी ठरोत.

(जातात.)

प्रवेश २ रा.

(न्यायसभा. चित्रपाल, न्यायाधीश, अधिकार्णिक वगैरे.)

चित्रपाल—अहो न्यायमूर्ति, आजचा हा व्यवहार चालवण्याची माझी अंत:करणापासून मुळींच इच्छा नाहीं. मला फार वाईट वाटतं. कारण, यांत आरोपीण राजकन्या व राजभार्या, पूर्वींची अत्यंत आवडती आमची पत्नी आहे. परंतु काय करूं, तिच्या हातून तसंच दुष्कर्म घडलं, ह्मणून मला तिच्यावर दोषारोप करावा लागला. आणि याबद्दल पौरजनांची खात्री होऊन त्यांनीं मला दोषी ठरवूं नये, व जुलमी ह्मणूं नये, ह्मणून उघडपणें हा व्यवहार आपणापुढं आणणं मला भाग पडलं. तर आतां आपण यथान्याय याचा निर्णय क-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रावा. मग त्यांत राज्ञीचा किंवा आमचा कुणाचाही दोष ठरो. आतां तिला बोलावून आणा.

न्यायाधीश—राणीसाहेबांनीं स्वतां न्यायसभेंत यावं, अशी ज्याअर्थीं महाराजांची इच्छा आहे, त्याअर्थीं जा, त्यांना घेऊन ये. (सेवक जातो.)

(चंपावती, सारजा, दासी, रक्षक वगैरे येतात.)

न्यायाधीश—अहो कायस्थ, व्यवहारपत्र वाचा पाहूं !

कायस्थ—आजचा हा व्यवहार कांचनपुराधीश सोमवंशीय राजे चित्रपाल महाराज यांचा त्यांच्या आवडत्या महाराणीसाहेब चंपावती यांजवर ऐसाजे. महाराणीसाहेबांनीं सदसद्विचार सोडून महाराणीपदास अनुचित व महाराजांच्या नांवाला कलंक लागेल अशा प्रकारचं आचरण विलासपुरचे महाराज सोमवंशीय राजे शूरसेन यांजपाशीं केलं. त्या कामीं चित्रपाल महाराजांच्या जिवास अपाय करण्याच्या मसलतींत सामील होऊन ती मसलत परिस्फुट झाल्यामुळें विश्वासघातकी व राजद्रोही सरदार विश्वासराव, यांसह राजे शूरसेन, यांस कांचनपूर येथून पळवून लावलं. सबब—

चंपावती—अहो अधिकार्णिक, अहो पौरजन हो

पद [दक्ष यज्ञांतुनी नारद]

जरी वदेन या समयीं कांहीं । तरि गमेल सत्य न तें पाहीं ॥ कुणाचाही माझे ठायीं । विश्वास न राही ॥ ध्रु० ॥ दोष मम करिं कांहीं । घडला खचित नाहीं । दूषण हें काय बाई ॥ देती नृपराज पाहीं । आण देवाची मी वाहीं ॥ वच हें न

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सहन होई । अंगाची करि लाही । दुःख अतिशय होई । तें सलत बहुत हृदयीं ॥ १ ॥

आतां, शूरसेन भावोजींच्या संबंधानं मला दोषी ठरविलं आहे. पण याला कांहीं तरी आधार आहे का? रितीप्रमाणं मी त्यांचं आदरातिथ्य केलं, हाच जर माझा दोष ह्मणायचा असेल, तर असो बापडा. एखादा पाहुणा जर आपल्या घरीं आला, तर त्याच्या योग्यतेनुरूप त्याचा मान नको का ठेवायला ? त्यांची नीट तरतूद ठेव, ह्मणून इकडूनच मला सांगणं झालं होतंना? तसं केलं नसतं तर तिकडूनही माझ्यावर दूषण ठेवायच झालं असतं; तशांतून ते इकडचे लहानपणचे स्नेहीं; तेव्हां त्यांची नको का योग्य रितीनें व्यवस्था ठेवायला ? आतां दुसऱ्या बाबतीबद्दल शिव, शिव, तसले ते शब्द तोंडानें उच्चारूं नयेत, नि कानांनीं ऐकूंही नयेत; तसलं दुष्ट कृत्य करायला मी कधीं तरी प्रवृत्त होईन का ? नि तसल्या दुष्ट बेतांत तो प्रामाणिक विश्वासराव तरी अनुकूल होईल का ? त्या दोघांच्या पळून जाण्याच्या कामांत माझी मदत होती असं ह्मणतात; पण अंबाबाईची शपथ घेऊन सांगतें कीं, ते कुठें, कसे, केव्हां नि कां पळाले यांतलं एक अवाक्षर देखील मला माहीत नाहीं. अहो, न्यायाधीश, कार्णिक, आतां कृपा करून मी विचारितें तेवढ्या प्रश्नांचे जबाब मला मिळावे.

पद.

राणी—मी असोनि नृपकांता नृपसुता नृपमाता ।
आणिली सभेंत मला न दोष मदिय असतां ।
हा अपमान असे काय लहान सहान हाय ।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मानहानी ही न काय होई कथा ॥

राजा—सत्य न कधिं वदती । दुष्कृति जे करिती ।
करिती जे पाप अपराधी आपोआप ॥
होते कबूल तरी ताप । होता कधीं न नयक-
र्त्यांस ॥ सत्यचि जगतिं वृथा ॥

राणी—मी असोनि नृपकांता० ॥

राजा—दुष्कृति धाडस होय जयांना । होय न धाडस
काय ॥ अनृत वदाया त्यां ॥

राणी—बळेंचि अंगीं लावितां । दोष जरी तरि तो ।
लावुनि घेऊं मी कसा ॥ दोष जरी तरि तो
॥ १ ॥ मी असोनि० ॥

चित्रपाल—तूं दुष्कर्म केलंस किंवा नाहीं याबद्दल तुला कांहीं माहीत नाहीं अं ?

चंपावती—महाराज, आपल्या बोलण्यांतील भाव मला मुळींच कळत नाहीं. हा माझा प्राण आपल्या स्वाधीन आहे, याचं हवं तें करावं.

चित्रपाल—मी ह्मणतोंना तूं दुष्कर्म केलेंस, आणि तूं नाहीं ह्मणत असशील तर खुशाल ह्मण. त्या शूरसेनापासून झालेल्या तुझ्या कार्टीला मी घोर अरण्यांत टाकलं आहे. त्याला तिथं आईना बाप; त्याचा दोष तुझ्याच माथीं. आतां आमच्या न्यायदेवतेचं खरं स्वरूप तुझ्या लवकरच दृष्टीला पडेल. आतां तुला यमसदनाचीच वाट धरली पाहिजे.

चंपावती—महाराज, मला कांहीं इतकी भीति नको घालायला. मरण ह्मणजे कांहीं लोकोत्तर आहे असं मुळींच मला वाटत नाहीं; परंतु, तें आपल्या हातून येतं आहे, ह्मणून मात्र तसं मानीन.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पद—(वज्र भयंकर पडुनि)

उरलि न आतां अंतरिं मजला भीती कांहिंच मृत्यूची ॥ विलया गेली आशा माझी सर्वहि आतां जगण्याची ॥ नष्ट झालें प्रेम मजवरिल अपुलें ॥ जयसेना दूर मजपासुनि केलें ॥ नव तान्हुलेंहि वनिं सोडिलें सोडिलें ॥ उरलि न आतां ॥ १ ॥

या ज्या माझ्या तीन समाधानाच्या गोष्टी त्यांपैकीं आतां एक सुद्धां उरली नाहीं. मग मला या जगांत राहून काय करायचं ? महाराज, खरंच विचारतें, आपल्या मतें मी तर सर्वस्वीं अपराधी आहेंच; पण त्या बिचाऱ्या तान्हुल्यानं काय बरं कुणाचा अपराध केला होता ? तें अंगावर असतांच माझ्या जवळून तोडलंत नि त्याला घोर अरण्यांत टाकलं; तिथ त्याची काय बरं अवस्था होईल ? हाय ! हाय ! मी व्यभिचारीण, असा माझा सर्व शहरभर डंका पिटवला. एखादा भिकारी सुद्धां आपल्या बायकोच्या बाळंतपणामध्यें जिवापाड श्रम करून तिची निगा राखतो; पण देवा, मी राजपत्नी असून !—

सारजा—माईसाहेब हें काय करतां ?

चंपावती—चार चार महिने कोणी बाळंतीण खोलीच्या बाहेर देखील पडत नाहीं, नि मला माझ्या अंगांत पुरी शक्ति देखील आली नाहीं तोंच या भरसभेंत उघड्या हवेवर ओढून आणली अं ! तर मग महाराज, आतां आपणच सांगा कीं, मला जिवंत राहायला आतां एका सुखाची तरी आशा उरली आहे का ? मग मी क-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शाला मरणाची भीति तरी बाळगूं? महाराज, हा प्राण मला आतां तृणप्राय झाला आहे. याच्या आशेनं मी आपली विनवणी करतें आहें असं नाहीं, पण विनाकारण मला दोषी ठरवून माझ्या नांवाला कलंक लावूं नका. मला अपराधी ठरवायला आपल्या जवळ कांहींच सबळ प्रमाणं नाहींत. आपल्या निव्वळ भलत्या सलत्या कल्पना हीं प्रमाणं असं आपल्याला सुद्धां ह्मणतां येणार नाहीं; नि यावरूनच जर मला दोषी ठरवीत असाल तर तो अन्याय होईल, न्याय कांहीं होणार नाहीं. माझा न्यायच करणं असेल, तर आपले कुलगुरु सदानंद स्वामीच करतील. त्यांच्याकडून जें आज्ञापत्र येईल तें मला शिरसा मान्य आहे.

कायस्थ—राणीसाहेबांचं म्हणणं बरोबर आहे. भालचंद्र आणि वसंत यांना इथं बोलावूं का महाराज?

न्यायाधीश—जारे, भालचंद्र आणि वसंत यांना तुह्मांला न्यायसभेंत बोलावलं आहे ह्मणून सांग.

चंपावती—माझा बाप जर आज जिवंत असता तर—

दिंडी.

दुःख ऐसें पाहुनी निज सुतेचें। हृदय शोकें फुटतेंच कीं तयाचें। अनर्थचि मग तो काय तरी होता। तदिय कोपें तें काय वदूं आतां ॥ १ ॥

(भालचंद्र वसंत येतात.)

अधिकारीक—भालचंद्र, वसंत, या बसा इथं. बोला, तुम्हीं गेल्यापासून सारी हकीकत सांगा.

भालचंद्र—महाराजांची आज्ञा घेऊन आह्मीं हि-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

माचलावर गेल्यावर सदानंद स्वामींना महाराजांचं पत्र दिलं. तें वाचून त्यांनीं या पत्रीं उलट जबाब लिहून तें आपल्या हातानं मुद्रित करून आमच्या स्वाधीन केलं. तें हें जशाच्या तसंच आहे. (पत्र देतात.) याखेरीज आणखी कांहीं हकीगत कळविण्यासारखी नाहीं.

चित्रपाल—फोडा तें पत्र आणि वाचा.

कायस्थ—(पत्र वाचतो.) श्रीमत्परमंहस परिव्राजकाचार्य गुरु सदानंद स्वामी यांजकडून, शिष्य राजा चित्रपाल यांस—अनेक आशीर्वाद. तुमचेकडून श्रीचरणीं विनंतीपत्र आलं तें पावलं. मजकूर विदित झाला. श्रीची आज्ञा लेखनद्वारें कळविण्यांत येते जे—

(साकी.)

शूरसेन निर्दोष पवित्रा राज्ञी तूं अन्यायी । राज-
निष्ठ विश्वास सुता ती तुझीच तिजविण नाहीं ।
संतति तुज दुसरी । मिळेल शोधिसि तिजसि
जरी ॥ १ ॥

कळावें बहुत काय लिहिणें हे आशिर्वाद.

चंपावती—याबद्दल त्यांची मी काय तरी उतराई होऊं ?

चित्रपाल—कायहो कायस्थ, पत्रांत होता तसाच मजकूर वाचलात का ?

कायस्थ—होय महाराज, अगदीं जशाचा तसा.

चित्रपाल—अहो अधिकर्णिक, यांतलं सर्व इंगीत मला कळून चुकलं आहे. हें सारं बंड इचंच आहे. इनंच त्या विश्वासरावाच्या मार्फत झालेली हकीगत स्वामींकडेस कळवून त्यांजकडून असं पत्र द्यावं ह्मणून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

योजना केली आहे. ह्मणून स्वामींची आज्ञा मला कबूल नाहीं. मला आतां व्यवहार चालवणं आहे.

(सेवक धावऱ्या धावऱ्या प्रवेश करतो.)

सेवक—महाराज ! अहो महाराज ! सरकार ! !

चित्रपाल—अरे झालं काय ?

सेवक—महाराज, अशी अशुभ वार्ता मी आपल्याला कशी सांगूं ? पण सांगितल्याशिवाय गती नाहीं ! आईसाहेबांना इथं आणल्या हें धाकट्या महाराजांना कळतांच " आई आतां तुझं कसं होईल " असं ह्मणून त्यांनीं—

चित्रपाल—काय ?

सेवक—आणखीं मी काय सांगूं ?

चंपावती—हाय ! हाय ! हाय ! बाळा.

(मूर्छित होते.)

चित्रपाल—निःसंशय परमेश्वराचा माझ्यावर कोप झाला. मी त्या सत्पुरुषाला उगीच खोटा ह्मटलं. मी महदन्यायी आहें.

सारजा—अग बाई, आतां काय करूं तरी, बाईसाहेबांना काय झालं हें! हें पहा डोळे सुद्धां पांढरे केले.

चित्रपाल—न्या तिला आंत. तिच्या अंतःकरणाला एकदम धक्का बसल्यामुळें तिला मूर्च्छा आली आहे; कांहीं वेळानें ती शुद्धीवर येईल. माझ्या कल्पनांवर मीं विश्वास ठेवला, त्याचाच हा परिणाम. ती लवकर सावध होईल असं कांहीं तरी औषध द्या. (सर्व जातात) गुरुमहाराज, मीं आपल्या वचनावर विश्वास ठेवला नाहीं त्याचेंच हें फळ मला तात्रडतोब मिळालं. मी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

महान् अपराधी—आपल्याला शरण आहें. आतां मी मनांतील सर्व विकल्प सोडून—

पद (हा सजिव असुनि पति.)

मी खचित असें अपराधी । येइ पदीं तव शरण प्रभो मी । मजसम भुवनीं नच्च कुणि खलधी ॥ ध्रु० ॥ शूरसेन मन्मित्राचि साचा । जोडिन पुनरपि स्नेह तयाचा । विनवुनि दवडिन कोप राज्ञिचा । परत आणविन विश्वास सुधी ॥ १ ॥

सारजा—हाय रे दैवा ! मला आतां मरण येईल तर फार बरं, ह्मणजे हें दुःख तरी डोळ्यांनीं बघायला नको !

वसंत—काय हो सारजाबाई, झालं तरी काय तें कळूं द्या !

सारजा—काय हो महाराज, ही आपली मत्सरबुद्धि आणि कोण विचित्र कल्पना ! यापासून काय काय अनर्थ कोसळले हें, नि आणखी किती कोसळणार, तें त्या जगदंबेला माहीत. माझं बोलणं तेवढं दिसेल. पण महाराज, कायहो हीं आपलीं दुष्ट कृत्यें नि केवढे त्याचे भयंकर परिणाम हे ! कीं जे ऐकतांच काळीज विरघळून जाईल. असलीं कृत्यें पोरांना देखील शोभत नाहींत. त्या शूरसेनावर नसतंच बालंट घेऊन मित्रद्रोही झालांत ! त्याला विष देऊन मारण्याकरतां त्या विश्वासरावाला सांगितलंत ! त्या निरपराध लहान बाळाला अरण्यांत नेऊन टाकायला सांगितलंत ! कोण राक्षसी कृत्यं हीं ! एक का दोन, किती ह्मणून सांगूं ! पण हीं कांहींच नाहींत ! हे नुसते आपले पोर-

LIBRARY.
Jangamwadi Math, VARANASI,
Acc. No. 3410...

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

खेळ झाले; पण आतां एका घटकेंत काय काय अनर्थ गुदरले पहा, आईचा केलेला अपमान सहन न होऊन त्या जयसेनाचा अंत झाला, त्याला ही आपणच कारण झालांत. त्या लहान अर्भकाच्या कोमल अंतःकरणाला या आपल्या कृतीनं केवढा धक्का बसला, कीं त्यानंच त्याचा अंत झाला. पण यापेक्षांही भयंकर—नाहीं—फारच भयंकर—अगदीं कडेलोट झाला—सर्व नगराचं भूषण केवळ राजलक्ष्मी आमच्या राणीसाहेब त्यांना अंत नेण्याचा अवकाश तोंच त्या आह्मां सर्वांना सोडून गेल्या हो गेल्या !!!

वसंत—सारजाबाई, काय ह्मणतां हें ?

सारजा—मी खोटं का सांगतें ? माझं सांगणं खोटं वाटत असेल तर स्वतः जाऊन पहा कसं तोंड निस्तेज पडलं आहे तें ! त्यांच्या काळ्या ठिक्कर पडलेल्या ओंठाला रक्तिमा आणाल, निस्तेज झालेल्या मुखाला, डोळ्यांना, टवटवी आणाल; नाहींसा झालेला श्वासोच्छ्वास परत आणाल, तर जन्मभर मी आपल्याला देव मानून आपली सेवा चाकरी करीन. महाराज, पश्चात्तापानं सुद्धां या असंख्य पातकांचं क्षालन होणार नाहीं, हजारों वर्षं उग्र तपश्चर्या केलींत, लक्षावधी ब्राह्मणभोजनं घातलींत, सर्वसंग परित्याग करून घोर जंगलांत वास करून राहिलांत तरी त्याचा कांहीं उपयोग होणं नाहीं. आतां शेवटपर्यंत निराशा ! निराशा !

चित्रपाल—बोला, आणखी बोला, तुह्मीं बोलाल तितकं थोडं आहे. परमेश्वरा, माझ्या हातून तशींच नीच कृत्यं होऊन गेलीं खरीं.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पद (सखया प्राणसखा) धुमाळी.

येवो मृत्यु तरी आतां । मानिन सुखदाता ॥ध्रु०॥
पातकि अधम असें मी फार । केला स्वकुला-
चा संहार । बाल स्त्री वध पातकभार । वाहि-
यला निजमाथां ॥ १ ॥ आग लावुं का या रा-
ज्यास । मृत्यूवांचुनि अन्य सुखास । नुरलें आतां
स्थलही खास । लागलि हाय या चित्ता ॥ २ ॥

भालचंद्र--सारजाबाई, आतां पुरे करा बोलणं; महाराजांच्या दुःखावर आणखी डाग देऊं नका !

सारजा—हो, दुःखावेशांत माझ्या तोंडून वाईट शब्द गेले खरे; आतां मला फार वाईट वाटतं. नाहीं—नाहीं तसलं मी महाराजांना लावून बोललें तें त्यांच्या अंतःकरणाला फार लागलं असेल; असो, झालं तें झालं. झाल्या गोष्टीचा खेद करून काय उपयोग ? महाराज, माझं बोलणं आपण कांहीं मनावर घेऊं नये. आपल्याला जिनं दुःखाचा विसर पाडायचा ती मी उलट त्याची आठवण करून देतें, हा माझा केवढा वेडेपणा ? महाराज माझ्या बोलण्याची आतां मला क्षमा करावी. आपल्या राणीसाहेबांवर माझं किती प्रेम होतं ? पहा, बोलायचं नाहीं ह्मटलं, तरी पुनः त्यांचं नांव; नाहीं, नाहीं. आतां पुनः राणीसाहेबांचं नांव काढायची नाहीं; त्या वनांत सोडलेल्या बाळाचं काढायची नाहीं. जयसेनाचं काढायची नाहीं. कुण्णाचं कुण्णाचं काढायची नाहीं. महाराज, आतां दुसरं कांहीं सांगणं नाहीं, आतां सारं दुःख विसरा नि गुरुजींनीं सांगितल्याप्रमाणं तें मूल पुनः सांपडेल, या आशेवर दिवस लोटा. दुसरं काय!

चित्रपाल--सारजाबाई, तुमच्याकडे कांहीं अप-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राध नाहीं. तुह्मीं बोलतां तेंच खरं आहे तुमच्या सुखाच्या शब्दापेक्षां तुमचे कडू शब्दच या वेळीं मला अधिक प्रिय आहेत. चला, मला राणीला आणि जयसेनाला शेवटचं भेटूं द्या. त्यांना पाहतांच त्यांच्या मृत्यूचीं कारणं माझ्या डोळ्यासमोर उभीं राहतील! माझ्या नीच घाणेरड्या दुष्ट कृत्याचं मला स्मरण होईल! आणि तसं झालंच पाहिजे, म्हणजे माझ्या जीविताचा मला पूर्ण तिटकारा येईल! केवढा मी अधम, चांडाळ, पापी, बालहत्या—स्त्रीहत्या करणारा, आपल्या कुळाचा नाश करणारा कुऱ्हाडीचा दांडा— (सर्व निघून जातात.)

प्रवेश ३ रा.

स्थळ—(अरण्य.)

(मुलाला घेऊन सुबुद्धी व कोळी येतात.)

सुबुद्धी—आतां जे आपण तारवावरून उतरून आलों, ते या विलासपुरच्या हद्दींतल्या जंगलांत ना! ही तरी तुझी पक्की खात्री आहेना ?

कोळी—होय महाराज, पण भलल्याच वेळीं आपण इथं दाखल झालों. हें पहा कसं भयंकर वादळ सुटलं आहे तें! आणि समुद्रांतील लाटांचं घोंगावणं पहा किती जोरानं ऐकूं येत आहे तें! मला वाटतं, या अर्भकाला आपण अरण्यांत सोडायला आणलं ह्मणून हा निखालस ईश्वरी कोप आहे.

सुबुद्धी— परमेश्वराची इच्छा असेल तसं होईल. जा परत तारवावर, आणि सावधगिरीनं रहा. मी लवकरच येतों.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कोळी—लौकरच या. फार लांबवर जाऊं नका. हा भयंकर वादळ होण्याचा प्रसंग आहे. आणि शिवाय ही जागा धोक्याची आहे. इथं मोठमोठे हिंस्र पशू रहातात. अथवा असं कशाला इथंच जमिनीवर ह्या मुलीला ठेवून आणि चला परत.

सुबुद्धी—तूं जा, मी आलोंच ह्मणून समज.

कोळी—या कामांत माझं अंग नाहीं ह्मणून मला मोठा आनंद वाटतो. (जातो)

सुबुद्धी—(मुलास घेऊन) मला काल एक चमत्कारिक स्वप्न पडलं. आमच्या मातोश्री राणीसाहेब ह्या माझ्याकडेस आल्या. त्यांचं तोंड अगदीं निस्तेज दिसत होतं, जणुं दुःखाग्नीनं त्यांचा देह करपून काळा ठिक्कर पडावा असं वाटत होतं. त्या माऊलीनं एकदा माझ्या कडेस पहावं, पुन्हां तोंड फिरवावं, माझ्याशीं बोलण्याचा प्रयत्न करावा, परंतु तितक्यांत कंठ दाटून येऊन बोलवेनासं व्हावं. असं बराच वेळ झाल्यावर शेवटीं त्या मोठ्यानं हंबरडा फोडून ह्मणाल्या सुबुद्धी, तुह्मीं वचनांत गुंतल्यामुळं माझ्या तान्हुल्याला अरण्यांत सोडण्याचं तुमच्या कपाळीं आलं आहे; त्याला तुह्मीं काय कराल ? पण एवढं करा कीं, हें अमक्या देशच्या राजाचं मूल आहे. असा लेख लिहून तो लेख आणि कांहीं रत्नं अशीं त्याच्या जवळ ठेवा. ह्मणजे कुणाला दया आली तर कुणी त्याचा सांभाळ करील. आणि तिचं नांव वनांत सोडलेली ह्मणून वनमाला असं ठेवा. असलं नीच काम तुमच्या कडेस येऊन तुह्मीं माझी नि माझ्या बाळाची ताटातूट केलीत ह्मणून तुह्मालाही तु-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मचीं मुलंबाळं अंतरतील. इतकं ह्मणून त्या गुप्त झाल्या. जागा झाल्यावर कांहीं वेळ हें सर्व खरंच असं मला वाटलं. पण मग स्वप्नच अशी खात्री झाली. तरी पण त्यांनीं सांगितलेल्या गोष्टी कराव्यात असं मला वाटलं ह्मणून या पेटींत हीं रत्नें घालून त्याच्या पोटाला हा लेख गुंडाळला आहे. पण आमच्या महाराजांचा ज्या-च्यावर कोप त्या शूरसेनाच्या हद्दींतील समुद्रकिना-ऱ्याला आमचं जहाज लागलं, तेव्हां यांत कांहीं तरी ईश्वराचा निराळाच हेतु असला पाहिजे. हें पहा वादळ होऊं लागलं, बाळा, मी तुला आतां इथंच ठेवतों. (ठे-वतो.) परमेश्वर तुझं रक्षण करो. मी पापी ह्मणूनच असलं नीच काम करण्याचं माझ्या प्रारब्धीं आलं आहे. (वाघाची गर्जना ऐकून.) अं ! ही डुरकावणी कुणाची ! आतां लवकरच जहाजावर गेलं पाहिजे. अरे पण हा वाघ, यानं गाठलंच, आतां भरलीं माझीं शंभर वर्षं (जातो.)

(गवळी येतो.)

गवळी—या अलिकडच्या वीस बाविशीच्या पोरां-पुढं अगदीं हात जोडावे; असल्या या भयंकर वादळांत कोणी शिकार करील कां ? पण पहा या उनाडांनीं—

पद. (लावणी.)

शिकार खेळुनि वनांत या या उनाड पोरांनीं ।
माझ्या गाई दोन लाविल्या पहा वुजावोनी ।
तडाक्यांत जर वाघाच्या त्या सांपडल्या चुकुनी ।
काय करूं मी शोधुं कुठें तरि दमलों बहु फिरुनी ।

त्या सांपडल्यातर ह्या समुद्रकिनाऱ्याच्या खडका-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

च्या आड कदाचित् सांपडतील. (इकडे तिकडे फिरून व मूल पाहून.) अरे हें काय ? हें इथं मूल कुणी टाकलं असावं ? फारच सुंदर आहे. कोणा तरी दुष्टाचं हें काम असलं पाहिजे. किंवा हें आईबापांच्या मुळावर जन्मलं असेल ह्मणून याला टाकून दिलं असावं. असो, आपण या बिचाऱ्याला घरीं घेऊन जावं. पण दिवट्याला अगोदर विचारूंया. अरे ए दिवट्या–

दिवट्या—ओ, ओ, बाबा.

ह्मातारा—अरे, तिकडे काय करतोस इकडे ये पाहूं. (येतो) अरे इतका घाबरलेला कां दिसतोस ?

दिवट्या—बाबा, आतां मी समुद्रकिनाऱ्यावरून आलों. तिथं मी अशी गम्मत पाहिली कीं, आकाश आणि पाणी एक होऊन गेलं होतं. आणि सगळा अंधार गुडुप्.

ह्मातारा—अरे ह्मणतोस तरी काय ?

दिवट्या—बाबा, तुह्मीं असतां तर वादळ कसं सुटलं होतं, खडकावर लाटा कशा आपटत होत्या तें सर्व तुमच्या दृष्टीस पडलं असतं. पण हें तुम्हांला सांगायचं नव्हतं. काय त्या जहाजांतील लोकांची भयंकर स्थिती ! केवढ्या मोठ्यानें ते ओरडत होते, परमेश्वराचा धांवा करीत होते, आणि मग बघा बाबा, तें तारूं वादळानं अस्सं, अस्सं खालींवर उलथापालथ होतां होतां एकदम बुडालं. पण बाबा, तुम्हीं कोणत्या बाजूच्या रस्त्यानं आलांत ?

ह्मातारा—उजव्या बाजूच्या रस्त्यानं.

दिवट्या—हात बाबा, घालविलंत. डाव्या बाजूच्या रस्त्याला काय मजा चालली होती; त्या बिचाऱ्याला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वाघानं कसं फाडफाडून खाल्लं, आणि तो कसा मला सोडवा, सोडवा, ह्मणून रडत होता; आणि ह्मणत होता, अहो मी सरदार आहें, माझं नांव सुबुद्धी, पण बघा बाबा, एकदम वादळ कसं सुटलं, तारूं कसं बुडालं, त्यांतले लोक कसे ओरडत होते! आणि समुद्र त्यांना कसा वेडावीत होता. पण किनई त्या सरदाराच्या आणि वाघाच्या ओरडण्यापुढं समुद्राचं आणि वादळाचं घोंगावणं मुळींच ऐकूं येईनास झालं.

ह्मातारा—अरेरे, वाईट गोष्ट झाली. पण कधींची गोष्ट सांगतोस ही?

दिवट्या—आतांचीच बाबा, अजून एक पळ सुद्धां लोटला नाहीं. तीं मनुष्यं सुद्धां अजून पुरीं बुडालीं नसतील. आणि त्या सरदारालाही वाघानं पुरं खाल्लं नसेल!

ह्मातारा—मी असतों तर त्या सरदाराला वांचविलं असतं.

दिवट्या—नाहीं बाबा, गलबतांतील लोकांना वाचवलं असतं तर बरं झालं असतं, एकाचा प्राण वांचविण्यापेक्षां दहांचा वांचविला असतां अधिक पुण्य नाहीं का?

ह्मातारा—फारच भयंकर प्रसंग! पण ही पहा आनंदाची गोष्ट; तूं मनुष्यं मरतांना पाहिलींस पण मला हें नुकतंच जन्मलेलं सांपडलं. ही पाहिलीस त्याच्या आंगावरची शालजोडी कशी आहे ती! आणि त्या पेटींत काय आहे पहा बरं? मला एका ज्योतिषानं असं सांगितलं आहे कीं, तुला पुष्कळ द्रव्य सांपडेल ह्मणून.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तर तें त्यांतच असेल कदाचित्. उघड ती पेटी, आणि तिच्यांत काय आहे पहा?

दिवट्या—(पेटी उघडून) अबब! बाबा मोहरा!! मोहरा आहेत यांत, ह्या पाहिल्या?

म्हातारा—मुला, आपलं नशीब उघडलं म्हणूनच या मोहरा सांपडल्या. चल, हें सर्व घेऊन, आधीं घरीं जाऊं. बाहेर कुठं हे फोडूं नको. ही गोष्ट अगदीं मनांतल्या मनांत ठेव. चल तर मग.

दिवट्या—तुम्हीं त्या रस्त्यानं घरी जा. मी तो वाघ गेला कीं नाहीं; आणि त्या मनुष्याला त्यानं कितीसं खाल्लं तें पाहून येतों. वाघानं त्याला सगळं खाल्लं नसेल, तर आपण त्याला मूठमाती देऊं. भूक शांत जाहल्यावर वाघ मग कधीं कुणाला खात नाहीं म्हणतात.

म्हातारा—बरं तर तूं जा. आज मोठा भाग्याचा दिवस उगवला. आतां आपण घरीं गेल्यावर यापैकीं कांहीं दानधर्म करूं.

पद—(बहु गोड बोवडे.)

उदया आलें भाग्य आपुलें म्हणुनि ठेव ही सांपडली। ईशें आपुली बहु दिवसांची निर्धनता अजि बघ हरिली । राहुं सुखानें सदनीं आतां चिंता कांहीं नच उरली । मूल नव्हे हें साक्षात् लक्ष्मी नांदया सदनीं आली ॥ १ ॥

अंक ३ रा समाप्त.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अंक ४ था.

प्रवेश १ ला.

स्थळ (गवळ्याची खोपटी.)

म्हातारा--सुखाचा काळ लवकर जातोसा वाटतो. हीच आमची वनमाला सांपडल्याला आज निदान बारा वर्षें होऊन गेलीं. पण इतका काळ केव्हां लोटला, हें माझ्या समजण्यांत सुद्धां आलं नाहीं. हिच्या सौंदर्यावरून व शहाणपणावरून ही मुलगी थोर कुळांतली असावीसं वाटतं. माझ्या म्हातारपणीं ईश्वरानं मला ही एक करमणूकच दिली म्हणायची. आतां एकदां तिला चांगलासा नवरा पाहून त्याच्याशीं तिचं लग्न लावून दिलं कीं गंगेंत घोडे न्हाले. तेवढाच सुखसोहळा पाहण्याची काय ती इच्छा राहिली आहे. आपल्याकडे आतांशा तो कृष्णा येतो तो हिला वर योग्य आहे. चांगला देखणा, तसाच शहाणाही आहे. आणि त्या पोरीचंही लक्ष त्याच्याकडे आहेसं दिसतं, तेव्हां टाकावं एकदाचं त्याच्याशीं तिचं लग्न करून झालं! माझा काय आतां घटकेचा सुद्धां भरंवसा नाहीं, मेलों गेलों तर मागं आशा राहिली म्हणायला नको. (जातो.)

[प्रवेश दुसरा.]

(शूरसेन आणि विश्वासराव.)

शूरसेन—विश्वासराव, तुम्हीं उगीच असा जाण्याचा आग्रह धरूं नका; तुम्हांला नका जाऊं म्हणायचं माझ्या मोठं जिवावर आलं आहे.

विश्वासराव—महाराज, इकडे येऊन मला आज

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बारा वर्षें होत आलीं; कारणपरत्वें आजपर्यंत मी इकडे राहिलों खरा, पण आतां हीं हाडं आपल्या जन्मभूमींत पडावीं अशी माझी उत्कट इच्छा आहे. आणखी असं पहा, चित्रपाल महाराजानांही आतां पूर्वीच्या कृत्याबद्दल पश्चात्ताप होऊन, त्यांनीं मला परत बोलावलं आहे; त्यांचीं मला आजपर्यंत किती बरं पत्रं आलीं ? हेंच पहा आजच पत्र आलं आहे. (पत्र देतो) पण आपल्याजवळ जाण्याची गोष्ट काढली कीं आपलं इतक्यांत जाऊं नका-आणखी कांहीं दिवस राहा, आणि मग जा, हें उत्तर आपलं ठेवलेलंच.

शूरसेन—

पद–(राम स्मरावा राम)

केले बहु उपकार । अह्मांवर । ठेवुनि प्रेम अपार ॥ ध्रु० ॥ करुनि संकटीं साह्य बहु । रक्षियलें प्राणास । स्वदेश त्यजिला मजसाठीं धरिली कशाचि न आस ॥ १ ॥ चालविलें मम राज्य तसें दक्षपणें अनिवार । अन्यभाव मनिं नच धरिला मानूं किति आभार ॥ २ ॥ वियोग तुमचा होईल कीं दुःसह फार अह्मांस । अनुमत देऊं केविं तुह्मां निजदेशीं जाण्यास ॥ ३ ॥

आतां त्या कांचनपुराविषयीं ह्मणाल तर त्याबद्दल अधिक बोलण्यांत अर्थ नाहीं. त्याचं नांव काढलं कीं, मला दादांची आठवण होऊन लागलाच कंठ दाटून येतो. त्यांना आतां आपल्या कृत्यांचा पूर्ण पश्चात्ताप झाला आहे; त्यांना वहिनीबद्दल, जयसेनाबद्दल आणि त्या वनांत सोडलेल्या मुलीबद्दल किती बरं दुःख होत असेल ? हो, पण ह्या गोष्टी जाऊं द्या. आताशा पुष्प-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शील कुठे दिसत नाहीं हें काय? तो असतो तरी कुठे? त्याच्याबद्दल मला मोठी काळजी आहे. कारण—

साकी.

पुत्र न ज्यांते अथवा होउनि मृतचि होइ ज्यांचा ते। असती अभागी याहुनी परी विशेष वदती ज्ञाते। निपजे खल कुमती। दुर्गुणी ज्यांचा तनय अती ॥ १ ॥

प्रवेश ३ रा.

स्थल–(जंगल--रस्ता.--भामट्या.)

भामट्या--

पद

पैशावांचुनि मौजा कैशा होतिल खाशा मनुजा रे ॥ मिळतिल कैशा उशा मऊशा तैशा गाद्यागिरद्या रे ॥ जोंवरि पैसा तोंवरि वैसा न्याय जगाचा ऐसा रे ॥ आळस पक्का देइल धक्का दाविल एक न टक्का रे ॥ काम दावितें दामाजीला दाम काम करि मोठें रे ॥ कराल कावा मिळेल ठेवा तरिच खाल मग मेवा रे ॥ लबाड लुच्चे बाप ठगांचे असे तयांचें कलियुग रे ॥ धट्टे कट्टे तोंवरि सट्टे लावुनि पैसे मिळवा रे ॥ १ ॥

बिनभांडवली धंदा कुणाचा तर आमचा. खिसेकापूची काय शिताफी तर न समजूं देतां खिसेकापी. लोकांच्या मालावर सदा आमची नजर. अंवसेची जी रजनी ती आमची जननी. फटफटीत चांदणं म्हणजें निव्वळ आमचं मरण. आम्हीं इमानी चोर सगळा आमचा युक्तीवर जोर. निजलेल्यावर प्राण गेला तरी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कधींही शस्त्र उचलणार नाहीं. म्हणतातना कीं दगा ना कोणाचा सगा. भामट्या भामट्या म्हणून गावांतले लोक मला हांक मारतात, यांत कांहीं नवल नाहीं. आम्हीं निघालोंच तसले म्हणून नांव मिळालं असलं. आमची स्वारी पुष्पशील राजपुत्राच्या पदरीं होती तेव्हां आमची फार चंगळ होती खरी; पण आतां आमच्या नशीबाचा रोख फिरला, तसा आमचा सगळा झोक गेला. तरी पण आमच्या चैनींत अंतर पडलं असं अजूनपर्यंत तर झालं नाहीं; हजारों उलाढाल्या करतों, खिसे कापतों, लोकांना फसवतों पण आपलं पोट भरतों. उगीच उपाशीं तापाशीं माशा मारीत ही स्वारी कधींही राहायची नाहीं, हँ ही पहा आलीच आमची शिकार–(दिवट्या येतो.)

दिवट्या—पाहूं या अँ–किती बरं ? या चार पावल्या झणजे एक रुपया झाला. आणि हे वीस पैसे म्हणजे किती झाले बरं ? चार आण्यांचे पैसे सोळा नाई–हो आणि विसाला चार कमी. म्हणजे सोळा म्हणजे हे चार आणे, आणि हे वीस पैसे म्हणजे किती झाले बरं ? छे बुवा हिशेबच चुकला ! बरं आपल्याजवळ दाहा रुपये आहेत न्व्हे (मोजतो.)

भामट्या—-एवढी जर का शिकार माझ्या हातीं येईल तर फार चांगलं होईल.

दिवट्या—बरं, उद्यांच्या मेजवानीकरतां आपल्याला काय काय जिनसा खरेदी करायच्या आहेत बरं ? छे बुवा, खडे घातल्याशिवाय नाहीं समजायचं (खडे घेऊन) तीन शेर गूळ, तेल दोन शेर, शेरभर तुरीचीडाळ आणखी तुमचा देव भला करो तांदूळ, पण तांदूळ–तांदूळ आप-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ल्याला काय करायचे आहेत ? आहेत घरांत. नाहीं पण आपल्याला ही पंचाईत कोणीं सांगितली आहे ? ताईनं जें जें आणायला सांगितलं आहे तें तें आपण आपलं नेऊन द्यावं. कारण, बाबांनीं उद्यांच्या मेजवानीचं काम सर्व तिच्यावर सोंपविलं आहे. तिनं थोडीशी रांगोळी, गुलाल, थोड्याश्या उदबत्या एक दोन आण्यांच्या, आणखी काय बरं, हो पण सगळंच विसरलों, तंबाखू–तो तर आपल्याला आधीं लागणार बुवा. आणखीं काय, हिंग, जिरेंमिरें मीठ मोहऱ्या सटर फटर बरंच सांगीतलं आहे. तर एवढ्या सगळ्याला काय बरं पडेल ?

भामट्या—(जमिनीवर पडून) अरेरेरे मेलोंरे मेलों ! आयायी ! आयाई ! अरे बाबा कुणीं आहे कारे ?

दिवट्या—अरे कोण रे काय म्हणतोस ?

भामट्या—अरे मला हात दे पाहूं ! नाहीं तर मरतों आतां.

दिवट्या—अरेरे काय झालं हें !

भामट्या—अहो त्यानं मला मारमारून माझ्याजवळ होतं नव्हतं तितकं सगळं लुबाडून घेतलं हो; आणि माझे स्वच्छ कपडे होते ते घेऊन हे मला घाणेरडे दिले हो ! आयायी !

दिवट्या—अरेरे ! तुला कोणीं मारलं चोरानं कीं भामट्यानं ?

भामट्या—अहो त्या भामट्यानच हो भामट्यानच.

दिवट्या—होय, या घाणेरड्या कपड्यांवरून तो भामट्याच असावा बरं ! बरं माझा हात धरून वर ऊठ पाहूं.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भामट्या--हळूच. आयायी! हळूच बाबा मी बेताबेतानेंच उठतों.

दिवट्या—अरेरे इतकं का तुझं आंग दुखावलं आहे?

भामट्या--होय, हा पाहिलास का कमरेचा कांटा ढिला झाला आणि हा बावटा निखळला. आतां काय करूं!

दिवट्या—तुझ्यानं उभं राहावेल कीं नाहीं?

भामट्या—थांब, थांब, हळूच अगदीं हळूच. (खिसा कापतो.) फार तुमचे उपकार झाले बरं! परमेश्वर तुमचं कल्याण करो. (स्वगत) आणि माझं असंच पोट भरो.

दिवट्या--बरं तुला कांहीं पैसे पाहिजेत का? पाहिजे असले तर देतों.

भामट्या--छे छे नको नको. केलेस हे उपकार थोडे का झाले? अहो इथून एक दोन कोसांवर त्या पलीकडच्या खेड्यांत माझा मामा राहातो तिथें मला जायचं आहे. तिथें गेल्यावर मला कांहीं कमी नाहीं. मला नकोत बरं तुमचे पैसे. (स्वगत) पोंचल्यासारखेच आहेत.

दिवट्या—तुला लुटलं तो कोणत्या तऱ्हेचा मनुष्य होता तुला माहीत आहे का?

भामट्या—अहो तो उनाड भामट्या सगळया गांवांत टोळभैरवाप्रमाणं इकडून तिकडे भटकत फिरतो तो नाहीं का तुम्हांला माहीत? राजपुत्राजवळ पूर्वी नोकरीला होता आणि त्याला असल्याच गुणामुळं तिथून हाकून दिला तो तो.

दिवट्या—असले गुण उधळले असतील म्हणूनच

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हाकून दिला असेल. चांगल्या मनुष्याला कोणीं हाकून लावील का ?

भामट्या--अहो, मी त्याला पुरा ओळखतों. कांहीं दिवस तो सुताराच्या हाताखालीं होता, कांहीं दिवस शिपाईगिरीवर होता, कांहीं दिवस आपले हातचलाखी-चे खेळ करून पोट भरीत होता आणि आतां तर त्यानं शुद्ध भामटेगीरीचे धंदे आरंभिले आहेत; गांवांत सुद्धां त्याला लोक भामट्या भामट्या म्हणून हाक मारतात.

दिवट्या--हं हं आलं लक्षांत ! तो तोच की नाहीं ? यात्रेंत जातो आणि लोकांचे खिसेच कातरतो. देवळांत जातो जोडेच चोरतो तोच कीं नाई ? मीं त्याला काळा गोरा कसा तो पाहिला जरी नाहीं तरी त्याची कीर्ति लोकांच्या तोंडून मीं पुष्कळ ऐकिली आंहे !

भामट्या—तोच हो तोच. त्यानंच, त्याच भाम-ट्यानं माझी अशी दशा केली.

दिवट्या--अरे त्यालाच का तूं भ्यालास ? तो लु-च्चा आहे पण फार भित्रा आहे असं ह्मणतात. त्याच्या वर जर तूं डोळे वटारतास तर त्यानं तिथून एकदम धूम ठोकली असती ! मीं असतों तर त्याला चांगलाच हात दाखविला असता. तूं भित्रा ह्मणून हें असं झालं.

भामट्या--होय बाबा मीं खराच भित्रा आहें; आणि भोळाही आहें, आणि ह्मणूनच त्यानं मला लुबाडलं.

दिवट्या—बरं पण आतां तुला कसं वाटतं ?

भामट्या—आतां जरा बरं वाटतं, आतां जाईन मी हळू हळू मामाच्या घरीं. तुम्ही जा आतां.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दिवट्या—मी येऊं का तुला पोंचवायला. ?

भामट्या—नको नको, इतके श्रम कशाला घेतां ?

दिवट्या—बरं तर उद्या आमच्याकडे रास आहे त्यासाठीं मीं बाजारांत सामान खरेदी करायला जातों, तूं नीट संभाळून जा हो! (दिवट्या जातो.)

भामट्या—आतां कसचं सामान घेतोस मूर्खा! तुझ्याजवळ काय होते नव्हते तेवढे सारे पैसे तर माझ्या खिशांत आले! काय ह्मणाला तो? उद्यां आमच्याकडे रास आहे? तर मग आपल्याला तिथे गेलंच पाहिजे! हाँ फक्कड, चला तर करून अक्कड, दाखवा उद्यां निराळाच थाटमाट, आणि असा घाला घाट कीं, सांपडेल बराचसा लाट. (भामट्या जातो.)

प्रवेश ४ था.

स्थळ—(गवळ्याचं घर-पुष्पशलि व वनमाला प्रवेश करितात.)

पुष्पशील—सुंदरी—

पद—(सुखोपभोगा.)

वसन किती हें शोभवी या सुंदर तव तनुला ॥
ह्मणेल आतां कोण सखये गोपसुता तुजला ॥
रत्न असें निपजे कसें तरी गोपकुळीं नुमजे ॥
अतिशय दुर्लभ शोधितांही त्रय भुवनांतरीं जें॥
वाटे अंबर सोडुनी हा शशि तव मुखकमलीं ॥
येऊनी झळके ही ह्मणुनि बघ शोभा या आली ॥१॥

आणि आज खेळण्याकरितां जे गोप जमले आहेत ते गोप नाहींत, तर मला असं वाटतं—

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पद—(उद्यां वघ जातें.)

वसे तव ठायीं । जें नसे अप्सरांनाही ॥ ध्रु० ॥
अनुपम रूप सुरम्य असें हें। ह्मणुनि सकल सुर
गोपरूपि हे ॥ पहावया तुज जमले पाहे । आ-
जिं या ठायीं । ज्या नसे गर्व मनीं कांहीं ॥ १ ॥

वनमाला—कांहीं तरी आपली माझी वाखाणणी करायची झालं; इतका का हा शालू मला शोभतो आहे? अगबाई पण इकडच्या बोलण्याला नांव कसं ठेवावं, नि इतकी माझी योग्यता तरी कुठं आहे ? नि हें काय हें? मी गवळ्याची मुलगी असून मला हा भरगच्ची शालू नेसायला दिला नि आपण हा अगदीं साधा पोषाख अंगावर घातला आहे, आपल्या योग्यतेला नाहीं बाई हा शोभत, नि मला हा असला उंची शालू नेसलेली पाहून मंडळी काय ह्मणतील ! बरं तें असो, पण आपण यापेक्षां चांगला पोषाख करावा गडे; मला नाहीं हा बरा दिसत !

पुष्पशील—पण मला बरा दिसला म्हणून मीं अंगावर घातला ना ? त्याबद्दल तुला कां इतकं वाईट वाटतं ? जाऊं दे तें. हें पहा त्या दिवशीं मी शिकारीला निघालों आणि सहज हिकडे फिरत फिरत आलों ह्मणून मीं आपल्याला किती भाग्यवान् समजतों.

वनमाला—पण मला बाई फार भिति वाटते; कारण, आपण भलताच विचार मनांत आणला आहे, हें कांहीं चांगलं नाहीं. आपली योग्यता कुठे नि माझी कुठे ? आपण कसे झालांत तरी राजपुत्र आहांत, नि मी काय गरीब गवळ्याची मुलगी; आपला नि माझा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जोडा कधीं तरी शोभेल का ? नि याबद्दल लोक आपल्याला नांवं नाहीं का ठेवणार ? नि शिवाय मला बाई दुसरीच भिति वाटते--

पद—(हा नृपती किति.)

सुचिन्ह हें नच दिसे मला तर ॥ ध्रु० ॥ अवचित जर या स्थानीं नृपवर ॥ मृगया करित करीत येतिल तर मग करितील आपुली ॥ काय दशा भय धरी मदंतर ॥ १ ॥ नृपसुत तुम्हीं गोपसुता मीं ॥ पाहुनि ऐसें त्यांस। चढेल अतिशय कोप अनावर। ह्मणुनि खचित भय धरी मदंतर ॥ २ ॥

नि असा हा भरगच्ची शालू नेसून त्यांच्यापुढं मला जावेल तरी का ?

पुष्पशील—वेडी आहेस तूं; याबद्दल भिण्याचं काय कारण ? अग देवादिकांनीं सुद्धां नव्हते का स्त्रिया मिळविण्याकरितां निरनिराळे वेष घेतले ? सुभद्रा मिळविण्याकरतां अर्जुनानं नव्हता का संन्याशाचा वेष घेतला ? वत्सला मिळविण्याकरतां अभिमन्यूला केवढा बरं प्रयत्न करावा लागला ? अग प्रयत्नाशिवाय का कुठे बायका मिळतात ?

वनमाला—पण महाराजांना जर ही गोष्ट कळली, नि त्यांना आवडली नाहीं. आवडेल कशी ? नाहींच आवडणार ! मग त्यांच्यापुढं आपलं कांहीं चालणार आहे का ? तसं झालं ह्मणजे आपल्याला माझा नाद सोडून द्यावा लागणार, नि मला माझ्या जिवाला मुकावं लागणार. नाहीं का मी ह्मणतें असं होणार ?

पुष्पशील—असले भलभलते विचार मनांत आ-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

णून आजच्या आपल्या आनंदाचा विरस नको करूं.

पद—(सुकुमार.)

मानसीं सखे कां अशी वृथा आणिसी कुतर्कासी या ॥ गुंतलों असें मीं प्रेमबंधनीं तुझीया ॥ ॥ १ ॥ जरि तात मदिय असुघात करिल निभ्रांत प्रेम तरि आपुलें ॥ वदलीन कधीं न मीं जाण मनीं तूं विमले ॥ २ ॥ सुंदरी हृदयमंदिरीं वसविली खरी रम्य तव मूर्ती ॥ नच दूर करीन ती प्राण जोंवरी असती ॥ ३ ॥

म्हणून मी ह्मणतों उगीच भलभलत्या शंका काढीत बसूं नकोस. आनंदी वृत्ती ठेव. ही पहा बोलावलेली मंडळी यायला सुरुवात झाली. आतां जरा स्थिर मन राहूं दे ! आपल्या उभयतांच्या सुखाचा दिवस आजचाच आहे असं समज.

वनमाला—जगदंबा असा सुदीन दाखवील तर आणखी काय हवं ?

पुष्पशील—ही पहा मंडळी आलीच. त्यांचा नीट आदरसत्कार कर. (वेषांतर केलेला शूरसेन व विश्वासराव, म्हातारा, दिवट्या व कांहीं मुलं मुली येतात.)

ह्मातारा—काय ग वनमाले, आपल्या इथं आलेल्या मित्र मंडळीचा आदरसत्कार करायचा, त्यांना या बसा म्हणायचं एवढं सुद्धां होत नाहींना तुझ्या हातून ? आलीकडच्या मुली फार आळशी बुवा; ती होती तेव्हां घरचं सगळं कामकाज ती स्वतः पाहात असे; कुठेही मला पाहावं लागत नसे; नाहींतर तुम्हीं. इकडची काडी इकडे करायची ह्मणजे तुमच्या जिवावर येतं ! तसाच

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तो दिवटच्या दिवसभर चकाट्या पिटीत असतो; आहे कशाची काळजी ?

वनमाला—या बसा असे. आपणही बसावं, या निमित्तानं तरी आज आमच्या इथं आपलं येणं झालं, नाहीं तर उगीच कोण कुणाकडे येतं आहे ? दादा अरे दादा, तीं मघांशीं मीं तोडून आणलेलीं फुलं इकडे आण पाहूं. (फुलांचं ताट घेऊन.)

पद.

फुलें सुवासिक हीं पहा किती। उल्हास देइ चित्तास खास हा ॥ वास मधुर पाही ॥ ध्रु० ॥ हीं सुवर्णचंपक कुसुमें सुंदर तशीं हीं ॥ मालती शेवती जाई जुईचीं कांहीं । मोगरा चमेली पारिजातकाचींही । मीं आणिलीं तुह्मांसाठीं घ्या हीं॥१॥

शूरसेन--मुली, तूं आमच्या वयाला योग्य अशीं हीं पांढरींच फुलं आम्हाला दिलींस !

वनमाला—पांढरीं फुलं सुवासिक असतात; नाहीं तर आमच्या या बागेंत रंगीबेरंगी फुलं थोडींका आहेत ? पण करायचीं काय तीं दिसायला मात्र. वासाच्या कांहीं उपयोगाचीं नाहींत ! तसलींफुलं मला मुळींच आवडत नाहींत ?

शूरसेन—तीं कां बरं ?

वनमाला—कारण तीं जशीं वरून सुंदर दिसून सुवासिक आहेतशीं वाटतात, तशीं तीं नसतात म्हणून !

शूरसेन—(स्वगत) एकूण ही गोपकन्या वस्तूच्या बाह्यसौंदर्याला भुलणारी नाहीं; अंतरगुण जाणणारी आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वनमाला—(विश्वासरावाला) हीं घ्या आपल्याला जाईचीं, जुईचीं, चमेलीचीं हवींतर हीं मोगऱ्याचीं घ्या; हीं आपल्या वयाला शोभणारीं आहेत !

विश्वासराव--हीं दिलीं आहेस एवढीं बस झालीं आणखीं नकोत !

वनमाला--(पुष्पशीलाजवळ जाऊन) सर्वांना फुलं देऊन झालीं आतां आपल्याला यांतून कोणतीं देऊं ?

पुष्पशील—मला हीं असलीं कोमेजून जाणारीं नकोत !

वनमाला--मग कोणतीं हवींत ?

पुष्पशील--मला पुष्कळ नकोत, एकच दे पण तें निरंतर टिकणारं असं दे !

वनमाला—काय तरी बाई असं कोणतं तें ?

पुष्पशील--तें बागेंत होत नाहीं, हृदयांत विकास पावतं.

वनमाला --तें आतां माझ्याजवळ आहे कुठें ?

पद. (तरी आतां ठकासी.)

अर्पिलें सुमन तें पूर्वींच या पदकमलीं । उरलें न अतां मजजवळीं। जपुनियां नीट हृत्स्थलीं॥ ठेवा तयाला दयाला सुनिर्मळीं ॥ १ ॥

आज मीं आपली आपल्या शालूच्या झोकांत रंगून गेलें आहे जशी !

पुष्पशील--अहाहा सुंदरी—

पद.(प्रभुपदीं सदा नमुनी.)

अनुपम तुझे असति गुण सारे । मन्मननयनविहारे ॥ ध्रु० ॥ ऐकोनी तव मंजु वाणि विरमे । चि-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चीं ही ती कोकिला ॥ होती ते मृग जाण लज्जित तसे । देखोनियां चक्षुला ॥ हंसातें तव मंदपाद-गतिही । सारील मागें खरी ॥ पाहोनी कटि ही गमें करिलची । स्पर्धा हरी अंतरीं ॥ अनुपम तुझे ॥ १ ॥

वनमाला—हें काय तरी बाई बोलणं? इतके वाखाणणी करण्यासारखे असे माझ्या आंगांत गुण कोणते आहेत? किती मेली थट्टा करायची तरी? (थांबून) किंवा असंही असेल कदाचित—

पद–(बहु मूल्य बहुविध)

अनिवार मनुज करी अंतरीं ज्या वस्तुवरि प्रीती । सर्वोत्तम अति प्रशंसनीया गमे तयाला ती । दोष अती । जरी असती । तरि त्यातें । नच दिसती । नवल न तिळभर यांत । असे ही जगताची रीती ॥ १ ॥

पुष्पशील—बरं प्रिये, चला आतां यांच्याबरोबर आपल्याला खेळायचं ना?

शूरसेन—काय आश्चर्य आहे पहा—

पद—(भैरवी)

चतुर सुगुणि बाला रूपखाणी अशी ही । सुख मदिय मना जी देतसे फार पाही । विमल मन हिचें हें वाणि ही गोड भारी । विनयवति अशि ही लोचनानंदकारी ॥ चाल ॥ गोपकुलिं कशी जनन पावली ॥ ध्रु० ॥ कृती रीती इची सारी । मज गमे बघुनि मनिं नृपालकुलिं खचितची असे जाहली ॥ गोपकुलिं कशि० ॥ १ ॥

[सर्व गोप गोपी मिळून ह्मणतात.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पद.

कुंजवनीं गोपगोपींसवें हरि । नानापरिचे खेळ टिपऱ्यांचे । खेळूनि आनंदें दाही दिशा भरी कुंजवनीं० ॥ ध्रु० ॥ आपण तेवीं सकल मिळुनी । खेळुं टिपऱ्या सुखें करुनी । सुप्रसन्नें करुनि वदनें । ईशगुण ते गाउं वदनें । नानापरीचे०

श्लोक

राहे सदा तत्पर पाणि ज्याचा ॥
वारावया तापचि सज्जनांचा ॥
तो द्वारकाधीश हरी अह्मांतें ॥
देवो मती तद्गुण गावयातें ॥ चाल ॥

नतजन तनमन उपरम तो हरि । नानापरीचे ॥

[टिपऱ्या खेळण्याचे वेळीं पद ह्मणतात.]

पद—(ताल दादरा)

करुं नमना, भयशमना, सदयमना, सुखसदना, करिदहना, जो दुरितांना । त्या गाऊं अणि ध्याऊं, त्या गोपीरमणा, श्रीकृष्णा गोपाळा गो-विंदा ॥ ध्रु० ॥ नंदानंद चिदानंदा । विमलपदा धरुं त्वच्छंदा । हरि विपदा, सुख दावि सदा । मन न करी । कठिण हरी । श्रीकृष्णा गोपाळा गोविं-दा ॥ १ ॥

[दुसरें पद ह्मणतात.]

ताल धुमाळी.—(मदनारी गौरी या. चा.)

गिरिधारि तारी तारी । संसारीं षडरी । छळिती हे । तापातें करिती । शांतिसुखा हरिती ॥ जगपालका । दनुजांतका । सुखदायका । विश्वेशा । निजपदिं थारा । जगदोद्धारा । देई अक्षय आह्मांतें । जननमरणहरण तूं । करिसि दु-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रित शमनही । चरणिं शरण ये तयां । सकलां
देशी सन्मुक्ती । गोविंदा, गोपाळा, माधवा, या-
दवा, वासुदेवा, देवा, सर्वेशा । श्रीकांता, गुण-
वंता, भगवंता, दामोदरा ॥ १ ॥

शूरसेन—कां हो झातारे बुवा, तो तुमच्या मुलीचा हात धरून खेळतो आहे, तो मुलगा कुणाचा हो ?

झातारा—अमक्याचाच असं कांहीं मला सांगतां यणार नाहीं, पण त्याला कृष्णा असं ह्मणतात, मीं कांहीं त्याच्याविषयीं फारशी चौकशी केली नाहीं, पण तो सांगतो कीं, माझ्या पुष्कळ गाई ह्मशी आहेत ह्मणून ! आमच्या वनमालेवर त्याचं फार प्रेम बसलं आहे आणि तिचंही त्याच्यावर आहे; तीं दोघंही एकमेकांना अगदीं जीव कीं प्राण समजतात !

शूरसेन—मुलगी टिपऱ्या फार चांगली खेळते.

झातारा—अहो तुह्मांला काय सांगूं—

पद—(लावणी)

असे हुशार ती तशी बहुगुणी ॥ ध्रु० ॥ थोरां-
च्याहि ठायीं । इच्यापरी चतुराई । खचित न
राही जाणा तुह्मीं निजमनीं ॥ १ ॥ समजा न
परी तुह्मीं असें मनीं कांहीं । माझी ह्मणुनी मी
तीची करीं वाखाणणी ॥ २ ॥

हें पहा, जमलं तर या कृष्णाशीं इचं सालंकृत कन्यादान करावं असं माझ्या मनांतून आहे.

१ गोप०—अहो, अहो, बाहेर एक कोमटी आला आहे. मोठी गंमत करतो बुवा.

दिवट्या—अरे, जा त्याला घेऊन ये पाहूं !

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

म्हातारा—अरे, कोमटी म्हणतोस तर त्याच्याजवळ कांहीं जिनसा आहेत का विकायच्या ?

१ गोप०—हो हो पुष्कळ आहेत. (मुलगा जातो व कोमट्यासह येतो.

कोमटी—

पद—(फटका.)

पुजेच्या थाळ्या नैवेद्याच्या वाट्या घ्या हो ॥
पितळेचीं पानसुपारीचीं हीं तबकें घ्या हो ॥
मुलांचे गमतिचे हे साचे खेळ पाहा हो ॥ मा-
तीचीं नाना रंगाचीं हीं चित्रें घ्या हो ॥ सुंदरशीं
उपकरणीं हीं खाशीं पाहुनि घ्या हो ॥ १ ॥

दिवट्या—तुझ्याजवळ रंगीत पाट आहे का ?

कोमटी—हो दादासाब, हा पहा रंगीत पाट, वा रे रंगीत पाट काय याचा थाट वेलबुट्टी दाट माल चोख पैसे रोख दाम करी काम बीबी करी सलाम. (सर्व हंसतात.)

दिवट्या—याची किंमत काय ?

भामट्या—एक रुपया पडेल भाऊसाब.

दिवट्या—(खिसा पहातो.) अरे कालच एका भामट्यानं माझा खिसा कातरलान रे. नाहीं तर आज मीं पुष्कळ वस्तू घेतल्या असत्या.

कोमटी—या गांवांत आजकाल पुष्कळ भामटे झाले आहेत.

भावका—अरे, तुझ्याजवळ एखादा कुंकवाचा करंडा असला तर काढ पाहूं.

कोमटी—हा घ्या. वा रे करंडा कुंकवाचा, माल

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आमचा, सौदा साळूबाईचा, माल तशी किंमत, नियत तशी बरकत, दाहा आण्यासाठीं, होऊं नका कष्टी, सोडा ढिला हात, माल घ्या पदरांत, माल चोख, दाम रोख, दाम करी काम, बीबी करी सलाम.

एक मुलगी--अरे, तुझ्याजवळ एखादा आरसा आहे का?

कोमटी--हा घ्या. वा रे भिंगाचा आरसा, यावर आमचा वारसा, चार आणे किंमत, धरा हिंमत, हौसेचं काम काढा दाम, दाम करी काम बिबी करी सलाम. (सगळा माल खपवून जाऊं लागतो त्याला आडवून.)

दिवट्या--अरे एखादं गाणं ह्मण पाहूं.

भामट्या--ऐका रावसाब--

पद.--(कटाव.)

घोड्यावरती आमची स्वारी । बसुनि निघाली पेन दुपारीं ॥ लंगडत लंगडत आमुचे घोडें । चाले मधेंच थांबे थोडें ॥ मारमारुनी केलें जर्जर । तरी न उचली पाउल झरझर ॥ पुरेपुरेसें केलें त्यानें । कहर उडविला फार उन्हानें ॥ तहान लागुनी प्राण चालले । डोळ्यांवाटे पाणी आलें घोडें हट्टी फार मिळालें । कांट्यामधुनीं चालूं लागलें ॥ थकुनि गेलें अखेर एका । खड्यामध्यें जाऊनि पडलें ॥ आमुची स्वारी त्यासरशी । उलथुनी पडली तोंडघसी ॥ १ ॥

[जातो व त्याचे मागून दिवट्या वगैरे मंडळी जातात.]

शूरसेन--मजल फार लांबवर पोंचली आहे; पुष्पशील इच्या प्रेमपाशांत बराच सांपडला आहे. याला इच्यापासून लौकर दूर केला पाहिजे; या भोळ्या ह्माता-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ऱ्यानं सर्व कांहीं खरा खरा मजकूर सांगितला (उघड पुष्पशीलास.) काय हो, तुह्मीं आपल्याच आनंदांत दंग होऊन राहिला आहांत ? तुमच्या प्रियतमेवांचून तुह्मां-ला दुसरं कांहीं सुचतच नाहीं ! पण का हो, इतकी ती तुह्मांला प्रिय असून तुह्मीं तिला तो कोमटी आला होता त्याच्यापासून एखादी चांगलीशी वस्तु विकत घेऊन दिली नाहींत हें कसं ?

पुष्पशील——तुह्मीं ह्मणतां तें खरं आहे; पण तिला असल्या क्षुल्लक वस्तू आवडत नाहींत. कारण—

पद—(दिंडी.)

मनापासुनि जें आवडे तियेतें । मदिय हृदयांत-
रीं वसतसे पहा तें । अजुनि तिजला तें जरी
दिलें नाहीं । योजिलेंसे तिजसाठीं तरी पाही ॥१॥

हें बघ प्रिये, आपल्यापेक्षां जगांत यांना बरेच टक्के-टोणपे खावे लागले आहेत. तेव्हां जगाचा अनुभव आ-पल्यापेक्षां यांना जास्त आहे. तर यांच्या समक्ष मी तु-ला आपली असं ह्मणतों.

शूरसेन——अहो छोटे गृहस्थ, पण हें तुमचं बोलणं असंच कायम राहील असं कशावरून समजावं ? याला प्रमाण काय ?

पुष्पशील——माझं वचन हेंच याला प्रमाण. आण-खी फार काय सांगूं ? पण—

पद—(खोटी तुजवरती) धुमाळी.

धनद जरी तो समग्र मजला । अर्पिल निजसं-
पत्ती विपुला । गीष्पती देइल निज विद्येला । सु-
रूप मन्मथ दे ॥१॥ अथवा सार्वभौमपद मातें ।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

। प्राप्त जाहलें दैवें जरितें । मानिन तुच्छचि या सर्वांतें । मद्दयितेपुढती ॥ २ ॥

शूरसेन—शाबास !

विश्वासराव—याला ह्मणावं खरं प्रेम !

ह्मातारा—मुली, तुला ही गोष्ट पसंत आहेना ?

वनमाला—मला काय विचारतां बाबा ? मी काय सागूं ?

ह्मातारा—ठीक आहे तर मग; जांवईबुवा, यांच्या समक्ष सांगतों कीं, माझी मुलगी मी तुह्मांला देईन; आणखी वर तुमच्या योग्यतेप्रमाणं आंदणही देईन.

पुष्पशील—इचें सद्गुणधन हेंच मी आंदण समजतों [एकीकडे] पण मी राजपुत्र आहें हें याला कुठें ठाऊक आहे ? (उघड) पण हा तुमचा निश्चय अगदीं कायम झालाना ?

ह्मातारा—हो हो; बाळे, जरा इकडे ये पाहूं ? कसा जोडा शोभतो तो पाहूं दे !

शूरसेन—ह्मातारेबुवा, जरा थांबा ! काय रें बाबा, तुझा बाप जिवंत आहे का ?

पुष्पशील—होय आहे; मग त्याचं काय ?

शूरसेन—त्याला ही गोष्ट माहीत आहे का ?

पुष्पशील—नाहीं—अन् त्याला कळवायचीही नाहीं.

शूरसेन—असं कां रे बाबा ! लग्नाच्या कामांत बापाचं मत घ्यायला तुझी कोणती हरकत ? तुझा बाप फार वृद्ध झाला आहे का ? किंवा त्याच्या बुद्धीला भ्रंश झाला आहे ? त्याला कानांनीं ऐकूं येत नाहीं ? डोळ्यानीं दि-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सत नाहीं ? तर मग तो अगदीं व्यवहारशून्य असला पाहिजे !

पुष्पशील---यांतलं कांहींच नाहीं; वयाच्या मानानं तो चांगला सदृढ आहे.

शूरसेन---असं खरंना पण ! हें पहा, मुलं आपण होऊन बायका पसंत करूं लागलीं तर त्यांत गैर आहे असं मला वाटत नाहीं; तोही एक पुढं सुखासमाधानानं रहाण्याचा मार्ग आहे. पण पुत्राच्या कल्याणाकडे लक्ष बाळगणाऱ्या आईबापांचंही त्याला अनुमोदन असावं असं मी म्हणतों ! तुला कसं वाटतं ?

पुष्पशील---तुमचं ह्मणणं खोटं कोण ह्मणतो ? पण तसं न करायला माझीं कांहीं कारणं आहेत; तीं तुमच्यापाशीं सांगत बसून काय करायचं आहे ? माझ्या बापाला ही गोष्ट कळवायची नाहीं.

शूरसेन---असं करूं नये बाबा ! कळीव, कळीव !

पुष्पशील---ही गोष्ट घडायची नाहीं.

शूरसेन---छे रे बाबा, त्याला ही गोष्ट कळलीच पाहिजे !

पुष्पशील---छेः ही गोष्ट कालत्रयीं घडणार नाहीं !

ह्मातारा---जांवईबुवा, असं काय बरं ? वडलांना कळवाच ही गोष्ट ! त्यांना याबद्दल कांहीं वाईट वाटणार नाहीं, उलट संतोषच होईल.

पुष्पशील---नाहीं मी कळविणार नाहीं; तुह्मांला हा संबंध कर्तव्य आहे कीं नाहीं हें सांगा !

शूरसेन---कोण कसा संबंध करतो तो पाहूं बरं [प्रगट होऊन] हा मूर्खा---

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पद—(धमार)

मूढ किति मतिमंद असशी । वदायाही पुत्र तुजशी । लाज वाटे मन्मनासी । नीच कृति ही बघुनि तव पोरा ॥ १ ॥ राजकुलजा सोडुनियां गोपकन्या ही वराया । काशि न वाटे खंति तुझिया । तिळहि हृदया नृप कुलांगारा ॥ २ ॥

थेरड्या, तुला तोफेच्याच तोंडीं द्यायला पाहिजे होतं! म्हातारपणीं तुला हे ढंग आठवले नाहीं का? कां ग ए पोरी तुला होतं कीं नाहीं माहीत कीं ज्याच्यावर आपण प्रीति करतों तो राजपुत्र आहे ह्मणून ? बोल.

म्हातारा—-हाय रे नशीबा!

शूरसेन—-अग ए गवळ्याचे कारटे, तूं आपल्या सौंदर्यानं राजपुत्राला मोहीं घालूं पहातेस तर थांब, तुला कुरूप करून तुझ्या महत्वाकांक्षेचे पंखच उपटून टाकतों ह्मणजे तिला आणखी तरी भराऱ्या मारायला जागा नको. मूर्खा, तुला जर पुन्हां इथे पाहिला, तर तुझी तंगडी मोडून तुला होतास कीं नव्हतास करून टाकीन, आणि हेंही पकं ध्यानांत ठेव, कीं असले भलभलते चाळे केलेस तर माझ्या मागं हें राज्य सुद्धां तुला मिळणार नाहीं. नीघ येथून. थेरड्या तुझे केंस पिकले, तुला लाज नाहीं? वाटत ? तूं आतां थोडक्याच दिवसांचा सोबती ह्मणूनच तुला गय करतों. अग सुरूप पोरी, तूं आपल्या जातीचा, आपल्या बरोबरीचा, योग्यतेचा नवरा पाहून जर वरलास तर तुझ्या सौंदर्याचं चीज होईल! तुझं रूप व तुझे गुण पाहिले तर एखाद्या सार्वभौम राजाची पट्टराणी असावीस असं वाटतं; परंतु तुझ्या कुलानं

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तुला फार फाशिवलं आहे; खबरदार! पुन्हां जर याला आपल्या घरीं येऊं दिलास तर! (जातो.)

वनमाला—हाय रे दैवा शेवटीं माझ्या सुखांत तूं विष कालवायला कमीं केलं नाहींस हँ! तरी मी ह्मणत होतें नको बरं नको! पण आपण कुठं माझं ऐकलं! एक दोन वेळां, सूर्य राजवाड्यावर मात्र प्रकाशतो नि गरिबाच्या झोंपडीकडे ढुंकून सुद्धां पहात नाहीं असं का आपलं म्हणणं? असं त्यांना विचारावंसं मनांत आलं होतं; पण ह्मटलं नको. बरं, आतां तरी महाराज, या गवळ्याच्या पोरीकरतां राज्याला मुकूं नका; पुरे झालं. मनांतल्या मनांत राजाची सून समजत होतें तेवढंच पुरे. मला माझ्या गाईच लखलाभ होवोत. देवा, शेवटीं तूं माझ्या आशेचा असा शेवट केलासना!

विश्वासराव—कसं काय ह्मातारेबुवा, बोला हें काय प्रकरण आहे तें? नाहींतर निरर्थक प्राणाला मुकाल बरं.

ह्मातारा—मला अतां कांहीं विचारूं नका अन् मला माहीत आहे तेंही माझ्यानं आतां सांगवत नाहीं; चांगलं केलंस बाबा; या ऐंशीं वर्षांच्या ह्मातान्याच्या तोंडाला काळोखी आणली नव्हती ती तूं आणलीस! झाला सर्वस्वीं घात झाला! कारटे, हा राजपुत्र आहे असं तुला माहित असून तूं याच्या नादीं लागून आपल्यावर नि माझ्यावर हा प्रसंग आणलास. आतां या घटकेला मरण येईल तर मीं आपल्याला इच्छामरणी समजेन. (जातो.)

पुष्पशील—(विश्वासरावास) कां माझ्याकडे पाहून तुह्मांला वाईट कां वाटतं? आकाश कोसळलं तरी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हा पुष्पशील कधीं डगावयाचा नाहीं आणि आपला कृत-संकल्प कधीं बदलायचा नाहीं!

पद—[बेहाग]

क्षणैक थांबे ओघ नदीचा। अचल आडवा पड-
तां साचा। जनकवच तसें कुंठित करितें। प्रे-
मझरा या क्षणिं मन्मनींचा। टाळुनि गिरि प-
रि जलधिस जाई। मिळण्या तो जैसा। इज-
साठीं मत्प्राणहि विघ्ना। अवमानिल तैसा ॥१॥

विश्वासराव—महाराज, आपण थोरल्या महाराजांचा स्वभाव पुरा ओळखतांच आहांत; यावेळीं ते कोणाचंही ऐकणार नाहींत, तेव्हां त्यांचा राग शांत होईपर्यंत आपण त्यांच्यासमोर जाऊं नका!

पुष्पशील—नाहीं जायचा! आपण विश्वासराव नव्हे का?

विश्वासराव—होय तोच मीं.

वनमाला—असं होईल ह्मणून मीं आपल्याला कितीदां बरं सांगितलं होतं? नि असंही नव्हतं का ह्मटलं कीं, मी राजाची सून कुठपर्यंत; ही गोष्ट कुणाला कळली नाहीं तोंपर्यंत!

पुष्पशील—अजून काय झालं आहे? तूं राजाची सून होणार नाहींस असं का तुला वाटूं लागलं आहे? हें पहा, एक वेळ समुद्र आपली मर्यादा सोडील पण माझं वचन मी कधींही मोडणार नाहीं. तुझा वियोग करून जर बाबा मला राज्य देत असले तर मला नको तें त्यांचं राज्य. माझी प्रिया हेंच मी आपलं राज्य समजेन.

विश्वासराव—हँ हँ महाराज, हें अती झालं बरं! कांहीं विचार करा.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पुष्पशील—अती होवो किंवा अतीरेक होवो ! पण एकदां जें मीं वचन दिलं तें दिलं.

पद. [प्रसन्न होऊनी.]

राज्यलोभ विभवाशा अथवा । भूधृतधनाभिलाषा ॥ धरुनी त्यापरी महोदधीधृत । सुरत्न समुदायाशा ॥ नच करि निजवच भंगातें । त्यागिन कधिं नच दयितेतें ॥ १ ॥

विश्वासराव, महाराज तुह्माला आपले परम स्नेहीं मानतात. तेव्हां तुह्मीं आतां इतकंच करा कीं—

पद.

बहुपरी कथुनि जनकासी । शांत करा तत्कोपासी प्रिय हेंचि करा मम आतां ॥ ध्रु० ॥ प्राक्तन माझें जिकडे मजला ॥ नेइल तिकडे जातों मी तर आतां । होईल सुख न मज सदनीं ॥ प्रियतम या सखीवांचोनी । असू जातिल त्यजुनी तनुसी सोसुनी विरह दुःखासी । प्रिय हेंचि करा मम आतां ॥ १ ॥

माझ्या सुदैवानं बंदरांत जहाजही तयार आहे, त्यांत बसून आम्हीं जाणार ! आतां कुठे जाणार हें कळल्यापासून तुह्मांला कांहींच फायदा नाहीं मग कळवून तरी काय करायचं आहे ?

विश्वासराव—महाराज, आपण या वेळीं आपला हेका सोडून जर कुणाचं ऐकाल तर तें माझं ऐका; आपली पोरबुद्धि आहे एवढ्याकरतां ही बाहेर जाण्याची कल्पना बिलकुल मनांत आणूं नका.

पुष्पशील—यावेळीं तुह्मीं मला कांहीं सांगू नका, तुमचं ह्मणणं मी पुन्हां केव्हां तरी ऐकेन. प्रिये, जरा इकडे ये पाहूं. (दोघें एकीकडे जातात.)

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विश्वासराव—यांचा तर अगदीं जाण्याचाच निश्चय दिसतो तेव्हां अतां कसं करावं? (विचार करून) हँ ही युक्ती बरी आहे; एका दगडानं दोन फळं पाडतां येतात. असं केलं ह्मणजे हेही भलतीकडे जाणार नाहींत आणि आपलाही मतलब साधेल! या योगानं तरी चित्रपाल महाराजांचं आणि आपल्या जन्मभूमीचं पुन्हां दर्शन होईल.

पुष्पशील—(प्रवेश करून.) विश्वासराव तुह्मीं अजून इथेंच! तुमच्या जवळ बोलायला मला आतां मुळींच वेळ नाहीं. मला फार घाई आहे.

विश्वासराव—आपण जर आपला हेका सोडितच नाहीं तर निदान मी सांगतों असं तरी करा; आपण यांना घेऊन कांचनपुराला चित्रपाल महाराजांकडे जा; आपल्याला पाहून त्यांना संतोष होईल.

पुष्पशील—सर्व खरं पण विश्वासराव, जर त्यांनीं माझ्या येण्याचं कारण विचारलं तर काय सांगूं?

विश्वासराव—त्यांना ह्मणावं कीं आपलं समाधान करण्याकरितां मला महाराजांनीं पाठवलं आहे ह्मणून. आतां महाराजांचा जो निरोप त्यांना कळवायचा त्यांतलं मुख्य मुद्याचं टिपण मीं तुह्माला करून देईन, तें फक्त त्यांना महाराजांना, किंवा मलाच माहीत आहे. असं केलं ह्मणजे कोणत्या प्रसंगीं काय बोलावं हें आपल्याला नीट समजेल, आणि त्यांनाही आपल्या जाण्याचं खरं कारण समजणार नाहीं.

पुष्पशील—तुह्मीं इतक्या बारीक सारीक गोष्टी सांगता तेव्हां तुमच्या सांगण्यांत कांहीं तथ्य आहे खरं.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विश्वासराव—मीं सांगितला हा विचार तुमच्या पूर्वीच्या विचारापेक्षां हितकर आहे कीं नाहीं, हें तुमच्या आतां ध्यानांत आलंच असेल! शिवाय आपण परदेशांत गेलांत तर आपल्यावर कोणतीं संकटं येतील याचा नेम नाहीं. कारण——

साकी

एकामागुनि एक संकटें। येउनी उभीं राहाती॥
वारावें जों एक तों दुजें। दत्त ह्मणोनीं पुढती॥
ठाके येऊनि तें। विघ्नां विघ्न पहा आणितें॥ १॥

आणि शिवाय–

दिंडी.

प्रेमबंधन दृढ सौख्यकालिं होई॥ विपत्कालीं तें नष्ट होत जाई॥ हरि विपदा वदनिंचें तेज जैसें। प्रेम मनिंचेंही लया नेई तैसें॥ १॥

वनमाला—यांपैकीं 'हरी विपदा वदनिचं तेज' एवढं खरं; 'पण प्रेम लया नेई' हें मात्र खोटं. कितीही संकटं आलीं तरी प्रेमांत कांहीं अंतर पडणार नाहीं. तें जिथं खरं असतं तिथं अधीकच उलट होत जातं.

विश्वासराव—अहाहा! या इच्या बोलण्यांत किती तरी अर्थगौरव आहे! गोपकुलांत असं कन्यारत्न क्वचितच दृष्टीस पडायचं.

पुष्पशील—विश्वासराव, आमचा जन्म थोर कुलांत झाला आहेना, पण आह्मांला सुद्धां ही आपल्या शहाणपणानं थक्क करून सोडते.

विश्वासराव—यांना शिक्षण नाहीं असं कोण ह्मणेल! वयातीतांना सुद्धां कित्ता घालून द्यावा असं यांच्या आंगीं शहाणपण वसतं आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वनमाला--हें काय तरी बोलणं बाई! मला काय कळतं आहे! उगीच कांहीं तरी ह्मणायचं झालं.

पुष्पशील—हर हर! काय हा आजचा दिवस उजाडला आहे! काय हा दुर्घट प्रसंग! विश्वासराव, तुम्हीं मला कांचनपुरला जायला सांगतां पण तिकडे मीं कसा जाऊं? कारण विलासपूरच्या युवराजाच्या योग्यतेप्रमाणं माझ्याजवळ इतमाम कांहींच नाहीं तेव्हां मीं तिकडे नाहीं–

विश्वासराव—त्याबद्दल आपण काळजी करूं नये. कांचनपूर ही माझी जन्मभूमि आहे. तिथें आपली उत्तम रीतीनं व्यवस्था राहील अशी मी इकडून तजवीज करीन; कशी ती इकडे या ह्मणजे मी तुह्मांला सांगतों.

(एकीकडे जातात. भामट्या प्रवेश करितो.)

भामट्या—या जगांत असे भोळे लोक आहेत ह्मणूनच आमची चैन चालली आहे. सगळेच आमच्या सारखे कार्यसाधु असते तर आह्मांला उपाशींच मरण्याची पाळी आली असती. कितीतरी ते लोक भोळे! मी तिथे जातांच माझ्या भोंवतीं जमले काय, माझ्या चटकदार भाषणावर खूष झाले काय, मला अमूक गाणं ह्मण तमूक गाणं ह्मण, ह्मणून ह्मणूं लागले काय! जसा काय त्यांना मी एक लोकोत्तर मनुष्य आहें असंच वाटलं. पण त्यांचा हा भोळेपणा आपल्या तर पथ्यावर पडला बुवा! विकायला ह्मणून जितकं सामान घेतलं होतं तितकं सारं पार खलास होऊन गेलं; कोणी चित्रं, कोणी आरसे, कोणी वाट्या, कुंकवाचे करंडे, कुणी गुंड्या, कोणी कांहीं कोणी कांहीं मिळून आमचा सारा माल ख-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पून आमची तुमडी तर भरलीच. तो दिवट्या–नांवाप्रमाणं खराच बेटा दिवट्या! माझं तें लंगड्या घोड्याचं गाणं ऐकून तर त्याला हर्षवायूच होण्याची वेळ आली; तेवढ्यांत आम्हीं आपलं नेहमींचं हातचलाखीचं हातखंडं काम सुरू केलं. कुणाचं धोतर–कुणाचं पागोटं खाकोटीस मार–कोणाचा रुमाल उपट–कोणाच्या टोप्या पळीव–आणखींही पुष्कळ लाट मारायला सांपडला असता पण मधेंच त्या ह्यातार्‍यानं येऊन कोण गोंधळ उडवला! तो म्हणाला या कारटीनं राजपुत्राला घरीं आणून माझा सर्वस्वीं घात केला! माझ्या तोंडाला काळोखी लावली! मग काय विचारतां? माझ्याभोंवतीं गोळा झालेलीं पाखरं भरदिशीं उडून गेलीं. (विश्वासराव, पुष्पशील व वनमाला येतात.)

विश्वासराव—नाहीं पण आपण तिथें जातां तोंच माझीं पत्रं त्यांना पोंचतील; मग शंका घेण्याचं कारणच उरलं नाहीं.

पुष्पशील—अन् तुमचीं पत्रं पाहून चित्रपाल महाराज तुम्हाला जीं उलट पत्रं पाठवितील तीं पाहून––

विश्वासराव—मग काय विचारतां आपल्या वडलांना फारच आनंद होईल. (पाहून) कोण आहे रे तो? कुणी कां असेना; या वेळीं हा इथें सांपडला हें बरं झालं. याच्यापासून आपल्याला पुष्कळ उपयोग करून घेतां येईल. वेळेला गवताचा सुद्धां उपयोग होतो; मग याचा होईलच होईल.

भामट्या—(स्वगत) जर माझं बोलणं यांनीं

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ऐकलं असेल तर आमची पुरी कंबक्ती भरलीच म्हणून समजलं पाहिजे. (कांपूं लागतो)

विश्वासराव--अरे असा कांपतोस कां ? तुला कोणीं मारतो आहे का?

भामट्या—मीं आपला गरीब माणूस आहें महाराज.

विश्वासराव--मग तुझी गरिबी थोडीच कुणी घ्यायला बसला आहे? पण तुझ्या गरीबीचीं चिन्हं मात्र घेतलीं पाहिजेत. हें बघ आपले सगळे कपडे काढून यांना दे, आणि यांचे तूं घाल; पहा वाईट जाऊन चांगले मिळताहेत. कारण विचारीत बसूं नकोस.

भामट्या--छे छे, महाराज मला गरिबाला कशाला हवेत तसले! [स्वगत] मी तुम्हांला पुरा ओळखतों आहें.

विश्वासराव—चलरे बाबा आटप लवकर, यांनी आपले कपडे काढले सुद्धां.

भामट्या--खरंच पाहिजेत का, कां माझी आपली गरीबाची थट्टा करतां ?

विश्वासराव--आटपरे बाबा काढ लवकर.

भामट्या--मी गरीब आहें तेव्हां असले घाणेरडे कपडे यांना देऊन त्यांचे चांगले कपडे घेणं मला बरं नाहीं वाटत.

विश्वासराव--दे लवकर. बोलण्यांत वेळ घालवूं नकोस. (पुष्पशील-भामट्या-कपडे बदलतात) (वनमालेला) तुम्हींही कुणाला ओळखूं येणार नाहीं अशा रीतीनें या वस्त्राचा बुरखा घ्या. (एक वस्त्र देऊन) हें

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पहा वारा वाहील तशी पाठ दिलीच पाहिजे. (पुष्पशी-लाला) कां आटपलं का आपलं ?

पुष्पशील---हो आटपलं--आतां प्रत्यक्ष महाराजांनीं जरी मला पाहिलं तरी मी त्यांना सुद्धां ओळखूं यायचा नाहीं.

विश्वासराव---(भामटयाला जायला सांगून) खरो-खर महाराज वेषांतर अगदीं बरोबर बेमालुम साधलं आहे.

पुष्पशील—बरं तर विश्वासराव आम्हीं आतां तार-वावर जातों.

विश्वासराव--ठीक आहे लवकर जाल तितकं चां-गलं, नीट संभाळून जा. (पुष्पशील वनमाला जातात.) (स्वगत) आतां हीं तारवांत बसून गेल्यावर, महारा-जांना हीं अमूक ठीकाणीं पळून गेलीं ह्मणून सांगावं ह्मणजे महाराज ताबडतोब त्यांच्या शोधाला निघतील, अर्थात मलाहि घेऊन जातील. अहाहा ! एखादं मूल आपल्या आईला भेटण्याकरितां जितकं उत्कंठित होतं तितकाच या वेळीं मी माझी जन्मभूमि पाहण्याकरतां झालो आहे. (जातो.)

प्रवेश ५ वा.

भामटया--(प्रवेश करून)हें प्रकरण काय तें मला समजून चुकलं. मी लोकांच्या गजव्यांत अंतर ज्ञानानं शिरून त्यांनीं आपला पैसा अव्यवस्थित खर्च करूं नये ह्मणून त्यांच्यापासून काढून घेणारा माणूस--माझ्यापुढं हे किती लपवून ठेवणार ? आमची हातचलाखी तर पुसूंच नका; आणि या गोष्टी ज्यांला अनुकूल असतील

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्यांनींच कराव्या; उगीच आपला कोणीं ह्मणेल कीं आ-ह्मीं करूं तर दांत पडतील दांत! आजकाल दैवाची मा-झ्यावर पूर्ण कृपा आहे ह्मणूनच जिकडे जावं तिकडे आपला लाग लागतोच; हे पहा मळके जाऊन चांगले उंची कपडे मिळाले आणि आमचे छोटे महाराज अंग-वस्त्रासह थोरल्या महाराजांना चोरून फरारी झाले हें ही पण कळलं (पाहून) हे कोण बरं? ही पहा दुसरी शिकार! काय गंमत आहे पहा, देवळांत जा, बाजारांत जा, यात्रेंत जा, कचेरींत जा, कुठेंही जा आमच्या सा-रख्या उद्योगी माणसांना काम आपलं हात जोडून आहेच. (ह्मातारा व दिवट्या येतात.)

दिवट्या——आतां काय सांगावं बाबा तुह्मांला? या-शिवाय आतां दुसरा मार्गच नाहीं; महाराजांना जाऊन असं सांगितलं पाहिजे कीं ताई कांहीं आमची मुलगी नाहीं. ती आह्मांला रानांत सांपडली आहे.

ह्मातारा——नाहीं. मीं सांगतों तें ऐक.

दिवट्या——माझं ऐका. ताईनं चूक केली ह्मणून त्यांत आमचा काय दोष, ती आमची थोडीच आहे? मग म-हाराज आपल्याला काय ह्मणून शिक्षा करतील? म्हणून म्हणतां ते ताईचे दागिनें—ती आपल्याला सांपडली तेव्हां तिच्या आंगावर होते तेवढे काढून बाकीचे सटरफटर दाखवूं नेऊन नी काय?

म्हातारा——हो; महाराजानां मी सारी झालेली ह-कीगत सांगेन, त्यांच्या मुलानं केलेले सर्व चाळे त्यांच्या कानांवर घालीन. काय बेटयानं लबाडी चालविली होती पहा! मला फसवायला पहात होता, आणि आपल्या बा-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पालाही फसवायला पहात होता ! मला बेटा महाराजांचा व्याही करणार होता व्याही ! !

भामट्या—हं समजलों हे आमचे दिवटे बरं दिविटे ! शुद्ध बैलोबा खरे !

म्हातारा—चला तर महाराजांकडे जाऊं अन् त्यांना या पेटींत काय आहे तें सारं दाखवूं म्हणजे त्यांना आश्चर्य वाटेल.

भामट्या—(स्वगत) पण थांबा हां ! यांच्या महाराजांकडे जाण्यानं आमच्या छोट्या महाराजांचं कांहीं नुकसान तर नाहींना होत ?

दिवट्या—महाराज वाड्यांत मात्र असले पाहिजेत.

भामट्या—(स्वगत) जरी आम्ही मुळचे प्रामाणीक नाहीं तरी प्रसंगानुसार तसं व्हावं लागतं ! पण कोमट्याचा हा वेष घेतला होता तेव्हांची ही मिशी काढून टाकावी (काढून) अरे ए गांवढळ, कोणीकडे चाललांत ?

म्हातारा—वाड्याकडे चाललों जमादार साहेब !

भामट्या—ते कशाकरतां ? काय काम आहे ? कुणाची गांठ घ्यायची ? या पेटींत काय आहे ? तुम्ही राहता कुठे ? तुमचं नांव काय ? उमर किती ? धंदा कोणता ? सांगा पाहूं लौकर.

दिवट्या—आह्मीं गरीब लोक आहोंत जमादार साहेब.

भामट्या—गरीब ? तुह्मी मोठे लुच्चे आहांत. खरं सांगा ! लबाडी कराल तर खबरदार ! व्यापारी लोक एवढे लबाड असतात, पण त्यांची सुद्धां लबाडी आह्मीं बाहेर काढतों.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दिवट्या—जमादार साहेब, आमची लबाडी काय ती आधीं आमच्या पदरांत घाला, नि मग तरी बोला.

म्हातारा—आपण जमादार आहांत काय?

भामट्या—आहें कीं नाहीं तो तुम्हांला दिसत नाहीं का? हें चालणं नाहीं का पहात? हा आमचा झोक नाहीं का त्यांच्या सारखा? तुम्हाला मी कुठे, कशाकरितां चाललांत म्हणून विचारतों, तेव्हां तुम्हांला मी जमादार आहें असं नाहीं का वाटत? पण हें खूप लक्षांत ठेवा कीं मी जमादारच आहें. तुमचं काम लौकर होऊं देणं, किंवा लांबणीवर टाकणं हें आमच्या स्वाधीन आहे समजलांत. सांगा पाहूं तुमचं काय काम आहे तें?

म्हातारा—खुद्द महाराजांजवळ आमचं काम आहे.

भामट्या—तुमचा वकील कुठे आहे?

म्हातारा—आपण काय म्हणतां तें मला समजत नाहीं.

दिवट्या—अहो बाबा, दरबारांत नजराण्याला हे वकील म्हणत असतील वकील. त्यांना म्हणावं आमच्या परसांत एकसुद्धां वकिलाचं झाड नाहीं.

म्हातारा—छेः त्यांतलं आमच्या जवळ कांहीं नाहीं जमादार साहेब!

भामट्या—अरेरे किती भोळे लोक हे! आम्हीं यांच्या सारखे नाहीं म्हणून बरं. नाहीं तर आम्हांला एखाद्या लुच्चा भामट्यानं असंच फशिवलं असतं! असो उगीच यांना त्रास देण्यांत कांहीं अर्थ नाहीं. (उघड) त्या पेटींत आणि या पिशवींत काय आहे बोला लवकर.

म्हातारा—या पेटीची आणि पिशवीची हकीगत

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

महाराजांशिवाय कोणालाही सांगायची नाहीं. महाराजांची जर भेट होईल तर त्यांना सांगेन.

भामट्या—ह्मातारेबुवा, तुह्मीं उगीच तंगड्या तोडीत आलांत. अहो, महाराज वाड्यांत नाहींत! त्यांचं डोकं आज अगदीं संतापून गेलं आहे ह्मणून ते तारवांत बसून गेले आहेत; कारण तुह्माला कळलं असेल कदाचित्!

ह्मातारा—हो कळलं आहे. राजपुत्राचं ह्मणे एका गवळ्याच्या पोरीवर प्रेम जडलं होतं आणि तिच्याशीं तो लग्न लावणार होता!

भामट्या—जर तो गवळी अजून पकडला गेला नसेल, किंवा त्याला आपला जीव हवा असेल तर त्यानं अतां इथून पोबारा करावा. आणि जर कां सांपडला तर त्याचीं पुरीं शंभर वर्षं भरलींच ह्मणून समजा! असा त्याला मारमारून त्याच्या पाठीचीं चामडीं लोळवितील कीं त्याला जन्माचीं याद राहील! काय म्हणता ?

दिवट्या—काय म्हणतां ?

भामट्या—आजर्यंत कुणाचा झाला नाहीं असा त्याचा छळ करतील! नुसता त्याचाच नाहीं तर त्याचे भाऊबंद, सोयरेधायरे जे कोणी असतील त्यांचा सुद्धां! त्या सर्वांना सुळावर चढवितील! आतां इतक्या लोकांचे प्राण घेणं चांगलं नाहीं, पण ते घेतलेच पाहिजेत; कारण गवळी असून राजाचा व्याही व्हावयाला पाहातो म्हणजे काय? त्याला दगडानं ठेंचतील—जगांत प्राण घेण्याचे म्हणून जितके कडक प्रकार आहेत तितके ज-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

री काढले तरी ते त्याच्या अपराधाच्या मानानं फारच थोडे होतील.

दिवट्या——बरं काय हो जमादार साहेब, त्या म्हाताऱ्याला एखादा मुलगा असल्याबद्दल तुम्हाला माहीत आहेका—आणि असला तर त्याचं हो काय करतील ?

भामट्या——हो त्याला मुलगा आहे. त्यानं तर आतां बऱ्या गोष्टीनं पळून जावं; नाहीं तर त्याच्या अंगावर विंचू सोडतील, तापलेल्या तेलाच्या कढईंत उभा करतील; भिंतींत चिणतील, चुन्याच्या भट्टींत जाळतील, लाह्यांसारखा भाजून काढतील. आणि हें सगळं एकदम करतील. तुम्हीं भले मनुष्य दिसतां म्हणून म्हणतों कीं, महाराजांकडे तुमचं काय काम आहे तें मला सांगा आणि माझी मेहनत जाणाल तर मी त्यांची भेट करवीन. इतक्याउपर तुमचं नशीब.

दिवट्या——बाबा, यांचं दरबारांत बरंच वजन आहेसं दिसतं, तेव्हां यांची मूठ दाबा कीं झालंच काम. हें पहा बाबा, हे अधीकारी लोक जरी मोठे उन्मत्त असतात तरी पैसा यांच्या नजरेला पडला कीं लागलींच नरम येतात, म्हणून म्हणतो सोडा लवकर थैली नाहीं तर बघा भिंतींत चिणतील, दगडानं ठेंचतील किहो !

म्हातारा——हें घ्या जमादार साहेब, आमचं काम करण्याबद्दल आगाऊ बक्षीस. काम झाल्यावर आणखी देईन तोंपर्यंत पाहिजे तर याला ओलीस ठेऊन घ्या.

भामट्या——काम झाल्यावर मग द्याल ? बरं द्या तर काय देता तें. (दिवट्याला) काय रे या कामांत तुझाही कांहीं संबंध आहे वाटतं ?

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दिवट्या—थोडासा आहे खरा पण मला नाहींना भिंतींत चिणणार ?

भामट्या—तुला नाहीं पण त्या गवळ्याच्या मुलाला मात्र चिणलंच पाहिजे.

दिवट्या—बरं हें पहा जमादार साहेब, आमचं एवढं काम करून द्या ह्मणजे मग बाबांनीं जितकं दिलं तितकं आणखी मी देईन. मी कांहीं पळून जात नाहीं. पाहिजे असेल तर इथेच राहातों मग तर झालं कीं नाहीं?

भामट्या—तूं नाहीं पळून जाणार माझी खात्री आहे. बरं तुम्ही पुढं व्हा असे समुद्रकिनाऱ्यानं आणि धरा उजव्या बाजूचा रस्ता. मीही तुमच्या पाठोपाठ येतोंच. (दोघे जातात.) आम्हीं पुष्कळ प्रामाणिकपणानं वागायला पाहतों पण आमचं दैव कुठें आम्हाला तसं वागूं देतं ? आम्हीं निजलों असलों तरी तें आमचं भक्ष्य अचूक आमच्या घशांत आणून सोडतं. आतां काय आमचा दोन्हीकडून लाट आहे. एकीकडून तर झालाच; आतां छोट्या महाराजांकडून दुसरा लाट मारायचा. या दोघां भेकडांना हळूच त्यांच्या पुढं नेऊन उभं करूं या. आपल्याला काय थोडासा लुच्चेपणा पदरांत बांधून घ्यावा लागेल त्याची कोणा लेकाला इथ लाज आहे ? पण यांना त्यांनीं जर सोडून दिलं तर मात्र यांत (पिशवी दाखवून) भर पडल्यावांचून राहणार नाहीं. [जातो]

[अंक चवथा समाप्त.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अंक पांचवा.

प्रवेश १ ला.

स्थल—[राजवाडा—चित्रपाल, भालचंद्र, वसंत, सारजा, परिवार.]

भालचंद्र—महाराज, आतां दुःख पुरे करावं. पहा—

पद—(अभिषेकचि)

द्वादश वर्षें सतत मुनिपरी शोकतपातें आचरिलें ॥ न जळे ऐशा उग्र तपानें पातक भूवरि नच असलें ॥ अनुतापानें नृपतिश्रेष्ठा सर्वहि अपुलें अघ सरलें ॥ ह्मणुनि आवरा शोका विसरा सर्वहि मागें जें घडलें ॥ १ ॥

चित्रपाल—तुम्हीं सांगतां तें सर्व खरं आहे. पण—

पद—(गेला कीं मम प्राण.)

मुर्ति वसे ती हृन्मंदिरीं या तोंवरि विसर तिचा ॥ पडेल कैसा सांगा तैसा त्या गतगोष्टींचा ॥ मधु भाषण तें निर्मळ मनही विनय तसा सतिचा ॥ किती ह्मणुनी मी आठवूं गुणगण त्या मद्दयितेचा ॥ १ ॥

सारासार विचार न करितां केवळ कल्पनांवर भरंवसा ठेवल्यामुळं अनर्थ होऊन काय माझी स्थिती झाली—

पद—(बहु नीप तरु फुलुनि)

गेलि त्यजुनियां ती सुमति युवति राज्ञि सुगुणि ॥ प्रियतमा मला । प्रिय तनय तसा जयसेनहि सोडुनियां गेला ॥ सोडियलें कांतारीं कोमलाभकाला ॥ यापरि मी अंतरलों सर्वही सुखाला ॥ वरचेवर कृति माझी टोंचि मन्मनाला ॥ ती को-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ठुनि कशी । येईल मग । शांति मदात्म्याला ॥६॥

सारजा—खरं खरं म्हणतां महाराज, अशी माउली नाहीं बरं दृष्टीस पडायची ! सर्व सद्गुण एके ठिकाणीं सांपडणं कठीण! अनेक सद्गुणी स्त्रियांच्या आंगचा एकेक उत्तम गुण घेऊन जरी एखादी स्त्री निर्माण झाली, तरी देखील तिच्यानं राणीसाहेबांची बरोबरीं करवणार नाहीं.

चित्रपाल—खरं म्हणतां सारजाबाई, अशी बायको नाहींच मिळायची. मी तिच्या मरणाला कारण झालों—हो झालो खरा, पण तसं बोलून तुम्हीं माझ्या काळजाला घरं पाडूं नका.

वसंत—सारजाबाई, या गोष्टी मुळींच काढल्या नाहींत तर नाहीं का चालणार ? तुम्हीं महाराजांना दुःखाचं विस्मरण पाडायचं—त्या तुम्हीं होऊन उलट त्याची आठवण करून देतां हें काय ! दुसऱ्या कांहीं समाधानाच्या गोष्टी बोलाना !

सारजा—तर मग काय, तुम्हांला राणीसाहेब हव्या आहेत, असंच कीं नाहीं तुमच्या मनांत ?

वसंत—आणि तुमच्या मनांत तसं कां नसावं ? राणीसाहेब नसल्या तर पुढं गादीची काय वाट ? आमच्या मातोश्री राणीसाहेब चांगल्या होत्या खऱ्या, पण आतां त्यांचे गुण आठवून किंवा शोक करून त्या परत येणार आहेत कां ? आतां कांहीं तरी पुढचा मार्ग पाहिला पाहिजे. त्यापासून देशाचं कल्याण होईल; आणि महाराजांच्या जिवाला सुख लागेल.

सारजा—मी म्हणतें मग गुरुमहाराजांच्याच वचनावर कां नाहीं विश्वास ठेवला ? त्यांनीं नाहीं का सां-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गितलं कीं, हरवलेलं मूल जर सांपडणार नाहीं, तर राज्याला वारस राहाणार नाहीं म्हणून ! हाय रे दैवा ! तें आतां कसचं सापडतं. सुबुद्धीबरोबरच त्याचा अंत झाला असेल. तसं नसतं तर तो परत आला नसता का ? पण देवाची करणी, आम्हां माणसांना काय कळणार बाई ? अजूनही तें मूल सांपडणार नाहीं कशावरून बाई !

चित्रपाल—सारजाबाई, त्या वेळीं जर मी तुमचं ऐकलं असतं तर हा प्रसंग कशाला येतां ? तीही जिवंत असती, मुलंही जिवंत असतीं, आणि मी सुखांत असतों, पण आतां काय; मी जरी दुसरी बायको केली आणि तिला मोठ्या प्रेमानं वागविलं, तरी माझं मन मला खायला कमी करील का !

सारजा—त्यांचे गुण किती किती म्हणून सांगूं ?

चित्रपाल—होय; तिच्या अंगीं तसेच अप्रतिम गुण होते खरे. नाहीं, नाहीं–आतां मी दुसरं लग्न करणार नाहीं.

सारजा—पण मी ह्मणतें महाराज, जर लग्न करायचं झालं तर मला विचारल्याशिवाय करूं नका !

चित्रपाल—नाहीं, नाहीं. आतां लग्नाची गोष्टच बोलूं नका.

सारजा—(भालचंद्र वसंत यांस.) ऐकलंतना तुह्मीं हें ? महाराजांनीं लग्न करायचं नाहीं म्हणून सांगितलं आहे.

भालचंद्र—काय ह्मणावं सारजाबाई तुह्माला ?

सारजा—ह्मणतां काय, राणीसाहेबांसारखी बायको मिळाल्याखेरीज लग्न करायचं नाहीं; नि इतक्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

उपर जर तुह्मीं त्यांना लग्न करायला लावलंच, तर बायको बघण्याचं काम माझ्याकडे सोंपवा. ह्मणजे मी अशी बायको बघेन कीं, ती तुह्मांला राणीसाहेबांचा विसरच पाडील.

चित्रपाल—नाहीं, सारजाबाई, मी तुमच्या विचाराशिवाय लग्न करणार नाहीं.

सारजा—ह्मणजे, राणीसाहेबांसारखी बायको मिळाली तरच लग्न करायचं. सारखी ह्मणजे सारखी, अगदीं हुबेहुब. (प्रतिहारी येते.)

प्रतिहारी—सरकार, शूरसेन महाराजांचे पुत्र पुष्पशील महाराज हे पत्नीसहवर्तमान आपल्याला भेटायला आले आहेत.

चित्रपाल—असं एकाएकींच येण्याचं काय बरं कारण? शूरसेन येत तेव्हां अगोदर निरोप पाठवीत असत. तेव्हां मला वाटतं तसंच कांहीं जरूरीचं काम असेल. किंवा त्यांच्यावर एखादा प्रसंग आला असेल म्हणून आले असतील. बरं, बरोबर लवाजमा किती आहे?

प्रतिहारी—आहे बेताबाताचाच.

चित्रपाल—त्यांची पत्नीही बरोबर आली आहे म्हणून म्हणालास नव्हे का?

प्रतिहारी—होय महाराज, आणि ती फार सुंदर आहे.

सारजा—आमच्या चंपावती बाईसाहेबांपेक्षां सुद्धां?

प्रतिहारी—तें मी काय सांगूं?

चित्रपाल—भालचंद्र, तुह्मीं आपल्या सरदार मं-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

डळीसह जाऊन त्यांना सन्मानपूर्वक इथं घेऊन या.

(भालचंद्र जातो.)

सारजा—आज आमचे धाकटे महाराज असते, तर यांच्या एवढेच असते.

चित्रपाल—सारजाबाई, नका आतां त्या गोष्टीचं स्मरण करूं. हे पहा आलेच. (भालचंद्र, पुष्पशील, वनमाला वगैरे येतात.) ये बाळा, मला प्रेमानं आलिंगन दे पाहूं. (पाहून) अगदीं हुबेहुब शूरसेनाचीच प्रतिमा, मी जर आज वीस बावीस वर्षांचा असतों, तर माझे मित्रच आले आहेत असं मी ह्मटलं असतं इतकं पितापुत्रांत साहश्य आहे. ये मुली, जोडा अगदीं नामी दिसतो अं ! आणि माझीं दोन्हीं मुलं एवढींच असतीं. तुह्मांला पाहून जसा आनंद होतो, तसा त्यांनाही पाहून झाला असता ! पण माझ्या मूर्खपणामुळें मी तुझ्या पित्याच्या मैत्रीला, आणि त्याबरोबर त्यांनाही अंतरलों. असो, आतां पुनः त्याला केव्हां- पाहीन असं मला झालं आहे.

पुष्पशील—त्यांच्याच आज्ञेवरून मी आपल्या भेटीला आलों आहें, त्यांच्याच मनांतून यायचं होतं, पण आतां वृद्धपणामुळें प्रकृति थोडी क्षीण झाली आहे. म्हणून त्यांनीं मलाच पाठविलं. बंधुप्रेमानं त्यांनीं आपल्याला फार फार विचारलं आहे; आणि सांगितलं आहे कीं, माझं येणं झालं नाहीं म्हणून आपण वाईट वाटून घेऊं नये व जरी आपण दूर असलों तरी प्रेमांत कधीं अंतर पडूं नये.

चित्रपाल—हाय, हाय, माझ्या मित्राचं माझ्यावर

Jangamwadi Math VARANASI LIBRARY JNANA SIMHASAN JNANAMANDIR

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अत्यंत प्रेम असून, मी त्याच्याशीं असा कृतघ्न झालों! बाळा, तुला पाहतांच माझ्या पूर्व कृति डोळ्यांसमोर उभ्या राहून माझ्या अंतःकरणांत कालवाकालव करून सोडताहेत. किती त्याचं माझ्यावर प्रेम, माझं समाधान करण्याकरितां त्यानं आपल्या मुलाला आणि सुनेला एवढा लांबचा प्रवास करायला लावलं. बाळांनो, तुह्मांला पाहून मला फार आनंद झाला. पण या सुकुमार मुलीला एवढ्या लांबच्या प्रवासाचे श्रम कशाला दिले?

पुष्पशील—काका, सुवर्णपुरीं मी श्वशुरगृहीं गेलों होतों, तेव्हां तिकडून परस्पर हिला इकडे घेऊन आलों.

चित्रपाल—हं, एकूण ही वीरकांताची मुलगी तर.

पुष्पशील—होय, त्यांचाच निरोप घेऊन तातांच्या आज्ञेवरून आपल्या भेटीला आलों. इकडे येण्यापूर्वींच मी आपल्या बरोबरच्या लोकांपैकीं कांहीं निवडक मंडळी बरोबर ठेवून घेऊन बाकीच्यांना आह्मीं सुखरूप इथं येऊन पोंहचलों हें तातांना कळविण्याकरितां विलासपुरास पाठवून दिलं.

चित्रपाल—असो, तुह्मीं आलांत बरं झालं. (जासूद प्रवेश करितो.)

जासूद—सरकार, शूरसेन महाराजांनीं मला आपणाला असं कळवायला सांगितलं आहे कीं, मी आपल्या भेटीला आलों आहें. माझा मुलगा पुष्पशील आपली योग्यता विसरून मला न कळवितां एका गवळ्याच्या पोरीसह आपल्याकडे पळून आला आहे; तर त्याला धरून ठेवावं.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चित्रपाल--कुठं आहेत शूरसेन ?

जासूद--आपल्या शहरांत आले आहेत. आतांच मी त्यांच्याकडून आलों. आणखीं सांगितलं तर महाराजांना आश्चर्य वाटेल; शूरसेन महाराज आपल्या पुत्राला धरण्याकरितां स्वतःच इकडे येत असतां वाटेंत त्यांना त्या मुलीचा बाप आणि भाऊ भेटले; ते सुद्धां राजपुत्राबरोबरच आले असावेत असं वाटतं.

पुष्पशील—एकूण विश्वासरावानं विश्वासघात केला अं? हा वेळपर्यंत त्याला खरोखरच मी प्रामाणिक समजत होतों.

जासूद—ते सुद्धां महाराजांबरोबर इथं आले आहेत.

चित्रपाल—कोण ? विश्वासराव !

जासूद—होय महाराज, आतांच ते मला त्यांच्याशीं बोलतांना भेटले. ते त्यांना कांहीं विचारीत होते, आणि तो म्हातारा आणि त्याचा मुलगा हे दोघे त्यांच्या पायांवर लोळण घेत होते, शपथा वहात होते, आणि शूरसेन महाराज ते लक्षपूर्वक ऐकत होते. आणि त्यांना खरं न सांगाल तर सुळावर देऊं, तोफेच्या तोंडीं देऊं अशी धमकी देत होते.

वनमाला— पद.

प्रभो असा मम जनकाचा। त्यजुनी दया कां छल करिसी। अन्याय काय तव घडला॥ तरि हातुनि त्याच्या कथि मजसी॥ किंवा. हतभागिनि ही अबला॥ कारण झाली तद्विपदेला॥ लावावा कां दोष प्रभूला॥ पडतें ना जरि या नादाला॥ येता कां तरि प्रसंग असला॥ सर्वहि

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चूक असे माझी ॥ मजसाठीं तात बंधुची ॥ हो-
तसे कुदशा ही कैसी ॥ १ ॥

चित्रपाल—काय हो, तुमचं लग्न झालं आहे का ?

पुष्पशील—नाहीं. होईल तेव्हां खरं !

चित्रपाल—ही राजकन्या तरी खरी आहे ?

पुष्पशील—माझ्याशीं हिचं लग्न होऊन ही राज-वधू झाल्यावर मग हिला राजकन्या ह्मणायला कोणती हरकत आहे ?

चित्रपाल—पण एकदांचं लग्न होतं आहे कीं नाहीं कुणाला ठाऊक. हें पहा, पित्याची आज्ञा उल्लंघन करूं नये, हा पुत्राचा धर्म असून, तूं त्याविरुद्ध आचरण केलंस, आणि शिवाय तूं जी बायको केलीस ती स्वरूपानं जशी देखणी आहे, तशी ती चांगल्या कुळांतली पाहि-जे होती, पण ह्या दोन्ही गोष्टी तूं बरोबर केल्या नाहींस.

पुष्पशील—[वनमालेला वाईट वाटलेंसें पाहून) प्रिये तूं भिऊं नकोस—

पद—(काय न जन जाणती.)

चित्र गतिक दैव मदिय जनक त्यापरी ॥ हो-
तिल प्रतिकूल मला दोन्हिही जरी ॥ प्रेम आणि
वचन यांत तरिहि तिळभरीं ॥ अंतर नच्च कधि
पडेल जाण अंतरीं ॥ १ ॥

काका, मी आपल्याला असं विचारतों कीं, आपण तारुण्यांत असतां प्रेमपाशानं बद्ध झाल्यावर असाच उ-पदेश आपल्याला कुणी केला असतां तर आपण काय बरं उत्तर देतां ? प्रेमाच्या वेदना किती दुःसह असतात याचा अनुभव आपल्याला असेल तर आपण ज्ञात्रांना

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आमच्याविषयीं चार गोष्टी सांगून पहा; आपलं सांगणं ते ऐकणार नाहींत असं मला वाटत नाहीं.

चित्रपाल—मी सांगून पाहीन. (मुलीकडे पाहात बसतो.)

सारजा—महाराज, आपण या कन्येकडेस अगदीं टक लाऊनसे पहात आहांत ?

चित्रपाल—या मुलीला पाहून मला तिची आठवण होते; हिचा चेहरा अगदीं हुबेहूब तिच्या चेहऱ्याशीं मिळतो. (पुष्पशीलास) मी तुझ्या वतीनं तुझ्या पित्याला चार गोष्टी सांगेन. तुम्हीं उभयतांनीं सुखांत असावं अशी माझीही फार इच्छा आहे. मी त्याच्या कडेस चाललों आहें. तुम्हींही माझ्या बरोबर चला. मग जसा प्रसंग येईल तसें करूं. (जातात.)

प्रवेश २ रा.

स्थळः—(राजवाड्यासमोरील रस्ता.)

(**पात्रें**—भामट्या व एक गृहस्थ येतात.)

भामट्या—हें त्यानं सांगितलं त्या वेळीं तुम्हीं तिथं होतां काय ?

गृहस्थ—होय, पेटी उघडली तेव्हां देखील मी जवळ होतों. ती कुठं कशीं सांपडलीं वगैरे सर्व हकीकत त्या म्हाताऱ्या गवळ्यानं सांगितली. नंतर आह्मांला बाहेर जायला सांगितलं. पण जातां जातां त्या गवळ्याचे मला एवढे शब्द ऐकल्यासारखे वाटतात कीं, हें मूल मला सांपडलं ?

भामट्या—सर्व हकीकत सांगाल तर बरं होईल बुवा.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गृहस्थ—मला जेवढी माहिती होती तेवढी सांगितली, पण ही हकीकत ऐकत असतां महाराजांच्या आणि विश्वासरावांच्या मुद्रेंत वरचेवर बदल होत होता; त्यावरून कांहीं तरी तसाच विलक्षण प्रकार असावा असं वाटतं. ते दोघेही एकमेकांकडे तटस्थ पहात उभे राहिले होते. ते जरी बोलत नव्हते, तरी त्यांच्या मुद्रा, कृती, चेष्टा, यावरून असं वाटत होतं कीं, आज यांना एखादा सुखाचा ठेवा सांपडला, कीं गमावला, कोण जाणें. ते अगदीं आश्चर्यचकित होऊन गेले होते; तें आश्चर्य कशाचं, हें मला किंवा सर्व हकीकत कळल्याशिवाय नुसतं पाहून कोणालाही सांगतां आलं नसतं. आतां एवढं खरं कीं, एक अतिशय दुःखाचं तरी असेल, किंवा अतिशय सुखाचं तरी असेल. (चंदुलाल येतो त्याला पाहून) हे पहा आमचे चंदुलाल आले. त्यांना सर्व हकीकत माहित असेल. कसं काय चंदुलाल, कांहीं नवल विशेष ?

चंदुलाल—कांहीं विचारूं नका बुवा. आज तर अगदीं आनंदी आनंद होऊन गेला आहे. गुरुमहाराजांचं वचन खरं झालं. महाराजांची मुलगी सांपडली. सर्व लोक आश्चर्यसागरांत अगदीं बुडून गेले आहेत. हें पहा तुम्हीं जर त्या मुलीला पहाल तर ती अगदीं राणीसाहेबांचीच प्रतिमा आहे असं तुह्मांला वाटेल. चंपावती बाईसाहेबांच्या हातची रत्नमाला, सुबुद्धीच्या हातचा लेख, राजकुलाला शोभणारं त्या मुलीचं शहाणपण, आणि राणीसाहेबांसारखाच तिचा तोंडवळा, वगैरे गोष्टी प्रत्यंतरास आल्यामुळं आतां संशय घेण्याला जागाच रा-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हिली नाहीं. उभयतां राजांच्या भेटी झाल्या त्या तुम्हीं पाहिल्यात का ?

गृहस्थ—नाहीं.

चंदुलाल--तर मग तुम्हीं संधी घालविलीत राव. अहाहा ! असा तो देखावा पुन्हां नजरेस पडायचा नाहीं. एका मागून एक असे आनंदाचे उमाळे येत होते कीं, ते पोटांत न मावल्यामुळें शेवटीं ते नेत्रद्वारें वाहूं लागले. उभयतां राजे सद्गदीत होऊन एकमेकांकडे तटस्थ पहात राहिले. त्या मुलीला पाहतांच राणीसाहेबांची आठवण होऊन महाराजांचा कंठ वरचेवर दाटून येई. ते शूरसेन महाराजांच्या जवळ जात, त्यांची क्षमा मागत, आपल्या जांवयाला प्रेमानं आलिंगन देत. पुन्हां आपल्या मुलीला पोटाशीं धरीत. त्या वृद्ध गवळ्यानं तिचं पालन केलं म्हणून वारंवार त्याचे आभार मानीत. तो म्हातारा हा सर्व प्रकार पाहून, आनंदभरांत तटस्थ उभा राहिला होता. खरोखर तो प्रसंग ज्यांनीं पाहिला त्यांना सुद्धां त्याचं वर्णन करतां येणार नाहीं. आणखी पहा, गुरुमहाराजांचं वचन खरं झालं, म्हणून सारजाबाईला जो कांहीं आनंद झाला म्हणता ! त्यांनीं त्या मुलीला उचलून कडेवर घ्यावं, तिचं तोंड कुरवाळावं, तिला घट्ट पोटाशीं धरावं, मुके घ्यावे, अशा ज्या कांहीं त्यांनीं त्या आनंदाच्या भरांत नाना तऱ्हा केल्या त्या सांगतां येत नाहींत.

गृहस्थ—तर मग हा देखावा पहायला राजे लोकच पाहिजे होते. कारण राजांनींच तो करून दाखविला.

चंदुलाल—पण यांपेक्षांही चमत्कारिक आणि म-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नोवेधक असा एक देखावा आमच्या दृष्टीस पडला. तो पाहून तर आह्मांला गहिंवर येऊन आमच्या नेत्रांवाटे अश्रुधारा वाहूं लागल्या. ज्या वेळीं महाराज राणी साहेबांच्या अंताला आपण कसे कारण झालों तो प्रकार सांगून फार शोक करूं लागले, त्या वेळीं त्या मुलीची जी अवस्था झाली, आणि तो वृत्तांत सांगत असतां वरचेवर तिच्या वृत्तींत जो बदल होत होता, तो तर तिच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. आणि शेवटचे ते महाराजांच्या तोंडचे शब्द ऐकल्यावर तर तिनें हाय रे दैवा, असं म्हणून धरणीवर आंग टाकलं त्या बरोबर सर्व लोकांच्या नेत्रांतून टपाटप अश्रु गळूं लागले. अगदीं पाषाणहृदयी जे असतील त्यांना सुद्धां क्षणभर गहिंवर आल्यावांचून राहिला नसता. त्या वेळीं आमची जी कांहीं स्थिति झाली ती पुसूं नका.

गृहस्थ—बरं, मग महाराज परत वाड्यांत आले का?

चंदुलाल—आमच्या महाराजांची मुलगी सांपडली. गुरूंच्या वचनापैकीं एक भाग तर अनुभवाला आला. सारजाबाईंनीं एक राणीसाहेबांची पुतळी तयार करविली आहे असं त्या मुलीला समजलं म्हणून ती पाहण्याकरतां सर्व मंडळी तिकडे गेली आहे. ती पुतळी आज पुष्कळ वर्षें किसनजी या नांवाचा एक कारागीर घडवीत होता. तिचं सगळं काम पुरं होऊन आतां ती तयार झाली आहे असें म्हणतात. त्या कारागिरानं राणीसाहेब आज भित्तीला असत्या तर कशा दिसल्या असत्या हें एक प्राणाखेरीज हुबेहुब दाखविलं आहे. प्राण घालण्याचं कसब जर त्याला साधलं अ-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सतं तर तो प्रतिब्रह्मदेवच बनला असता. फार काय, पण त्या पुतळीच्या तोंडाकडे नजर ठेवून जर कोणी बोलूं लागला तर ती त्याला आतां प्रत्युत्तर देईल कीं काय असा प्रत्यक्ष भास होतो.

गृहस्थ---सारजाबाईचं यांत कांहीं तरी गूढ कारस्थान असावं. चलता का, आपण तिथं जाऊन काय गम्मत आहे ती पाहूं ?

चंदुलाल---तिथं जायला परवानगी मिळाल्यावर कोण जाणार नाहीं ? प्रत्येक निमिषांत तिथं नवे नवे चमत्कारिक प्रकार पाहयला मिळतील. अशी संधी दवडील तो हतभागी समजायचा. चला तर मग आपण तिकडेच जाऊं. (जातात.)

भामट्या---(प्रवेश करून) आमचं पूर्वींचं वर्तन जर धड असतं तर आज आमच्या भाग्याला पारावार नव्हता. त्या ह्यातान्याला आणि त्याच्या मुलाला मी राजपुत्राजवळ तारवांत नेऊन त्याला त्यांचं सर्व बोलणं सांगून त्यांच्या जवळ ही कसलीशी पेटी आहे, हींत काय आहे तें पहा म्हणून सांगितलं. पण तो काय त्या वेळीं आपल्या प्रियेच्या नादांत गर्क ! पुढं समुद्राच्या हवेनं त्या दोघांची प्रकृति बिघडल्यामुळें त्या पेटीतलं गूढ तसंच कळल्यावांचून राहिलं. पण कळून तरी आह्मांला त्याचा काय उपयोग होता ? कारण, एखादं आह्मीं जरी चांगलं कृत्य केलं, तरी आमचं एकदां जें कानफाटे नांव पडलं तें पडलं. (पाहून) हें पहा, सहजगत्या माझ्या हातून ज्यांचं कल्याण झालं,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ते हे बापलेंक गवळी मोठ्या थाटानं इकडे येताहेत.
(म्हातारा व दिवट्या प्रवेश करतात.)

म्हातारा—अरे, मी जरी गरीब स्थितींत दिवस काढले तरी तुझीं मुलंबाळं आतां चांगली श्रीमंती भोगतील.

दिवट्या—(भामट्याकडे पाहून) बरा भेटलास, काय रे, तूंच ना तो. त्या दिवशीं आमच्या गांवीं मला हलक्या कुळांतला म्हणून म्हणत होतास ? आज कसं ? हा बघितलास का आमचा थाट ! आतां झालों कीं नाहीं मोठ्या कुळांतला ! आतां म्हणशील कां हलक्या कुळांतला म्हणून ! म्हण पाहूं—नाहीं पण म्हण पाहूं.

भामट्या—छे, छे, आतां तुम्हांला कोण म्हणेल तसं ? आतां आपण रावसाहेब झालांत.

दिवट्या—हं, कसा पण एका घटकेंत झालों.

म्हातारा—हो हो खरंच झालों.

दिवट्या—पण बाबांच्या अगोदर मी झालों. कोंरण, पहिल्यानं राजपुत्रानं मला भाऊ म्हणून आलिंगन दिलं. आणि माझ्या मागून बाबांना दोन्हीं महाराजांनीं भाऊ म्हटलं आणि मग माझा मेव्हणा राजपुत्र, आणि बहीण राजकन्या, या दोघांनीं बाबांना बाबा म्हटलं. आणि जे मग आम्हांला आनंदाच भरतं आलं त्या सरसं आमच्या डोळ्यांतून पाणी यायला लागलं. मोठेपणांत हें आम्हांला पहिल्यानंच आनंदाचं भरतं आलं.

म्हातारा—अरे एवढ्यानंच काय झालं ! अझूनही अशीं पुष्कळ येतील.

दिवट्या—आणि यायलाच हवींत, तरच आम्हीं भाग्यवान्.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भामट्या—अहो महाराज, मी तुमचे पूर्वी जे कांहीं अपराध केले त्याची मला क्षमा करून माझे जुने धनी साहेब—तुमचे जांवई राजपुत्र यांच्याजवळ माझ्या बऱ्याविषयीं चार शब्द बोलाल तर माझ्यावर तुमचे मोठे उपकार होतील.

म्हातारा—होय, त्याच्या म्हणण्याप्रमाणं कर तूं. कारण, आतां आपण मोठे झालों. तेव्हां मनही मोठंच ठेवलं पाहिजे.

दिवट्या—तूं म्हणतोस तसं करीन, पण तूं नीट वागशील तर ?

भामट्या—वागेन महाराज.

दिवट्या—बरं तर आजपासून तूं माझा मित्र झालास. मी राजपुत्राला शपथ वाहून सांगेन कीं हा मोठा प्रामाणिक आहे म्हणून.

म्हातारा—प्रामाणिक आहे एवढंच सांग. शपथ वाहून कशाला ?

दिवट्या—कां बरं ? आतां आम्हीं मोठे नाहीं का झालों ! आतां आम्हीं लागतील तशा खोट्या शपथा घेतल्या तरी आम्हाला कोण काय म्हणणार ?

म्हातारा—काय रे, खोटी गोष्ट असली तरी शपथ घ्यायची ?

दिवट्या—असं नव्हे बाबा, आपल्या मित्राकरितां घटकाभर खोट्या शपथा घेतल्या तरी मोठ्या लोकांना चालतात. मी राजपुत्राला सांगेन कीं, तूं आपल्या कामांत मोठा दक्ष आणि प्रामाणिक आहेस म्हणून.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बाकी तूं दक्षही नाहींस आणि प्रामाणिक मुळींच नाहींस. बाकी तूं मोठा लुच्चा आहेस.

भामटचा--आतां मी पण आपल्या कामांत दक्ष रहात जाईन.

दिवटचा—बरं तर, आमचे सोयरे राजे, राजपुत्र हे राणीची पुतळी पहाण्याकारतां जाणार आहेत, तर चला, आपणही त्यांच्या बरोबर तिकडे जाऊं. (जातात.)

प्रवेश ३ रा.

स्थल—सारजाबाईचें घर.

(चित्रपाल, शूरसेन, पुष्पशील, विश्वासराव, वनमाला, सारजा, सरदार, परिवार वगैरे.)

चित्रपाल---सारजाबाई, माझ्यावर तुमचे किती तरी उपकार आहेत हे !

सारजा—छे, छे महाराज, माझे कांहीं उपकार नाहींत. पण आपले सर्वांचे पाय आज माझ्या घराला लागले म्हणून मात्र मी आपणा सर्वांची आभारी आहें.

चित्रपाल--हं. सारजाबाई, आतां उशीर लावूं नका. पुतळी कुठं आहे ती दाखवा. आम्ही तुमचे घ-रांत चोंहोंकडे फिरून एकंदर चमत्कार पाहिले. पण आम्ही ज्याकरितां आलों, तें कांहीं आमच्या दृष्टीला पडलं नाहीं. ही पाहिलीत का वनमाला, पुतळी पाह-ण्याकरितां अगदीं उत्कंठित झाली आहे.

सारजा—महाराज, आमच्या राणीसाहेब जिवंत

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

होत्या, तेव्हां जशी त्यांची सर कोणाला येत नव्हती तशीच त्यांच्या पुतळीचीही सर दुसऱ्या पुतळ्यांना किंवा तसबीरींना येणार नाहीं. हें जाणून मीं ती एकीकडेस ठेविली आहे. या इकडे पहा! ह्मणजे आपल्याला वाटेल कीं, झोंपेंत असतां मनुष्य जसा मेल्यासारखा भासतो, तशी ही पुतळी निर्जीव असून सजीव आहे अशी भासते. (पडदा उघडतो, पुतळी दिसते.) पहा, आहेना हुबेहूब; आपण बोलत नाहीं, तेव्हां आपल्याला पसंत पडली खास. एकदां आपण चांगली आहे असं तोंडानं ह्मटलं ह्मणजे मला बरं वाटेल. राणीसाहेबांसारखी नाहीं बरं दिसत ही?

चित्रपाल—हो, अगदीं हुबेहूब तशीच दिसते आहे.

पद—(भैरवी.)

आहा सखीची प्रतिमा खरी ही ॥ भासे मला मूर्ति सजीव पाहीं ॥ आहे उभी कीं अचला तशीच ॥ निर्भर्त्सनाही करि माझि साच ॥चाल॥ किती रुचिर तरी दिसे मला ही ॥ निर्जिव परि मन मोही ॥धन्य कुशलता असे तयाची ॥ घडाकृति ज्यानें ही ॥ निर्जिव परि मन मोही ॥ १ ॥

ही पाषाणमूर्ति माझी निर्भत्सना करीत नाहीं ह्मणूनच ही मला माझ्या प्रियेसारखी वाटते. पण सारजाबाई, या पुतळीवर जशी जरेची छाया दाखविली आहे, तशी माझ्या प्रियेवर नव्हती!

शूरसेन—होय, नव्हती खरी.

सारजा—हीच तर महाराज त्या कारागिराची कुशलता, माईसाहेब निवर्तल्याला आज बारा तेरा वर्षं

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

झालीं, तेव्हां जर आज त्या जिवंत असत्या तर कशा दिसल्या असत्या, हें जाणून आपल्या किसन कारागिरानं ही पुतळी घडविली आहे.

चित्रपाल--हो तशीच घडली आहे, यांत संशय नाहीं. पण ती आज अशीच असती तर माझ्या जिवाला किती समाधान वाटलं असतं! या पुतळीला पाहून माझं हृदय दुभंग होत आहे. ही पाषाणमूर्ति, मी इच्या पेक्षांही पाषाणहृदयी झालों, म्हणून ही माझी निर्भत्सना करीत आहे कीं काय असं वाटतं.

वनमाला--आई ही हतभागिनी तुझी कन्या जन्मतांच तुझ्या अंताला कारण झाली! असो; ही जी तुझी पाषाणमूर्ति माझ्या डोळ्यांसमोर आहे, अशीच तूं होतीस असं मी समजेन.

(नमस्कार करायला जाते.)

सारजा---अग मुली जवळ जाऊं नको. पुतळी नुकतीच रंगवली आहे; अजून वाळली नाहीं; तिथूनच नमस्कार कर.

विश्वासराव--महाराज, राणीसाहेब निवर्तल्याला आज बारा तेरा वर्षं झालीं; तरी अजून आपला शोक कमी होत नाहीं याला काय म्हणावं ?

शूरसेन---दादा, आपल्या दुःखाला मी कारण आहें; तेव्हां मला त्यांतला थोडा वांटा द्या, आणि आपला शोक पुरे करा.

सारजा---महाराज, या पुतळीला पाहून आपल्याला इतकं दुःख होईल असं मला पूर्वीं कळलं असतं तर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मीं आपल्याला पुतळी मुळींच दाखविली नसती. (पडदा पाडायला जाते.)

चित्रपाल—थांबा सारजाबाई, इतक्यांतच नका हो पडदा ओढूं !

सारजा—नाहीं महाराज, आतां ओढतेंच. नाहीं तर कांहीं वेळानं ही पुतळी हंसतेच म्हणून म्हणाल.

चित्रपाल—थांबा हो सारजाबाई, हाय हाय, माझे प्राण निघून कां जात नाहींत ? थांबा भाऊ, ही पुतळी श्वास सोडते असं तुह्मांला नाहीं बरं दिसत ? तसंच रक्तवाहिन्यांत चलनवलन नाहीं भासत ?

शूरसेन—हो, असा भास होतो खरा. अगदीं आतां बोलतील कीं काय असं वाटतं; धन्य आहे कारागिराच्या कुशलतेची !

चित्रपाल—ती पहा डोळ्याची पापणी हालली, कुणाची बरं ही कुशलता ?

सारजा—आतां मी पडदा ओढतें महाराज, आपल्याला इतका मोह पडला आहे कीं, आतां ह्मणाल पुतळी जिवंत आहे म्हणून !

चित्रपाल—हें पहा सारजाबाई, या मोहांत इतकं कांहीं सुख आहे कीं, कांहीं विचारूं नका. म्हणून म्हणतों जरा थांबा हो.

सारजा—महाराज, आपल्याला मी इतकं उद्विग्न केलं म्हणून मला फार वाईट वाटतं; पण यापेक्षांही मला आपल्याला जास्त उद्विग्न करतां येईल !

चित्रपाल—कराच तर मग; कारण या उद्वेगांत

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ब्रह्मानंदाच्या पलीकडचा आनंद वसतो आहे. पण थांबा, इनं उच्छास टाकल्यासारखा वाटतो. अगदीं उत्तम कारागीर असला तरी त्याला मूर्तींत प्राण घालतां येईल काय ? तुम्हीं सर्व मला हसलांत तरी चालेल, पण मी चाललोंच तिला आलिंगन द्यायला !

सारजा—महाराज, एवढं मात्र करूं नका. पुतळी नुकतीच रंगविली आहे. तिचा रंग आपल्या अंगाला लागेल. आतां मला पडदा ओढूं द्या.

चित्रपाल—नका हो नका ! मी असाच तिला जन्मभर पहात राहीन.

वनमाला—मीही पण अशीच पहात राहीन.

सारजा—महाराज, आतां आपण इथून एक चला तरी, नाहीं तर याहूनही मी आणखी चमत्कार दाखवितें तो पहायला तरी तयार व्हा. आपली इच्छा असेल तर ही पुतळी चालूं लागेल असं मी करून दाखवितें. इतकंच नाहीं, तर ही आपल्या जवळ येऊन आपल्याला आलिंगन देईल असं करतें. मग आपण ही भूतचेष्टा आहे असं म्हणाल. पण वास्तविक तसं कांहीं नाहीं.

चित्रपाल—तुमच्या पुतळीला तुह्मीं ज्या ज्या कृति करायला लावाल, त्या त्या मी मोठ्या संतोषानं पाहीन.

सारजा—तर मग असाच आपला विश्वास कायम राहूं द्या. सर्व शांत असा. ज्यांना ही भूतचेष्टा वाटत असेल त्यांनीं खुशाल जावं.

चित्रपाल—हं, आतां उशीर लावूं नका, दाखवा चमत्कार, कुणीही बाहेर जात नाहीं.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सारजा—बाईसाहेब, ही वेळ आली आहे, आसनावरून खालीं उतरा, या पाषाणरूपी देहाचा त्याग करा; जवळ या, तुह्माला पाहून सर्वांना आश्चर्य वाटूं द्या; त्या पहा हालूं लागल्या. महाराज भिऊं नका. या राणीसाहेबच आहेत. ही भूतचेष्टा नव्हे. आतां त्यांची अवहेलना करूं नका! कारण, त्यापासून त्यांना फारच दुःख होईल. या पहा, आपल्याला आलिंगन द्यायलाच येत आहेत! (राणीचा हात राजाचे हातांत देते.)

चित्रपाल—(स्पर्श होतांच.) हा, हिचं आंग ऊन लागतं यावरून ही भूतचेष्टा नाहीं खास!

विश्वासराव—जिवंत आहेत तर त्यांना एकदां बोलूं द्या!

शूरसेन—जिवंत आहेत ह्मणावं तर इतके दिवस त्या होत्या कुठं? मरण पावल्या ह्मणावं, तर पुनः जिवंत कशा झाल्या?

सारजा—जर खरं सांगितलं तर आपल्याला चमत्कारिक वाटेल; पण त्या जिवंतच होत्या; त्या पहा, आतां बोलतील सुद्धां! मुली आपल्या आईला नमस्कार कर, आणि आशीर्वाद माग. बाईसाहेब, ही आपली वनांत सांडलेली मुलगी सांपडली बरं! (वनमाला नमस्कार करतें.)

चंपावती—हे जलस्थलकाष्ठपाषाण देवतांनो, हें दश दिशांनो, या माझ्या लाडक्या मुलीला तुम्हीं आशीर्वाद द्या. बाळे—

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पद—(जय रघुवर प्रियकर.)

मत्प्रियकर सुखकर नयन हृदयहर सुगुणि सुदति तनये ॥ सुगिरे । विमले । सुमुखे । आलिस कुठुन । इतुके दिन तूं । होतिस कवण । स्थलिं कथीं ॥ धृ० ॥ जन्मतांच जाहलीस दूर जननिपासुनी ॥ वनांतुनि । घेऊन । जाऊन । लालनपालन कोणिं केलें तूझें ॥ थोर दैव माझें ॥ मुख आजि तुझें देखियलें ॥ १ ॥

बाळे, तूं सांपडशील असं गुरुमहाराजांचं वचन होतं असं सारजाबाईनीं सांगितल्यावरून मी हा प्राण धरून राहिलें बरं !

सारजा—आतांच सारी हकीकत कांहीं सांगायला नको. मग सावकाशपणीं सांगतां येईल. चला आतां सर्वांना आनंदानं भेटा बरं; झालं बाई, आज देवानं सुदीन दाखविला म्हणायचा, तुह्मी सर्व सुखांत असलांत म्हणजे झालं. माझं काय आतां, दहा गेले नि पांच उरले, अशांतली गत; जाईन आतां एखाद्या चांगल्याशा क्षेत्रांत, आणि बसेन तिथं हरी हरी म्हणत !

चित्रपाल—सारजाबाई, आजचा हा आनंदाचा दिवस तुह्मींच दाखविलात असं मी समजतों. जन्मोजन्मीं तुमच्या उपकाराची फेड माझ्या हातून फिटायची नाहीं. भाऊ, तुमच्याबद्दल मी भलताच संशय घेतला. त्याबद्दल तुह्मीं मला क्षमा करा. विश्वासराव, तुह्मीं खरे प्रामाणिक आहांत, नांवाप्रमाणेंच कृति करून दाखविलीत. ज्या गोष्टी झाल्या त्या अशाच व्हाव्या, असाच त्या जगन्नियंत्या परमेश्वराचा हेतु होता असं दिसतं; पहा आपण सुखांत होतों, प्रेमभरांत आनंदानं एकमे-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

काशीं वागत होतों, तसंच प्रेम जर अव्याहत असतं तर आज हा प्रसंगच आला नसता, पण आपल्या मधल्या वागणुकिनं आज त्या पूर्व प्रेमाला अपूर्व करून सोडलं. परमेश्वराच्या मनांतून आह्मां मित्रामित्रांना व्याही करायचं होतं, म्हणूनच या जोडप्याचं प्रेम जमलं. चला आतां फुरसतीअंतीं एकमेकाचं वृत्त एकमेकांना विचारूं! त्या जगद्गुरूच्या वचनाप्रमाणं सर्व गोष्टी घडून आल्या. त्याच्याच जवळ सर्वत्रांनीं हात जोडून हेंच मागणं मागूं.—

पद—(भैरवी त्रिवट.)

मोहविषनिधी संचय कधीं जन निज मनीं करूत न सुधी॥ घरुत सतत दुरित तिमिर करुत दूर सुकृत दीप प्रकाश करून ॥ धृ० ॥ अघनाशन जनपावन भवभयबंधन निरसन खलमद दमन चरणकमलीं॥ रत मति होवो संतत लाभो॥ अभंग सुसंग ॥ १ ॥

अंक ५ वा समाप्त.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पद—(भैरवी ब्यांडचे चालीवर.)

नंदानंदा वंदा असुखद । छंदा फंदा धंदा विसरूनि ॥ संतत संत सुसंग धरा । कुमतिस मनिं नच द्या थारा ॥ देशोत्कर्षोद्देश वरा । हृदिं जागृत ठेवा दर न धरा ॥ पंथ खरा जो तोचि वरा ॥ खलवच तृणसम धिक्कारा ॥ अंतःकरणिं विकल्प जहर खर कालत्रयिं वसवा न जरा ॥ शरिरस्थालस शत्रुवरा ॥ सद्यत्नबलें नष्ट करा ॥ उद्यम सुविटप वर्धन करुनिच तत्परिपक्कहि सत्फलवहर कराच समर्पण सर्वत्रां ॥ खलरिपु मदबल ॥ निरसुनि । निजयश । बलनित । जगभर । विस्तारा ॥ १ ॥

समाप्त.

SRI JAGADGURU VISHWARADHYA
JNANA SIMHASAN JNANAMANDIR
LIBRARY.
Jangamwadi Math, VARANASI,
Acc. No. ....3602....
3602

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi